# माणूस

शनिवार । ६ मार्च १९७६ । एक रुपया

मुंढे कॉन्ट्रॅक्टरनी एक ट्रक डबर दिला.
धोंडबा थटवळांनी तीन खिडक्या आणि दाराची चौकट दिली.
सावंत, सकपाळ, मोरे, प्रभाकर टमके अशा
विटांच्या कारखानदारांनी पाच । पाचशे विटा दिल्या.
कुणी सिमेंट दिले, कुणी झाड दिले.
विद्यार्थी–प्राध्यापक–गावकऱ्यांनी श्रमदान केले.
महाडजवळच्या एका लहानशा गावातील एक लहानसे
बुद्धमंदिर–समाजमंदिर
असे उभे राहिले .... राहत आहे
१४ एप्रिलला
डॉ. आंबेडकर जयंतीला
या वास्तूचे उद्‌घाटन आहे ....

साप्ताहिक माणूस

वर्ष पंधरावे- अंक : एकोणचाळीसावा (४०)

६ मार्च १९७६

मूल्य : एक रुपया

संपादक
श्री. ग. माजगावकर
साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे
□
वार्षिक वर्गणी : छत्तीस रुपये
सहामाही वर्गणी : वीस रुपये
परदेशची वर्गणी : पंचावन्न रुपये
□
प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.
□
राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक **श्री. ग. माजगावकर** यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.
□
**साप्ताहिक माणूस**
१०२५ सदाशिव पेठ
नागनाथ पाराजवळ
पुणे ४११ ०३०
□
दूरध्वनी : ४३४५९
□

दोन वर्षांपूर्वी महाडच्या आंबेडकर कॉलेजच्या राष्ट्रीय सेवा योजना केंद्राने जोर लावला आणि

# एका शिबिराची कथा

प्रा. रा. म. बिवलकर

ठिकाण बुद्धवाडी, मौजे राजेवाडी. सावित्री नदीकाठची, निसर्ग सौंदर्याने नटलेल्या परिसरात वसलेली, १०–१५ घरांची वस्ती असलेली, छोटी वाडी. पलीकडे हाकेच्या अंतरावर आणखी ८–१० घरांची दुसरी वाडी. पण महसुली गावकुसाप्रमाणे कोंडिवते नामक गावात समाविष्ट झालेली. तरी राजेवाडीच्या ग्रुप ग्रामपंचायतीतच मोडणारी. राजेवाडीची वस्ती प्रामुख्याने मुस्लीम जमातीची. तिथे उर्दू माध्यमाची पूर्ण प्राथमिक शाळा अनेक वर्षांपासूनची. पण बुद्ध-मंडळींच्या लहानग्यांना मराठी–माध्यमी शाळेत जायचे तर कमीत-कमी २–३ मैलांची वाटचाल करावी लागायची. मैलभरावरची नडगावची शाळा जवळची पण मध्ये नदी आडवी. पावसाळ्यात शाळेत जाणाऱ्या मुलांचे चार महिने आपल्या पुराच्या पाण्यात बुडविणारी !

बुद्ध मंडळींना बुद्धवाडीवर मराठी शाळा हवी होती. अनेक वर्षे घोंगडे भिजत पडले होते. पोरे गुरामागे अगर हमालीमागे रानोमाळ भटकत होती. कुणाचा शेव धरून मुंबई-पुण्याच्या हॉटेलात कपबशा विसळायला जात होती. दोन वर्षांपूर्वी महाड कॉलेजच्या राष्ट्रीय सेवा योजना केंद्राने नेट लावला. बुद्धांच्या पुढाऱ्यांना सरपंचाची साथ मिळाली आणि बुद्धवाडीवर झे. पी. ची. ' साळा ' सुरू झाली. कुडाच्या वाड्यात मास्तरीणबाई चार पोरे जमवून शिकवू लागल्या. पावसाळ्यात कूड पाझरू लागला की पोरांना घेऊन कुणाच्या तरी घरातच नावापुरती शाळा भरवू लागल्या. दोन्ही बुद्धवाड्या निसर्ग-सौंदर्याने ओथंबलेल्या उंचवट्यावर बसल्या होत्या. पण तिथे पोचा-यला शेतांचे बांध हाच रस्ता होता. बुद्धमंडळींचे दारिद्र्य जोडीला होतेच. त्यामुळे ' साळा ' बाळसे धरीना. पटावर ३६, हजर १०-१५ असा मामला असे. शाळेच्या कोंडवाड्यात ओलसर जमिनीवर बसा-यला पोरे नाराज असत. " गोठ्यात ' साला ' आपुन काय गुरे आहो का ? " असा त्यांचा प्रश्न होता.

या प्रश्नाला वाचा फोडावी, शाळेच्या इमारतीचा प्रश्न धसास लावावा. दोन्ही बुद्धवाड्यांवर पोचविणारे रस्ते बांधून काढावेत. राजेवाडीची आरोग्य पाहाणी करावी म्हणून यंदा राष्ट्रीय सेवा योजना केंद्राने आपले दहा दिवसांचे श्रमशिबीर राजेवाडीच्या बुद्ध-वाड्यावर लावले. पंतप्रधानांच्या ' प्रगति सप्ताहात ' या विधायक

कार्याने 'रुपडे' धरावे अशा बेताने १७ जानेवारी १९७६ रोजी शिबिराचे उद्‌घाटन महाडचे नगराध्यक्ष आणि आमदार क्रांतिवीर श्री. नानासाहेब पुरोहित यांच्या शुभहस्ते पार पडले. समारंभाला दलितमित्र श्री. नानासाहेब टिपणीस, श्री. दादासाहेब ओक, मा. श्री. विष्णुपंत चांदे गुरुजी, जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष श्री. विठ्ठलराव देशमुख, महाड पंचायत समितीचे सभापती श्री. माधवराव कळमकर, उपसभापती श्री. शंकरराव चव्हाण अशी अनेक मान्यवर मंडळी उपस्थित होती. राजेवाडीचे सरपंच, उपसरपंच, व गावकरीही मोठ्या संख्येने जमले होते. रा. से. यो. केंद्राचा प्रमुख म्हणून मीच शिबीर संचालक होतो. माझे ५० विद्यार्थी आणि प्रा. टिपणीस व व प्रा. मळेकर हे दोन सहकारी यांच्या समवेत, महननीय व्यक्तींचा आशीर्वाद घेऊन आम्ही कामाला सुरुवात केली.

सकाळी चार तास रस्ताबांधणीचे श्रमदान व दुपारी ग्रामसफाई, आरोग्य पाहणीच्या प्रश्नावल्या करून घेणे—वगैरे कामे विद्यार्थ्यांनी करावी अशी योजना होती.

बुद्धवाडीवर एक बुद्धमंदिर बांधावे म्हणून लोकवर्गणी जमवून गावकऱ्यांनी १९५९ साली एक तोडीचे जोते बांधून काढले होते. पण आपापसात मतभेद झाले—पैसे कमी पडले—वाद निर्माण झाले आणि बुद्धमंदिराचे २६'×१९' चे जोते पाणी खात १६–१७ वर्षे पडून राहिले. प्रा. शाळेच्या बांधकामात लोकवर्गणी म्हणून गावकऱ्यांनी हे जोते द्यावे असा प्रस्ताव आम्ही सुचवला आणि तो त्यांनी मान्यही केला. पंचायत समितीच्या अध्यक्षांनी शाळेसाठी जि. प. चे अनुदान अग्रक्रमाने देऊ असे आश्वासनही दिले. पण जोते—लांबीला ६ फुटांनी वाढवायला हवे होत. ते १५ दिवसांत बांधू असे गावकऱ्यांनी आश्वासन दिले— शिबिराच्या काळात हे जाते पूर्ण करावे पण त्याचबरोबर दुसरी जागा पाहून छाटेखानी का होईना एक बुद्धमंदिर तथा समाजमंदिर आमच्या केंद्रातर्फे बांधून द्यावे असे आम्ही ठरवले. त्या करता आमच्या ५० विद्यार्थ्यांबरोबर बुद्धवाडीवरचे आणखी १०-१५ जण आमच्याबरोबर कामाला लागले.

त्या दिवसांतले काही अनुभव मनाला चटका लावून गेले. मुलांच्या कामावर लक्ष ठेवीत मी सर्वत्र हिंडत होतो. अनेकांशी बोलत होतो. त्यांचे प्रश्न, अडचणी समजून घेत होतो. परिसर रम्य होता. हवा छान होती. सावित्रीचे पाणी अमृतातेही पैजा जिंकण्याइतके गोड होते. पण माणसे फक्त हवापाण्यावर जगू शकत नव्हती. परिसरातील तिन्हीबुद्धवाड्यावरील बावीस-पंचवीस घरात मी डोकावलो. घरातली रकटी सावरताना, आपले दारिद्र्य लपवायचा विकल प्रयत्न करताना, घरातला मडळी कानकोंडी होत. प्रत्येकाच्या कुणीनकुणी ममईला चाकरमान्या होता, अगर फौजेत शिपाई होता म्हणूनच घरात निदान पेज तरी रटरटत होती. वाड्यावर जवान थोडके. बुद्धेच अधिक. पण म्हातारपणी विसावा द्यायला परिस्थिती तयार नसल्याने ही म्हातारी 'धनुष्येही' गावातल्या कुणा ना कुणा रैस-मुसलमानाघरी राबत होती. त्यांच्या शेतावर खपत होती.

राजेवाडी शेजारून वाहणाऱ्या सावित्रीने, खरे तर राजेवाडीचे नशीब उजळावे म्हणून, आपल्या धावत्या पात्रात पुरुष-दोन पुरुष डूब मारली होती! मैल-सव्वा मैल लांबीचा व अर्धा पाऊण फर्लांग रुंदीचा रांडाळचा डोह तिथे निर्माण केला होता. पण वारेमहा उपलब्ध असलेल्या या गोड्या पाण्याचा वापर राजेवाडकर मंडळी करीत नाहीत हे पाहून ती लोकगंगाही हिरमुसली झाली असेल! बुद्धमंडळी द्रव्याभावी काही करू शकत नव्हती. पण गावातली मुसलमान मंडळी तर तशी मालदार होती. त्यांच्याजवळ शेती होती. इतर धंदे होते. आफ्रिकेत प्रत्येकाचे नातेवाईक होते. तिकडून पैशाचा ओघ येत होता. मग त्यांनी का करू नये डोहाचा उपयोग? नदीच्या काठी वर्षांतून दुबार, निदान भाताची खाचरे तरी का करू नयेत? भाजीपाला, फळबागा का उभ्या राहू नयेत?

या प्रश्नांना उत्तरे नव्हती. कोकणात अनेक गावात मी तशी परिस्थिती पाहिली होती. माणसे कल्पनाशक्ती लढवून, राबून, जिद्दीने काही उभारायला तयार नव्हती. पुण्या-मुंबई-आफ्रिकेकडून येणाऱ्या मनीऑर्डरी आणि जवळच्या भातखाचरात काय पिकेल ते, एवढ्यावर दरिद्री समाधान मानून नसत्या गावकुचाळ्या करण्यात आनंद मानणाऱ्या या मंडळींना आपले दारिद्र्य कुठे खुपतच नव्हते! दरिद्री नसणाऱ्यांनी, आपली धनसंपत्ती वाढवणे म्हणजे दुसऱ्याची लुबाडणे हेच गणित मनाशी धरले होते. त्यामुळे एकमेकांचा दुस्वास, एकमेकांवर अविश्वास, सहकार्याचा अभाव, जमाती-जमातीमध्ये वैरभाव हेच कोकणी गावांचे वैशिष्ट्य असते.

आजकाल ग्रामपंचायती हे राजकारणाचे, संधिसाधू मंडळींचे, आपमतलब्यांचे आखाडे बनले असल्याने, एकमताने आणि सहकार्याने कुठली गोष्ट होणे कठीण.

शिबिराच्या निमित्ताने मी राजेवाडी ग्रुप ग्रामपंचायतीची विचारपूस केली तेव्हा कळले, सरपंचानी राजिनामा दिला आहे. ग्रामसेवक आणि सेक्रेटरी ही पदे सांभाळणाऱ्या व्यक्तीवर आरोपांचे मोहोळ उठले आहे. पंचायतीच्या कामात घोळ निर्माण झाला आहे. गावातील मालदार मंडळींनीही १०–१० वर्षांत घरपट्टीही भरलेली नाही. हजार–पंधराशेची घरपट्टी पण तीही वसूल होऊ नये. सावित्रीचे पाणी पंपाने ४५ फुटी टाकीत चढवून गावाला मुबलक पाणीपुरवठा उपलब्ध करणारी योजना ८–१० वर्षे अडखळत राहावी. सरकार ९० टक्के अनुदान योजनेकरता द्यायला तयार असतानाही! हे सारे अजब होते.

तरीपण शिबीर सुरू झाले, तेव्हा राजिनामा दिला असूनही सरपंच श्री. सावंत आमच्याबरोबर उभे राहिले. उपसरपंच श्री. गिरे, आजारी असतानाही मुलांच्या हातातल्या कुदळचा-फावड्यांचे दांडे घट्ट बसवू लागले. गावचा पोलीस पाटील, श्री. लियाकत लंबाडे तर माझा विद्यार्थी होता. तो शिबिरार्थीच होता. त्याच्या उत्साहाला तर उधाण आले होते. घरची बैलगाडी जोडून तो खाणीवरून डबर आणून देत होता. गावातले बडे शेठ, कापडी शेठ, भोबल मास्तर, आलेकर, मुळी अशी कितीतरी मंडळी कुतूहलाने मुलांचे काम निरखीत होती. दुपारी मुले गाव झाडायला गेली की त्यांना आवर्जून बोलावून चहा पाजीत होती. आया बाया म्हणायच्या '' न्हाउद्या पोरांनो. आमचा रस्ता झाडू आम्ही. तुम्ही कशाला राबता?'

शिबिराने गावात एक निराळे वातावरण जरूर निर्माण केले. बुधवाडीला पोचणारा दोन फर्लांग लांबीचा व दहा फूट रुंदीचा जो रस्ता आम्ही बांधीत होतो त्याच्या मार्गात ८।१० झाडे येत होती. ती तोडायला हवी होती. रस्त्याच्या बाजूची भातशेती आणि ही

झाडेही मुसलमान मंडळींची होती. पण आम्ही विनंती केल्यावर झाडे तोडायला कुणी नाही म्हटले नाही.

'तोरा. पन तोराल तवा मना कलवा. झार लगेच हलवाया हवा मना.'

'का ? न्या की सावकाश.'

'पान न्हाईल काय जाग्येवर ?'

आणि ती गोष्ट माझ्या प्रत्ययाला आली. झाड तोडायचे श्रमदान करायला पुढे आलेला बुद्ध जवान बरोबर एकदोन पोरे व एक टोपले घेऊन यायचा. झाडाच्या बुंध्यावर कुन्हाड अशी पडायची की त्याचा मोठा ढलपा निघायचा. घावागणिक उडणारा ढलपा टोपल्यात भरला जाई. टोपले भरले की ते त्वरित घरी रवाना होई. दारिद्रय माणसाला अनेक गोष्टी शिकवते !

एकदा भोजनाच्या मंडपात घडलेल्या प्रसंगाने तर माझ्या हृदयाचे पाणी पाणी केले. बुद्धवाड्यावरील तिघा चौघांच्या दारी जो सलग मांडव उभारला होता तिथे शिबिरार्थी जेवत. विद्यार्थी जेवून उठले की मग श्रमदानी मंडळी, कामगार, पाणीवाले, वाढपी यांची पंगत बसे. त्या दिवशी मुलांची पंगत चालू होती. काही मुले भोजन संपवून उठली होती. दहा पाच 'मर्द' गडचांचे खोट लावून पैजेचे भोजन चालू होते. मी हात धुवून पान लावायच्या तयारीत होतो. एवढ्यात एकच कालवा मंडपात उसळला. मला वाटले मंडपाभोवती घोटाळणारी कुत्री बहुतेक मंडपात शिरली असावीत. पण आवाज येत होते ते कुत्र्यांना हाकलण्याचे नव्हते.

'लाथ मारा सालीला.'

'हाकलून द्या.'

'रांड मंडपात घुसते म्हणजे काय.'

'पदरातलं अन् ओच्यातलं काढून घ्या.'

मी भोजन मंडपाकडे धावत गेलो. अंगावर फाटके तुटके वस्त्र असलेली, त्याच्या भोकातून अब्रू बाहेर ओसंडत असलेली एक बाई मंडपाबाहेरच्या उकीरडावजा जागेवर अंगाचे मुटकुळे करून बसली होती.

'मी फार नाही हो घ्येतला. बगा– चार पत्रावळीच उचलल्यात मी. चार दिस आन नाही पोटात.' ती कळवळून सांगत होती. बुद्धवाड्यावरची काही उत्साही मुले तिच्या पदरातले खेचून घ्यायच्या पवित्र्यात उभी होती. मी ओरडलो,

'थांबा. काय केलं या बाईनं ?'

'मंडपात शिरली.'

'का ?'

'खरकटे पळवायला. धा पत्रावळी आहेत तिच्या ओच्यात.'

'नाय सायेब. म्या चारच उचलल्यात !

'धां साहेब.'

'उचलू द्या. तुम्ही जा बरं आपल्या कामाला.' माझे डोकेच सुन्न झाले होते. एक गरीब स्त्री चोरी करते ! खरकटयाची ! पंगतीतून कुत्र्याला हुसकावून लावावे तशी ती हुसकली जाते ! चार उष्टया पत्रावळीसाठी अजिजी करते ! इतर मंडळी– गरीबच– पण गरिबीने क्रूर बनलेली– त्या चार पत्रावळीही छिनावू पाहातात ! सारेच भयंकर होते. मी कॉन्ट्रक्टरच्या मॅनेजरला म्हटले.

'मागच्या पंक्तीला जेऊ घाला या बाईला.'

'होय साहेब. तिला आम्ही नंतर उरले सुरले देणार होतो. पण ती मंडपात घुसली आणि भराभरा पत्रावळी ओच्यात भरू लागली. जेवणाऱ्या मुलांना किळसवाणे होईल म्हणून हाकलली तिला'

'झाला हा प्रकार बरा झाला नाही.'

'त्याला इलाज नाही साहेब. दररोज इथे अनेक माणसे जमतात. विद्यार्थी आणि तुम्ही मंडळी जेवून गेलात की–'आम्हालाबी द्या घास घास' म्हणत मंडपात शिरतात. आम्हालाही 'नाही' म्हणायला शरम वाटते साहेब.'

मी विषण्ण मनाने परतलो. बुद्धवाड्यावरचे पुढारी श्री. बाबाजी हाटे याना बोलावून घेतले. म्हणालो,

'तुम्ही ऐकले ना मॅनेजर काय म्हणाला ते ?'

'होय साहेब, सांगूनही लोक ऐकत नाहीत.'

'पण हे बरे नाही. आम्ही इथे कॅम्प घेतला तरी त्याची जराही तोशीश गावकऱ्यांना दिली का ?'

'नाही साहेब.'

'वास्तविक गावकरी मंडळींनी कॅम्पची व्यवस्था करायला हवी.'

'तेही खरंच पण...' बाबाजी कॉलेजवर शिपाई होते. काही गोष्टी स्पष्ट मांडणे त्यांना जड जात होते.

'समजलो. असे करा, जी मंडळी आमच्या मुलांबरोबर दोन्ही वेळा काम करायला तयार असतील त्यांना चहा फराळ-भोजन सारे आम्ही देऊ. पण कामावर नसतील त्यांनी मंडळाकडे फिरकता कामा नये.'

'हे जमल साहेब'

दुसऱ्या दिवसापासून श्रमदानी गावकऱ्यांची रोज सकाळी हजेरी घ्यायची पद्धत मी पाडली. १०।१२ माणसे सकाळी हजर व्हायची. त्यातही त्यांनी पाळ्या लावल्या. एखाद्या दिवशी एखादा जख्ख म्हातारा काठी टेकीत टेकीत श्रमदानाला म्हणून यायचा ! ज्याला चालवत नाही तो काय करणार श्रमदान ?

'बाबा, तुम्ही काय काम करणार ?'

'बगा तर खरं'

पण ही ऐट तोंडाची. हाताने कुदळ उचलणेही कठीण. पुढाऱ्याला विचारले तर तो म्हणाला,

'कामापेक्षा दोन डाव जेवायला मिळते म्हणून आपल्या घरची पाळी सोडायला लोक तयार नाहीत. माझ्यावरच डाफरतात.'

त्याचे म्हणणे खरे होते. ज्या ग्रुपच्या वाट्याला म्हातारा जाई तो ग्रुपलीडर कुरकुरे. त्याला समजावणे कठीण जाई. दारिद्र्याच्या या दर्शनाने मन आणखीच अंधारून येई. धडधाकड माणसेही जेवाखायला पुढे, कामाला मागे, त्यात कुचराई करणारी दिसली की राग येई. पण साऱ्या जगातच माणसे–मग ती सुशिक्षित असोत की उच्चाधिकारी कामदार असोत–अशी वागतात हे ध्यानी आले की त्यांना रागवायला तोंड उघडत नसे.

बुद्धमंदिराचा तथा समाजमंदिराचा पाया खोदाई सुरू झाली आणि त्या प्रोजेक्टच्या मदतीसाठी एक चित्रपट गावकऱ्यांना दाखवायचा असे आम्ही ठरवले. शिबिराचा एक भाग म्हणून दाखवायचा त्या चित्रपटाची एक रुपयाची ७३२ तिकिटे बहुशः कॅम्पवरील विद्यार्थ्यांनी एका दिवसात विकली. मुले गावात काम करीत असल्याने

गावकऱ्यांशी त्यांच्या चांगल्या ओळखी झाल्या होत्या. लियाकत लंबांडे अश्रफ कापडी, हनीफ मेमन, त्यांचे म्होरक्ये होते. दुसऱ्याच्या कशातून चांगल्या कामाकरताही एक रुपया काढणे हे किती कठीण असते याची कल्पना मुलांना जरूर आली. पण त्यांना प्रतिसाद मात्र बरा मिळाला. तिकिटे घ्यायला काकू करणाऱ्या घरची सारी मंडळी मात्र चित्रपटाच्या वेळेआधी १॥-२ तास आपल्या जागा धरून बसली होती. त्या छोटया बुद्धवाडीवर त्या रात्री आजूबाजूच्या पंचक्रोशी-तील दीड-दोन हजार स्त्री-पुरुष-मुले चित्रपटासाठी हजर झाली होती. त्यात ऐस-श्रीमंत होते तसे खैस गरीब होते. सर्व जातिधर्माची मंडळी जमली होती.

कॅम्प संपला. पण समाजमंदिराच्या पायाचा व शाळेच्या पायाचा असे दोन खंदक मला आव्हान आणि आवाहन करीत होते. समा-रोपाच्या समारंभाला पंचायत समितीचे अध्यक्ष श्री. माधवराव कळमकर अध्यक्ष म्हणून उपस्थित होते. तालुका काँग्रेसचे अध्यक्ष श्री. चंद्रकांत देशमुख मुख्य पाहुणे होते. प्राचार्य रामटेके, उपप्राचार्य डॉ. भन्साळी, श्री. बाबुराव रानडे, काही प्राध्यापकमित्र समारोपाला आवर्जून आले होते. गावकरी होतेच. बुद्धवाडीच्या आम्ही बांधलेल्या रस्त्याचे श्री. चंद्रकांत देशमुख यांनी उद्घाटन केले. पाहुण्यांच्या गाड्या आज थेट बुद्धवाड्यावर पोचल्या होत्या. उद्घाटनाच्या दिवशी गाड्या २ फर्लांगावर उभ्या करून वृद्ध-तरुण पाहुण्यांना समारंभस्थळी चालत यावे लागले होते. श्री. माधवराव कळमकरांनी ते बोलूनही दाखवले. 'बुद्धवाडीच्या रस्त्याचे नामाभिधान 'डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर मार्ग' असे ठेवावे. आम्ही तसा ठराव पंचा-यतीत करू.' असे उपसरपंच (आता सरपंच) श्री. गिरे यांनी सांगितले. स्वागत, अहवाल, भाषणे, आभार, चहापाणी सर्व पार पडले. शिबिराचे सूप वाजले तरी खणलेले पाये स्वस्थ बसू देत नाहीत.

म्हणूनच कॅम्प संपल्यावर मी, माझ्या सहकाऱ्यांनी आणि काही विद्यार्थ्यांनी 'भिक्षांदेही'ची पायपीट चालू ठेवली आहे. तिला चांगला प्रतिसाद मिळतो आहे. महाडकर अनेक पट्टया भरून जेरीस आले असताही, असं विशेष: !

पैशाप्रमाणे मी वस्तूही मागतो आहे. मुंठे कॉन्ट्रॅक्टरनी एक ट्रक डबर दिला. धोंडबा थटवळांनी ३ खिडक्या आणि दाराची चौकट दिली. सावंता सकपाळ, मोरे, प्रभाकर टमके अशा विटांच्या कार-खानदारांनी पाचपाचशे विटा दिल्या. रामभाऊ वडके आणखी दोन खिडक्या देणार आहेत. कुणी सीमेंट दिले. कुणी झाड दिले! चांगल्या कामावरची लोकांची श्रद्धा अजून बाकी आहे. महाडच्या लायनक्लबच्या मंडळींनी, त्यांचा दंत-नेत्र-यज्ञ यंदाही असताना माझ्या कार्याला उत्तमच साथ दिली.

मदतीच्या या ओघाने प्रोत्साहित होऊन-आमच्या दोन्ही संकल्पित इमारतींची जोती बांधून पुरी झाली आहेत. समाजमंदिराची वास्तू वीटकाम सुरू झाल्याने वर चढू लागली आहे. १४ एप्रिलला डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीच्या दिवशी त्या वास्तूचे उद्घाटन करावे असे आम्ही ठरवले आहे.

□ □

---

## साप्ताहिक माणूस

**मालकी व तत्संबंधित इतर तपशिलाचे निवेदन**
**( अधिनियम ४, नियम ८ अन्वये )**

| | | |
|---|---|---|
| १. | प्रकाशन स्थळ | : पुणे |
| २. | प्रकाशन काल | : साप्ताहिक |
| ३. | मुद्रक, प्रकाशक, संपादक नाव व पत्ता | : श्री. ग. माजगावकर<br>: १०२५, सदाशिव, पुणे ३० |
| ४. | नागरिकत्व | : भारतीय |
| ५. | प्रकाशन संस्थेचे नाव व तिच्या भागीदाराची नावे व पत्ते | : राजहंस प्रकाशन<br>१. ब. मो. पुरंदरे<br>१०२५, सदाशिव, पुणे ३०<br>२. श्री. ग. माजगावकर<br>१०२५, सदाशिव, पुणे ३० |

वर दिलेला तपशील बरोबर आहे.

प्रकाशकाची सही

दिनांक : ६ मार्च, १९७६ — श्री. ग. माजगावकर

---

# महाराष्ट्र
## मंत्रिमंडळ बनावामागील सूत्र

वा. दा. रानडे

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री श्री. शंकरराव चव्हाण यांनी मुख्यमंत्रिपदाची सूत्रे हाती घतल्यानंतर एक वर्षाने मंत्रिमंडळाची पुनर्घटना केली. पुनर्घटना होणार असल्याच्या बातम्या गेले सहा-सात महिने येत होत्या. मुख्यमंत्र्यांनी दोन-तीन वेळा दिल्लीत जाऊन पंतप्रधानांशी या प्रश्नावर चर्चाही केली होती. पण प्रत्येक वेळी पुनर्घटना पुढे ढकलण्यात आली होती.

या पुनर्घटनेमागे कोणते धोरण आहे? पंतप्रधानांनी काही महिन्यांपूर्वी केंद्रीय मंत्रिमंडळाची पुनर्घटना केली. ती जशी काही बाबतीत धक्के देणारी होती तसेच राज्य मंत्रिमंडळाच्या पुनर्रचनेबाबतही म्हणता येईल. उमाशंकर दीक्षित व स्वर्णसिंग या ज्येष्ठ मंत्र्याना केंद्रीय मंत्रिमंडळातून वगळण्यात आले तर वसंतदादा पाटील आणि मधुकरराव चौधरी या ज्येष्ठ मंत्र्यांना महाराष्ट्राच्या नव्या मंत्रिमंडळातून वगळण्यात आले आहे. दीक्षित व स्वर्णसिंग यांनी निवृत्त होण्याची इच्छा दर्शविणारी पत्रे पंतप्रधानांना पाठविली होती तसे वसंतदादा पाटील व मधुकरराव चौधरी यांच्याबाबतीत घडलेले नाही. पुनर्घटना करताना मुख्यमंत्र्यांनी 'सर्वच मंत्र्यांकडून राजिनाम्याची औपचारिक पत्रे घेतली तशी या दोघांकडूनही घेतली पण ती त्यांची इच्छा होती असे म्हणता येणार नाही. १९७२ च्या निवडणुकांनंतर मुख्यमंत्रीपद मिळविण्यासाठी शंकरराव चव्हाणांप्रमाणेच वसंतदादा पाटील व मधुकरराव चौधरी यांचेही प्रयत्न होते. पण या स्पर्धेत शंकरराव चव्हाणांच्या नेतृत्वास पंतप्रधान इंदिरा गांधींनी अनुकूलता दर्शविली. महाराष्ट्रात १९७२ च्या निवडणुकीनंतरच आपल्या पसंतीचा मुख्यमंत्री आणण्याचा इंदिरा गांधींचा प्रयत्न होता पण यशवंतराव चव्हाणांना नाईकच मुख्यमंत्री हवे होते व महाराष्ट्र काँग्रेसवरील त्यांच्या प्रभावामुळे इंदिरा गांधींना त्यावेळी मान्य करावे लागले होते पण गेल्या वर्षी नेतृत्वात बदल करण्याच्या मागणीने पुन: जोर धरला आणि श्री. शंकरराव चव्हाणांची नेतेपदी व मुख्यमंत्रिपदी निवड झाली. यशवंतराव चव्हाणांचा प्रभाव कमी झाल्याचे त्याचवेळी दिसून आले.

त्यानंतर एक वर्षाने आता मंत्रिमंडळात मोठे बदल झाले आहेत. नऊ नव्या मंत्र्यांचा समावेश करण्यात आला आहे. प्रादेशिक प्रतिनिधीत्वाच्या दृष्टीने पाहिले तर पश्चिम महाराष्ट्राच्या मंत्र्यांची संख्या १३ वरून १५ पर्यंत वाढली म्हणजे या विभागाला दोन जागा अधिकच मिळाल्या आहेत. मराठवाड्याचे पूर्वी फक्त ३ मंत्री होते ते ७ झाले आहेत. विदर्भाच्या मंत्र्यांची संख्या ३ वरून ४ पर्यंत वाढली. विदर्भास त्यामानाने कमी प्रतिनिधित्व मिळाले आहे.

मंत्रिमंडळात क्रमांक २ चे स्थान असलेल्या वसंतदादांना वगळल्याने महाराष्ट्राच्या काँग्रेस राजकारणावर काय परिणाम होण्याची शक्यता आहे? वसंतदादा एकटे पडतील की त्यांच्यामागे मोठा गट संघटित होईल? सांगली जिल्ह्यात असमाधान व्यक्त केले जावे हे स्वाभाविक आहे पण त्या पलीकडे इतरत्र फारशी तीव्र प्रतिक्रिया व्यक्त झालेली नाही. चौधरींना वगळल्याबद्दल खानदेशातही तीव्र प्रतिक्रिया व्यक्त झाल्याच्या बातम्या नाहीत. या दोन मंत्र्यांना वगळणे योग्य होते का? अकार्यक्षमता, सत्तेचा गैरवापर, कारभाराविरुद्ध गंभीर तक्रारी किंवा आरोप अशा कारणांवरून मंत्र्यांचे राजिनामे घेतले जातात किंवा पुनर्घटनेत त्यांना वगळण्यात येते. या दोन मंत्र्यांच्याबाबतीत असे काही कारण नाही. इतर राज्यात काही मंत्र्यांच्या कारभाराविरुद्ध गंभीर आरोप करण्यात आले तसे महाराष्ट्रात घडलेले नाही; पण गटस्पर्धा व गटबाजीचे राजकारण यामागे असावे असे दिसते.

काही राज्यात मुख्यमंत्री बदलण्यात आले. हरियाणा, उत्तर प्रदेश व मध्य प्रदेशात नवे मुख्यमंत्री व नवी मंत्रिमंडळे अधिकारावर आली. महाराष्ट्रातही वर्षापूर्वी मुख्यमंत्री बदलला आणि आता वर्षाने मंत्रिमंडळाची पुनर्घटना करण्यात आली. या साऱ्यामागे एक सूत्र आहे ते म्हणजे भावी निवडणुकांची पूर्वतयारी व त्यात आपल्या गटाला जास्त जागा कशा मिळतील या दृष्टीने हालचाली. बिहार, मध्य प्रदेश, उत्तर प्रदेशाइतकी महाराष्ट्र काँग्रेसमधील गटबाजी तीव्र नाही; पण येथेही गटबाजीचे राजकारण आहेच. आगामी निवडणुकीनंतरही मुख्यमंत्रिपद आपल्याकडे राहण्यासाठी आपल्या गटाचे बळ वाढविण्याचे शंकरराव चव्हाणांचे प्रयत्न आहेत व वसंतदादा गटाच्या हालचालीही त्याच दिशेने चालू आहेत. दादांना मंत्रिमंडळातून वगळल्याने आपली बाजू कमकुवत झाली असे त्यांच्या गटाच्या अनुयायांना वाटणे स्वाभाविक आहे; पण शंकरराव चव्हाणांना विरोध म्हणजे इंदिरा गांधींना विरोध असा अर्थ लावला जाईल त्यामुळे आता कशा पद्धतीने हालचाली करावयाच्या असा प्रश्न या गटापुढे निर्माण झाला आहे. तसेच दादा गटाची किती माणसे त्यांच्याबरोबर राहतील याचीही शंका आहे. सत्तेचा मार्ग, मंत्रिपदे व अधिकारपदे मिळविण्याचा मार्ग शंकरराव चव्हाणांच्याबरोबर राहण्यात आहे व ज्यांना तेच हवे ती मंडळी दादांची संगत सोडून शंकरराव चव्हाणांच्या मागे जातील. मुख्यमंत्र्यांच्या नेतृत्वाविरुद्ध उत्तर प्रदेश, मध्य प्रदेशासारखी बंडखोरी महाराष्ट्रात निर्माण होण्याची शक्यता फार कमी आहे.

निवडणुकीत आपल्या गटाची माणसे जास्त निवडून आणण्यासाठी प्रदेश काँग्रेसचे अध्यक्षपद आणि प्रदेश निवडणूक समिती आपल्या नियंत्रणाखाली आणण्याचा प्रयत्न दादांचा गट करण्याचा संभव आहे. १९७१-७२ च्या निवडणुकीचे वेळी वसंतदादा महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष होते. 'मला मंत्रिपदाचा लोभ नाही प्रदेश काँग्रेसची सूत्रे माझ्याकडे सोपवा पक्ष संघटनेची जबाबदारी मी आनंदाने पत्करीन' अशी भूमिका वसंतदादा घेण्याचा संभव आहे व त्यांना ती जबाबदारी नाकारणे श्रेष्ठींना कठीण जाईल.

पक्षनेता निवडण्याच्या बाबतीत विधिमंडळ पक्षाला पूर्ण स्वातंत्र्य असावे आणि एकदा निवडलेला नेता दोन तृतीयांश सभासदांनी अविश्वास दर्शविल्याशिवाय हलविण्यात देऊ नये. तसेच पक्ष नेत्याला आपले मंत्रिमंडळ निवडण्याच्या बाबतीत पूर्ण मोकळीक हवी. मुख्यमंत्र्यांनी दरवेळी दिल्लीची वारी करून मंत्र्यांची यादी मंजूर करून घ्यावयाची ही सध्याची पद्धति योग्य नाही. राज्यमंत्रिमंडळाचा कारभार पक्षाच्या धोरणानुसार व शिस्तीनुसार चालू आहे की नाही हे पाहणे एकटचापुरतेच केंद्रीय नेत्यांचे नियंत्रण असावे, हे संकेत रूढ करणे आवश्यक आहे. त्यामुळे गटबाजीला आळा बसून मंत्रिमंडळाच्या कारभारात अधिक स्थैर्य येईल.

□ □

# सोलकढी

## □ गणिकेचे कैसे चालणे ?

तसे पाहिले असता चालणे ही किती कंटाळवाणी गोष्ट आहे. आपलाच, गुडघ्यावरचा आणि गुडघ्याखालचा एक पाय कमरेपासून उचलायचा आणि शक्यतो सरळ रेषेत सहसा पुढे टाकायचा, असे एका पायाचे करून झाले म्हणजे गुडघ्यावरचा आणि गुडघ्याखालचा उरलेला दुसरा पाय कमरेपासून उचलायचा आणि अधीच्या पहिल्या पायासारखाच शक्यतो सरळ रेषेत सहसा पुढे टाकायचा, आणि असे आपले करत राहायचे आणि करताना कमरेवरचे आपल्या शरीराचे बोचकेही त्याच दिशेने वाहून न्यायचे, म्हणजे चालणे ! येणेप्रमाणे सगळ्यांचे चालणे सारखे असले तरी काहींचे चालणे वेगळे असते, हे आपण ध्यानीमनीस्वप्नी धरले पाहिजे.



उदाहरणार्थ, बायकांचे चालणे पाहा. ( ते करण्यासाठी अनंतरावाने ' पाहा ' म्हणेपर्यंत तुम्ही स्वस्थ थोडेच बसला होता ) तेव्हा बायकांचे चालणे पुन्हा पाहा. बऱ्यापैकी बायकांचे चालणे पुन्हा पुन्हा पाहा. काही तरी गचगंमत असते त्यात. काय असते ते सांगता नाही येणार मला. माझे मी एक पाहून ठेवले आहे : एखाद्या विषयाचा पाठपोट पक्का अभ्यास झाल्याशिवाय त्याबद्दल मला काहीच सांगता येत नाही. तसे ' रविवारच्या लोकसत्ते ' तले अग्रलेख नियमित वाचत असल्यामुळे ललनांच्या लाजबाब पदलाघवाबद्दल शेरपावशेर काही सांगता आले असते हो मला. पण ते खरे नव्हे. प्रचितीशिवाय बोलणे हे प्रसिद्धीवाचून डोलण्याइतकेच फोलकट होय.

बायकांच्या गचगंमतीच्या चालण्यातसुद्धा अरळतरळ परी असतात म्हणे. मला ते काही उमजत नाही, पण माझे, या विषयाचा सांगोपांग व्यासंग केलेले मित्र तसे म्हणतात. त्यांच्या मते, बाई ओळखायची ती तिच्या चालण्यावरून. आमचे एक महामित्र तर यात एवढे दर्दी आहेत की बाईच्या नुसत्या ( ! ) चालण्यावरून ती चहा पिते की कॉफी पिते, ' संदर्भ '–' सत्यकथा ' वाचते की ' माहेर '– ' मेनका ' वाचते, हे सुद्धा सांगू शकतात. त्यामुळे डेन्मार्क नावाच्या देशात परवा जो प्रकार घडला त्याचे मला अतिआश्चर्य झाले तरी आमच्या मित्रमैत्रांना त्याचे काहीमुद्धा वाटले नाही

झाले असे की डेन्मार्कची राजधानी कोपनहेगन येथल्या एका कोपनहेगनी रस्त्यावरून एक गणिका चालली होती. त्याच रस्त्यावरून एक पोलीस चालला होता. गणिका आपले काम करत होती. पोलीस आपले काम करत होता. गणिका गिऱ्हाईक शोधत होती. पोलीस गुन्हा शोधत होता. पोलिसाने गणिकेला पाहिले; गणिकेला म्हणजे गणिकेच्या चालण्याला. आणि त्याने रस्त्यावर गिऱ्हाईक–शोध ' चाल 'ल्याबद्दल त्या गणिकेला अटक केली. पुढे त्या देशाच्या रीतीप्रमाणे न्यायालयात खटला उभा राहिला. गणिकेची विशिष्ट चाल एवढाच पुरावा पोलिसाला देता आला. पण चालीवरून बाई गरती आहे की गणिका आहे, हे आपण बिनचूक ओळखू शकतो, असे पोलिसाने ठणकावून सांगितले. आणि न्यायाधिशमहाराजांनी तो निर्णायक पुरावा मानून त्या गणिकेला सजा फर्मावली.

एकूण बाई कोणत्या चालीची आहे हे सुद्धा तिच्या चालण्यावरून काहीजणांना समजते. काहीजणांना म्हणजे कोपनहेगनच्या पोलिसांना आणि न्यायाधीशांना. आमच्या मित्रांना तेवढेच समजत नाही.

–अनंतराव

# आपली लोकशाही : आगामी दहा वर्षे

युक्रांत या पुण्यातील संघटनेचे एक कार्यकर्ते रत्नाकर महाजन यांचा मुक्काम सध्या दिल्लीला आहे. या मुक्कामात त्यांनी ' माणूस 'साठी काही खास मुलाखती घेतल्या. भारतीय लोकशाहीची आगामी दहा वर्षे हा या मुलाखतींचा सर्वसाधारण विषय होता. राजकीय कार्यकर्त्यांच्या दोन मुलाखती या अंकात दिल्या असून दिल्ली विद्यापीठातील एक प्राध्यापक व प्रसिद्ध हिंदी साहित्यिक जैनेंद्रकुमार जैन या दोघांच्या मुलाखती पुढील अंकात प्रसिद्ध होतील.

एक

## श्री. त्रिदिव चौधरी

रिव्होल्युशनरी सोशलिस्ट पार्टीचे
लोकसभा सदस्य, बंगाल

भारतातील आजची संसदीय लोकशाही ब्रिटिश धर्तीच्या लोकशाही पद्धतीवर व ब्रिटिश परंपरांवर घेतलेली आहे. या लोकशाही पद्धतीची पाळेमुळे अजून रुजलेली नाहीत. परिणामी प्रारंभापासूनच जनतेच्या मूलभूत लोकशाही हक्कांवर नित्य नवी, वाढती आक्रमणे होत आलेली आहेत. या आक्रमणांनी आता उच्चांक गाठला गेला.

राजकीयदृष्टया जागरूक असलेले वा बुद्धिजीवी असे मूठभर लोक सोडता, सर्व सामान्य माणसास, त्यांच्या राजकीय वा नागरी हक्कांवर काही गदा आली आहे याचीही जाणीव नाही. सर्वसामान्य माणसे आर्थिक समस्या काही आल्या तरच चिंतित होतात, त्यांच्यावर काही परिणाम होतो. अन्नधान्याची कमतरता, महागाई, बेकारी या जीवन असह्य करणाऱ्या प्रश्नांशीच त्यांचा काही संबंध असतो.

जोपर्यंत राष्ट्राची अर्थव्यवस्था कोलमडण्याच्या अवस्थेत येत नाही, तोपर्यंत अशा प्रकारच्या आर्थिक अडचणींना राजकीय व प्रशासकीय पातळीवर तोंड देणे सत्ताधारी वर्ग व नेतृत्वास फारसे जड जात नाही. म्हणूनच, लोकशाहीवादी अशा कोठल्याही चळवळीस लोकाभिमुख आशय, विशेषतः ग्रामीण भागातील दलित भूमिहीनांसारख्या शोषित जनसमूहांच्या दृष्टीने काही अर्थ असला पाहिजे असे मला वाटते. अशा प्रकारच्या ठोस आशयावर आधारीत असल्याशिवाय व व्यापक जन सहभागाशिवाय लोकशाही हक्क रक्षणासाठीचा कोणताही लढा यशस्वी होऊ शकत नाही. अगदी आजच्या संसदीय लोकशाहीचे भवितव्य ही या प्रकारच्या 'मास ओरिएंटेड' दृष्टिकोणा अभावी सुरक्षित राहणार नाही. घटनादत्त लोकशाही अधिकारांचा संकोच या विरुद्धचा लढाही जनतेच्या सुबुद्ध पाठिंब्याशिवाय व प्रत्यक्ष सहभागाशिवाय पुढे जाऊ शकणार नाही. बिहारमधील जयप्रकाशजींचे आंदोलन अशा प्रकारे जनताभिमुख व्हायच्या बेतात होते. ' जनता सरकार ' या कल्पनेत असे सामर्थ्य होते. तथापि ही कल्पना शुद्ध स्वरूपात व सुयोग्य पद्धतीने, रचनात्मक पद्धतीने जनतेसमोर येण्यापूर्वीच चळवळ तुलनेने वर-वरच्या अशा कायदेशीर, घटनात्मक निवडणूकसंबंधी समस्यांमध्ये अडकून पडली व तिथेच अवरोध निर्माण झाला. सत्ताधारी पक्षनेतृत्वास नेमकी संधी मिळाली आणि चळवळ त्यांच्या सत्ताकेंद्रांना धोकादायक ठरण्यापूर्वीच त्याने पहिला घाव घातला. परिणामी लोकशाहीवादी चळवळीस एक धक्का बसून ती मागे हटली हे नाकारता येणार नाही.

आज आपल्या देशात ' सोशल फॅसिस्ट स्वरूपाची सर्वाधिकारशाही आहे. ही सर्वाधिकारशाही समाजवाद, जनतेचे हक्क, दुर्बल घटकांना आर्थिक न्याय वगैरेची भाषा बोलते; पण प्रत्यक्षात मात्र एका पक्षाची सर्वाधिकारशाही व सर्व प्रकारच्या विरोधास दडपणे हे तिचे स्वरूप आहे. हे सर्वाधिकारशहा अर्ध-मार्क्सवादी भाषेतही बोलतात. येथे मार्क्सवाद-लेनिनवादावर बंदी नाही; पण औद्योगिक कामगार व भूमिहीन शेतमजुरांच्या न्याय मागण्यांवर आधारित, बडे मक्तेबाज भांडवलदार, उद्योगपती, बागायतदार व नवश्रीमंत ग्रामीण भांडवलदारांविरुद्धचे लढे मिसा, डी. आय. आर. यासारखे कायदे लावून दडपून टाकण्यात आले आहेत. म्हणूनच मी यास ' सोशल फॅशिस्ट ' सर्वाधिकारशाही असे म्हणतो.

प्रश्न – पुढील काळात सरकार कशा तऱ्हेने कृती करील, वागेल?

उत्तर – आपली सत्ता अधिक मजबूत करण्याकडे यापुढील सरकारी कृतीचा रोख राहील. जे काही जनतेचे लोकशाही हक्क शिल्लक आहेत त्यावर आणखी प्रहार होतील. कोणत्याही जनसंघटनेत जी काही संघटनात्मक ताकद उरली असेल ती खतम करण्यासाठी सर्व प्रकारचे दमन केले जाईल. आणिबाणीमुळे झालेले फायदे टिकाऊ बनविण्याच्या कारणाखाली लोकसभेच्या निवडणुका पुढे ढकलण्यात आल्या आहेत. पण हे फायदे म्हणजे अन्य काही नसून सत्ताधाऱ्यांना स्वतःची सत्ता अधिक मजबूत करण्यासाठी मिळालेली संधी आहे. सत्ताधारी वर्गाची सत्ता बळकट करणे आणि मक्तेबाजांना अधिक मदत करणे हा या कृतीचा उद्देश आहे. स्वाभाविकपणे आणि तार्किकदृष्टया, शक्ती, दमन, प्रलोभने, लाचलुचपत व राजकीय दबाव-

दडपण यांचा अवलंब करून सत्ताधारांच्या सत्तेस असणारी उरली सुरली आव्हानेही नष्ट करण्याचा प्रयत्न केला जाईल. याचबरोबर, जनमानसातली स्वतःची प्रतिमा उजळविण्यासाठी, आणखी काही लोकप्रिय घोषणा समोर येतील. साम्राज्यवादविरोध व पुरोगामित्वाच्या नावाखाली अमेरिकाविरोधी व रशियानुकूल असे धोरण हे परराष्ट्रविषयक धोरणाचे मुख्य सूत्र राहील.

पण याच वेळेला परदेशी मक्तेदार भांडवलशहा व अनेक राष्ट्रीय (कोलॅबोरेशन) कंपन्यांशी नवे आर्थिक संबंध प्रस्थापित केले जातील. देशान्तर्गत–गुजरातचे जनता मोर्चाचे सरकार अधिकाधिक दडपणाखाली येईल. काँग्रेस व उजव्या कम्युनिस्टांखेरीज अन्य सर्व कामगार संघटना व जनसंघटनांवर बंदी घातली जाईल किंवा राजकीयदृष्ट्या त्यांना हतप्रभ केले जाईल.

**प्रश्न** : या परिस्थितीत विरोधी शक्तींनी काय करावे ?

**उत्तर** : हे सारे लक्षात घेता, खऱ्या अर्थाने लोकशाहीवादी अशा विरोधी शक्तींनी आपल्या तुलनेने तोटयाच्या परिस्थितीचा विचार गंभीरपणे केला पाहिजे. आपल्या संघटनात्मक त्रुटींचा विचार केला पाहिजे. त्यानंतर सर्व लोकशाहीवादी शक्तींची, जनतेच्या गरजा लक्षात घेऊन आखल्या गेलेल्या किमान कार्यक्रमावर आधारित अशी एकजूट करण्याचा प्रयत्न झाला पाहिजे. सघन संघटनात्मक कामानंतरच सरकार व सत्ताधारी पक्षाशी विरोध केला पाहिजे. डाव्या लोकशाहीवादी पक्षसंघटनांची संघटनात्मक ताकद तोडण्याचा प्रयत्न सत्ताधारी पक्ष व त्याची पोलीस यंत्रणा पदोपदी करणार असल्याने कधी कधी तावडतोब विरोध करणेही अपरिहार्य होऊन बसेल. डावपेच म्हणून, पुढील मोठ्या संघर्षासाठी शक्ती राखून ठेवण्याचे धोरण स्वीकारले पाहिजे.

**प्रश्न** : राजसत्तेच्या आजच्या स्वरूपात काही बदल (Change in the form of Government) करण्याची काही आवश्यकता आहे का ?

**उत्तर** : आजच्या संसदीय राज्यपद्धतीने प्रत्यक्षात उच्च वर्ग व 'एलिट'ची सत्ताच अधिक मजबूत केली. आपल्या देशात या वर्गाची सत्ता याचा अर्थ भांडवलशहा, उद्योगपती, नोकरशहा आणि उच्च जाती यांची सत्ता असा होतो. प्रातिनिधिक विधिमंडळांची निवड करण्यासाठी दर पाच वर्षांनी प्रत्येक पातळीवर घुसलेल्या नोकरशाही करवी होणाऱ्या निवडणुकांमुळे जनतेच्या किंबहुना तिच्या नियुक्त प्रतिनिधींच्याही हाती काही सत्ता येत नाही. परिणामी परदेशी वसाहतवादी राज्याप्रमाणेच, या राजवटीतही जनता प्रशासनापासून तेवढीच अलिप्त राहते. गोऱ्या नोकरशाहीऐवजी आता तपकिरी नोकरशाही आली आहे, एवढाच काय तो फरक ! हीच नोकरशाही सरकारच्या सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगधंद्यांचे संचालन करते. याचा परिणाम म्हणून आपल्याकडे बळकट नोकरशाही, सरकारी भांडवलशाही निर्माण झाली आहे. प्रत्यक्षात खाजगी मक्तेदार भांडवलशाही आणि सरकारी मक्तेदार भांडवलशाही हातात हात घालून चालतात, जनतेच्या पैशावर. त्यामुळेच राष्ट्रीयीकरणाच्या विस्ताराने समाजवाद वा लोकशाहीकडे वाटचाल होण्याऐवजी भांडवलशाहीचेच बळ वाढविले आहे.

या साऱ्याचा अर्थ असा की, खरेखुरे लोकशाहीवादी परिवर्तन घडवून आणण्यासाठी आजच्या मूलभूत राजकीय रचनेत तर बदल करावाच लागेल, त्याचबरोबर समाजाचे आर्थिक संघटनही रॅडिकली बदलावे लागेल. शेतीत व कारखान्यात राबणाऱ्या कष्टकऱ्यांच्या हाती खरीखुरी आर्थिक व राजकीय सत्ता देणाऱ्या मूलभूत आर्थिक व राजकीय परिवर्तनाशिवाय या देशात आज असलेल्या औपचारिक लोकशाहीस काहीही अर्थ नाही.

आजच्या राज्यपद्धतीत बदल करून त्या ऐवजी अमेरिकन व फ्रेंच पद्धतीची अध्यक्षीय प्रकाराची राजवट येथे आणल्याने इथल्या सर्वाधिकारवादी प्रवृत्तींना बळच मिळेल आणि जनतेच्या स्वातंत्र्यास दडपण्यासाठी सत्ताधाऱ्यांना त्याने मदतच होईल.

खरा प्रश्न आहे तो असा की, नवीन व्यवस्था वा पद्धती आपण कशी निर्माण करू शकू ? माझ्याजवळ कोणताही आयता, तयार प्रकार (Formula) नाही. खऱ्या लोकशाहीवादी रॅडिकल शक्तींचे संघटन आज फार दुर्बल आहे. खुल्या राजकीय कृतीला सध्या वावच राहिलेला नाही.

**प्रश्न** : नजिकच्या भविष्य काळात राज्यपद्धतीत काही बदल संभवतो का ?

**उत्तर** : सत्ताधाऱ्यांच्या अमर्याद सत्ता भोगण्याच्या मार्गात आडवी येणाऱ्या न्यायव्यवस्थेचे अधिकार काढून घेण्यापलीकडे आहे. या व्यवस्थेत (प्रकारात) येत्या दहा वर्षांत तरी काही बदल होतील असे मला वाटत नाही. कारण आणिबाणीमुळे मिळालेल्या अधिकारांनी युक्त अशी सध्याची प्रशासनाच्या हातातील संसदीय पद्धती सत्ताधाऱ्यांना सध्या अमर्याद अधिकार उपभोगू देत आहे. म्हणूनच अध्यक्षीय पद्धतीचे सरकार येथे आणण्याविषयीच्या सूचनांच्या गंभीर विचारानंतर सत्ताधारी पक्षाने तूर्त तरी तो विचार सोडल्याचे दिसत आहे. कारण आहे ही व्यवस्था तशीच राहिली तरी तिचे त्यांना होणारे फायदे त्यांना दिसत आहेत. प्रशासकीय शाखेने (executive branch) एकदा स्वतःच्या हाती घेतलेले अधिकार ती सोडील असे मला वाटत नाही. आणिबाणीतच निवडणुकाही होऊ शकतील. कारण घटनेप्रमाणे आणिबाणीत निवडणुका घेण्यास कायदेशीर अडचण काहीच नाही. त्या 'मॅनेज्ड इलेक्शन्स' असतील एवढेच ! या निवडणुकांतही सत्ताधारी पक्षास बहुमत सहज प्राप्त होईल. विरोधी पक्षांजवळ साधन सामग्री, ताकद व संघटनात्मक ताकदही, या प्रकारच्या 'मॅनेज्ड' निवडणुकांना तोंड देण्यासाठी असणार नाही.

**प्रश्न** : नजिकच्या काळात निवडणुका होतील असे आपणास वाटते का ?

**उत्तर** : लोकसभेचे आयुष्य आणखी एक वर्षाने वाढविण्यास कायदेशीर अडचण नाही. आणिबाणीच्या काळात एका वेळी एक वर्षाने लोकसभेचा अवधी वाढविण्याचा अधिकार भारतीय घटनेनेच सरकारला दिला आहे. सत्ताधारी पक्षनेतृत्त्वाच्या नफ्या-तोट्याच्या ताळेबंदावर (calculation of balance of advantages) निवडणुका होणार की नाही हे अवलंबून आहे. काहीही झाले तरी पूर्वीसारख्या मोकळ्या वातावरणातील निवडणुका आता पुन्हा होणे शक्य नाही.

**प्रश्न** : येथे कोणत्या प्रकारची लोकशाही असावी असे आपणास वाटते ?

उत्तर : जनतेचा सहभाग असणारी लोकशाही (Participatory Democracy) प्रत्येक थरातील जनतेस आपल्या (व्यवहारांविषयी) जीवनाविषयीचे निर्णय घेण्याचे व तसे संघटन करण्याचे अधिकार असले पाहिजेत. जनतेस अधिकार असल्याची जाणीव झाली पाहिजे. आपल्याला अधिकार आहेत असे जनतेस मनापासून वाटले पाहिजे. आजच्या पंचायती राज्यात जनतेला काहीही सत्ता मिळत नाही, अधिकार मिळत नाहीत. नोकरशाहीच त्याचे संपूर्ण नियंत्रण करते. पंचायतींना दिलेल्या कामाचा वाव अतिशय मर्यादित आहे. माझ्या मनात जे आहे ते साधारणत: १९१७ च्या रशियन क्रांतीच्या वेळच्या मूळ 'सोव्हिएट्स'च्या प्रत्यक्ष लोकशाही (Direct Democracy) चे स्वरूप आहे. रशियातील त्या वेळच्या सोव्हिएट्सची सही सही नक्कल येथे करण्याचे काहीच कारण नाही. प्रत्येक थरावरचे अधिकार व सत्ता जनतेच्या हाती असले पाहिजे हे मुख्य सूत्र. ◻

दोन

## श्री. किशन पटनायक

(माजी संसद-सदस्य) पूर्वी समाजवादी पक्षात, सध्या अपक्ष.

---

लोकशाहीचे भविष्य हे बऱ्याच अंशी आपण लोकशाहीची व्याख्या व अर्थ काय करतो यावर अवलंबून राहील. तिच्या विविध अंगांचे रक्षण करणे, नवीन भर घालणे आणि त्यात काही कमी-जास्त करण्यासाठी जसा संघर्ष बराच काळपर्यंत चालू राहील, तसाच झगडा लोकशाहीच्या व्याख्येबद्दलही चालू राहील.

या प्रश्नाचा मुळापासून तात्त्विक व सैद्धांतिक विचार करायचा असेल तर या प्रश्नापासून सुरुवात करावी लागेल—साम्राज्यवाद किंवा एकाधिकार भांडवलशाहीत लोकशाही असू शकते काय ? १९४७ च्या पूर्वीचा इंग्लंड हे जगातील सर्वात मोठे साम्राज्य होते. आपण त्याचवेळी तेथे लोकशाही होती असे म्हणतो, मानतो. स्वतंत्र भारताची घटना तयार करताना त्या लोकशाहीस आदर्श मानण्यात आले होते. तर्कासाठी असे म्हणता येईल की ब्रिटनचे सरकार ब्रिटिश नागरिकांसाठी लोकशाही स्वरूपाचे होते, भारतीय नागरिकांसाठी साम्राज्यवादी वा हुकुमशाही होते. पण असे म्हणणे हेही, लोकशाही ही अविभाज्य अशी वेगळी व्यवस्था (राज्यपद्धती) नाही. एका व्यवस्थेचा तो गुण असू शकतो, हे मान्य करण्यासारखेच आहे. या न्यायानुसार कम्युनिस्ट पक्षाच्या सदस्यांसाठी लोकशाही परंतु बाकी नागरिकांसाठी हुकुमशाही असे एकाच व्यवस्थेचे स्वरूप असू शकते. सोज्वळ सैद्धांतिक भाषेत यालाच कामगारांच्या लोकशाहीचो भांडवलदार वर्गावर हुकुमशाही असे म्हणता येते.

यावरून असे निष्कर्ष निघतात— १ : लोकशाही ही स्वत: वेगळी अशी राज्यपद्धती नाही. एका व्यवस्थेचा तो गुण असू शकतो. २ : लोकशाही हा केवळ पोकळीतला साचा असू शकत नाही की, कोठल्याही सामाजिक वास्तवतेत तो 'फिट्' बसेल. सामाजिक, आर्थिक वास्तविकता सोडून कोठलीही राजकीय चौकट बनू शकत नाही. घटना हा एक कायद्याचा साचा आहे. एतद्देशीय सामाजिक वस्तुस्थिती भिन्न असताना एखाद्या बाहेरच्या समाजाची घटना लागू केली की, त्या घटनेतील 'परंतु' 'जर' 'इत्यादी' यांच्या आधारेच इथल्या सामाजिक वस्तुस्थितीतून नाना विकृती निर्माण होतात. उदाहरणार्थ १९१० च्या भारतात १९५० सारखी घटना लागू केली गेली असती तर ज्या प्रकारची राजकीय परिस्थिती बनली असती, त्या परिस्थितीत राजे-महाराजे व साधूंचा एखादा राजकीय पक्ष काँग्रेसच्या विरोधात उभा झाला असता. सुप्रीम व हायकोर्टाचे अधिकांश न्यायाधीशही या लोकांपैकीच असते.

म्हणूनच घटनेची आयात किंवा अनुकरण हा एक धोकादायक प्रकार आहे. नवस्वतंत्र देशाची घटना बनविणे ही एक सृजनात्मक प्रक्रिया. तत्कालीन सामाजिक वस्तुस्थितीच्या संदर्भात एका भावी समाजरचनेचा संकल्प करून अभिप्रेत समाजपरिवर्तनास अनुकूल शक्तींच्या विकासास सूट आणि सवलती कशा देता येतील, या शक्तींच्या विकास-मार्गात काही अडचणी येणे शक्य असेल तर त्यांचे निराकरण कसे होईल असा विचार व योजना करणे ही एक सृजनात्मक प्रक्रिया आहे. पण भारतीय घटना ही सृजनाने नव्हे, संकलनाने तयार झाली आहे. ज्या घटनांवर ही घटना आधारित आहे त्या साऱ्या पश्चिमी विकसित भांडवलशाही समाजाच्या घटना होत्या.

माझे असे मत आहे की, आशिया किंवा आफ्रिकेतील कोणत्याही अविकसित देशात पश्चिमेकडच्या विकसित भांडवली देशाची लोकशाही घटना लागू केल्याने त्या देशात हुकूमशाहीच येईल, येणे अपरिहार्य आहे. कारण अशा देशात केंद्रीभूत आणि शहरी राजकारण चालते. तेथील मोठा संघटित मध्यमवर्ग मुख्यत: शहरी असतो आणि कामगार वर्ग ही त्याच्या आसपासच असतो. अशा देशातले सारे राजकारण—मग ते द्विपक्षीय असो वा त्रिपक्षीय—केंद्रीय सरकार हाच आधार मानून चालते. एखाद्या अविकसित देशाचे राजकारण जेव्हा अशा तऱ्हेने केंद्रीभूत होते तेव्हा पैसेवाले व उच्चवर्गीय लोकच सत्ताधारी आणि विरोधी पक्षात विभागले जातात. तुलनेने कमी संपत्ती असलेल्यांना सुरुवातीला गरीब जनसमूहांचाही पाठिंबा मिळतो; पण जसजसा या कमी श्रीमंत लोकांच्या हाती सत्तेच्या आधारे संपत्तीही येऊ लागते, तसतसे तेही जनतेपासून दूर होऊ लागतात आणि मग पुन्हा नव्या प्रकारे पक्ष—विपक्ष बनू लागतात. (पक्ष—त्याग इ. च्या द्वारे) असे झाले की मग या दोन एकवर्गीय गटाची आपापसातील लढाई हाच देशाच्या राजकारणाचा मुख्य प्रवाह बनतो. जनता या लढ्याच्या बाबतीत उदासीन बनते आणि विरोधी गटांना काबूत राखण्यासाठी हुकुमशाही मार्गांचा अवलंब करण्याची गरज सत्ताधाऱ्यांना वाटते.

आजच्या आणिबाणीला जे लोक हुकुमशाहीचा प्रारंभ मानतात त्यांच्या विचारांचा आधार हाच असू शकतो की, सत्ताधारी वा विरोधी पक्ष—कोणालाही आज जनतेचे सहकार्य नाही. विरोधी पक्षांच्या बाजूला जर जनता असली तर हुकुमशाहीस सुरुवातीसच ती रोकेल. सत्ताधारी पक्षामागे जर जनता असली तर (क) हुकुमशाहीची गरजच लागणार नाही. (ख) जन-शक्ती विकसित सक्रिय आणि निर्णायक व्हावी म्हणून लोकशाहीची आवश्यकता असेल.

येथे 'लोकशाही' आपण कोणत्या अर्थाने घेतो ? लोकशाही ही

जर व्यवस्था नसून, एका व्यवस्थेचे ते एक अंग असेल तर ते अंग कोणते ? हुकुमशाही आणि लोकशाही यात मूलभूत फरक फक्त एकच आहे. तो म्हणजे असहमती वा मतभेद. ज्या प्रमाणात या मतभेदास वाव असेल, ज्या प्रमाणात मतभेद विकसित व संघटित होण्याची सोय उपलब्ध असेल, ज्या प्रमाणात न्यायपालिका या मतभेदास संरक्षण देईल त्याच प्रमाणात त्या राज्यास लोकशाही म्हणता येईल. या मतभेद–स्वातंत्र्याचा उपभोग घेणारा अल्पमतातला एखादा वर्ग किंवा विशिष्ट पक्ष असू शकेल, किंवा बहुमतवाला पक्ष असू शकेल किंवा संपूर्ण समाज असू शकेल. ग्रीक देशातील शहरी लोकशाहीत गुलामांना लोकशाही अधिकार उपलब्ध नव्हते.

मतभेदाचे क्षेत्र किती विस्तीर्ण असावे, त्याचे संरक्षण करणारी न्यायपालिका कितपत सार्वभौम असावी, मतभेद प्रगट करण्यासाठी व संघटित होण्यासाठी सवलती कशा प्रकारे मिळतील, न्यायपालिकेचे सार्वभौमत्व संपुष्टात आल्यावर या मतभेदस्वातंत्र्याची हमी कोण घेईल, हेच भारतीय लोकशाहीच्या आगामी दशकाचे महत्त्वाचे प्रश्न असतील. परिभाषेच्या पातळीवर तो एक जीवन–मरणाचा प्रश्न असेल.

चर्चेसाठी या प्रश्नांची विभागणी चार गटांमध्ये करता येईल : १ : मूलभूत अधिकार, २ : संपत्तीचा अधिकार व नियमन, ३ : पक्षोपक्षीय राजकारण आणि ४ : विकेंद्रीकरण.

१ : मूलभूत अधिकार हे मूलतः मतभेदाचेच असतात. सत्तेशी मतभेदाचा अधिकार हा लोकशाहीतील अत्यंत महत्त्वाचा मूलभूत अधिकार आहे. मूलभूत अधिकारात संपत्तीचा अधिकार समाविष्ट करणे ही मूलभूत अधिकारांची विडंबना आहे. कारण या अधिकारामुळे इतर मूलभूत अधिकार कुंठित आणि नष्ट होतात. उदाहरणार्थ– मतभिन्नतेच्या विकासासाठी वृत्तपत्रे सर्वाधिक साहाय्यक व्हायला हवीत. पण मोठ्या संपत्तीचे मालक हेच जर वर्तमानपत्रांचेही मालक असतील तर त्यांच्या मक्तेदारीमुळे एक तर मतभेद–अधिकार नष्ट होईल किंवा त्याचे नियंत्रण प्रतिगामी दिशेने करण्याचा प्रयत्न ते करतील. सत्तानियंत्रित वर्तमानपत्रे हा स्वतंत्र वर्तमानपत्राचा पर्याय होऊ शकत नाही. सत्ता आणि संपत्ती या दोहोंच्या नियंत्रणातून असहमती-अधिकार मुक्त व्हावा लागेल. त्याचप्रमाणे संघटनेवर सत्ता व संपत्तीच्या नियंत्रणामुळे असहमती कुंठित होते. संपत्तीचा मूलभूत अधिकार हा प्रत्यक्षात धनिक वर्गाचा आर्थिक अधिकार आहे. रोजगार आणि शिक्षणाचा मूलभूत अधिकार हा गरिबांचा मूलभूत अधिकार होईल. म्हणून संपत्तीचा अधिकार मूलभूत अधिकारांमधून काढून टाकून शिक्षण, रोजगार व आरोग्य यांचे अधिकार हे मूलभूत अधिकार म्हणून मान्य करून घेणे, त्यांची प्रतिष्ठापना करणे हा आगामी लोकशाही संघर्ष असेल.

**प्रश्न** : आज काल संपत्तीचा मूलभूत अधिकार काढून टाकून रोजगार–अधिकार ( Right to work ) मूलभूत अधिकार करण्याची मागणी जोर धरत आहे. सत्ताधारी पक्षातील काही जण ती करीत आहेत याबद्दल आपले मत काय आहे ?

**उत्तर** १ : वर वर पाहता ही मागणी फार आकर्षक वाटते. तथापि मूलभूत अधिकारांची अमलबजावणी करण्याचा / करविण्याचा अधिकार न्यायालयांना नसेल तर ही चर्चा निरर्थक आहे. न्यायालयांचा हा अधिकार सध्या रद्दबातल ठरविण्यात आला आहे. एकीकडे हा न्यायालयांचा अधिकार रद्द ठेवणे व दुसरीकडे अशी मागणी करणे ही केवळ धूळफेक / दिशाभूल आहे. नोकरशाहीस कार्यक्षम बनविण्याची भाषा आज चालली आहे–तीही अशीच फसवी आहे. नोकरशाही–विशेषतः आज ज्या स्वरूपात ती आहे तशी–लोकशाहीला निरर्थक बनविणारी एक महत्त्वाची बाब आहे. त्यामुळे जोपर्यंत आजच्या नोकरशाहीची आहे ही रचना / स्वरूप नष्ट होत नाही तोपर्यंत या सगळ्या पोकळीतल्या चर्चा आहेत.

२ : संपत्तीचा अधिकार मूलभूत अधिकारातून काढून टाकण्यानेच केवळ संपत्तीचे कुप्रभाव नष्ट होणार नाहीत. संपत्तीच्या बाबतीतले आपले संपूर्ण तत्त्वज्ञानच या देशाला ठरविले पाहिजे. ईशोपनिषदात ' संपत्ती कुणाची ' हा प्रश्न विचारण्यात आला आहे. आपल्याला या प्रश्नाचे उत्तर म्हणून आपल्याला सरकारची मालमत्ता कोणती, राज्याची कोणती, जिल्हा, गाव वा सहकारी समितीची संपत्ती कोणती हे सांगावे लागेल. कोणती संपत्ती किती प्रमाणात, कोणत्या प्रमाणात खाजगी असेल तेही सांगावे लागेल. या प्रश्नांची उत्तरे योग्य प्रकारे शोधल्याने संपत्ती मर्यादित होईल. संपत्ती मर्यादित झाल्याने तिचे लोकशाहीविरोधी गुण नाहीसे होतील. कोणत्याही व्यक्तीजवळ वा सरकारकडे अमर्याद संपत्ती राहिल्याने इतर नागरिकांच्या मूलभूत अधिकारांवर त्याचा वाईट परिणाम होतो. संपत्तीचे संचालन कसे होईल, त्या संपत्तीशी कामगारांचा संबंध काय राहील ? या प्रश्नांचे उत्तर न देताच आपण केवळ सरकार संपत्ती केव्हांही घेऊ (ताब्यात) व देऊ शकते असे म्हणू तर त्याचा अर्थ व परिणाम एवढाच होईल की सरकार एका बिर्लाला हटवून त्या जागी दुसऱ्या बिर्लाला बसवील, त्या शेठजीला काढून टाकून त्या गादीवर एक नोकरशहा बसविला जाईल; गादी तीच राहील, शोषण व दमन चालूच राहील. न्यायपालिका खाजगी संपत्तीविषयी नेहमीच यथास्थितीवादीच राहते असे म्हणणे खोटे आहे. कारण आपल्या घटनेमध्ये संपत्तीचा अधिकार हा एक मूलभूत अधिकार आहे एवढेच नव्हे, तर आजपर्यंत संसद, विधानमंडळे, मंत्रिमंडळे यापैकी कोणीही संपत्तीविषयक पर्यायी तत्त्वज्ञानच बनविले / सांगितलेले नाही. अमर्याद खाजगी संपत्ती व अमर्याद सरकारी संपत्ती या दोन पर्यायांव्यतिरिक्त कोणत्याही पक्षाने वा आयोगाने याविषयी वेगळी अशी काहीही स्पष्ट व ठोस भूमिका घेतलेली नाही. संसद आणि विधिमंडळे जोपर्यंत संपत्तीविषयक एखादे ठोस तत्त्वज्ञान तयार करून पुढे ठेवीत नाहीत तोपर्यंत न्यायपालिका या केवळ शब्द आणि भाषेच्या जादूगार बनून काम करतील.

३ : राजकारणात जनतेचे सहकार्य व सक्रियता हा लोकशाहीचा एक शक्ति-स्रोत आहे. सत्ताधारी व विरोधी पक्ष दोघांचाही या प्रवाहापासून जेव्हा संबंध तुटतो तेव्हा लोकशाही वाचविण्यासाठी राजकीय क्षेत्राबाहेरचेच कोणी संरक्षक व हमीदार शोधावे लागतात. अन्यथा न्यायपालिका व वर्तमानपत्रे यावर घाला घालून मतभेदास (असहमतीस) समूळ नष्ट करण्याची प्रवृत्ती सत्ताधाऱ्यांमध्ये बळावू शकते. यासाठीच एखाद्या ' अपक्ष ' शक्तीच्या निर्मितीची गरज भासू लागली आहे. जनतेतील राजकीय आणि सामाजिक जाणिवा वाढीस लावणे हे या अपक्ष शक्तीचे काम असेल. या शक्तीस निवडणुकीच्या

व सत्तेच्या राजकारणापासून अलिप्त राहावे लागेल. सत्ताकांक्षा न ठेवता जन-अधिकारांसाठी व सामाजिक परिवर्तनासाठी उक्ती व कृतीने सारखेच प्रतिबद्ध असलेल्या अशा अपक्ष व्यक्तींची आचार्य-शक्ती कितपत विकसित होऊ शकेल हे विनोबांच्या प्रयत्नावर अवलंबून राहील. आजच्या तात्कालिक परिस्थितीच्या संदर्भात दुसरे काहीही नजरेसमोर नसताना विनोबांचा उपयोग होऊ शकतो. ज्या पक्षावर कायद्याने बंदी घालण्यात आलेली नाही अशा पक्षांचे नेहमीचे कामही चालू नाही, हे सर्व विरोधी पक्ष मृतप्राय झाले आहेत याचा पुरावा आहे. विरोधी पक्षांचे पुनरुज्जीव व पुनर्संघटन एकदम करावे लागेल. सरकार आणि विरोधी पक्षांशी जनतेचे सहकार्य वाढविणे आणि एका अपक्ष शक्तीचा उदय–या त्रिविध कामांच्या प्रगती किंवा अधोगतीवरच लोकशाहीच्या क्षितिजांचा विस्तार अवलंबून आहे.

४. असहमती हेही लोकशाहीचे नकारात्मक अंग नाही. हे एक सकारात्मक अंग आहे. कारण या द्वारेच जनतेत नवसृजन होते. पण सत्ता व संपत्तीच्या संचालनात जेव्हा सामान्य माणसाचा सहभाग नसतो तेव्हा असहमतीचे क्षेत्र नकारात्मक होते एवढेच नव्हे तर त्यावर सरकार आणि विरोधी पक्ष दोन्हींचे केंद्रीभूत संघटन स्वार होते केंद्रीभूत व्यवस्थेत जनतेचा सहभाग असू शकत नाही. वर्तमानपत्रांनाही सत्ता व संपत्तीच्या कुप्रभावापासून वाचविण्याचे विकेंद्रीकरण हे एकच साधन आहे. गेल्या २७-२८ वर्षांत केवळ सत्तेच्या विकेंद्रीकरणाची चर्चा सुरू झाली होती, पण त्याचीही भ्रूणहत्या झाली. भावी दशकात सत्ता, संपत्ती आणि वृत्तपत्रांच्या विकेंद्रीकरणाच्या बाबतीत मूलभूत विचार करावा लागेल. लोकशाहीस 'नकारात्मकते'पासून वाचविण्याचा प्रयत्न यात सहाय्यभूत होऊ शकतो.

विकेंद्रीकरणाचे, वरील तीन अंगांव्यतिरिक्त आणखी एक अंग आहे–जातिप्रथेचे ब्राह्मणकेंद्रित अशा या समाजात शूद्र, दलितांचा प्रभाव शून्य असल्याने राजकीय नेतृत्वातही काही उच्च जाती व घराण्यांचा एकाधिकार दिसून येतो. यामुळे हुकुमशाहीस मदतच होते. गेल्या काही वर्षांत राजकीय व प्रशासकीय हुद्द्यांवरील विशिष्ट जाती वा घराण्याच्या एकाधिकाराविरुद्ध जाणीव जागी होत होती. आज मूलभूत अधिकार आणि संपत्तीचा अधिकार यांच्या झगड्यात विकेंद्रीकरणाचे सर्व पैलू, विशेषतः हा पैलू दृष्टीआड जाण्याचा धोका आहे. पण विकेंद्रीकरणाचे हे पैलू विसरण्याने लोकशाहीचा आत्मघात होईल. पंचायती राज्य व जनता सरकार या दोन्हींचा पुनरुद्धार करणे आणि या विचारांना ठोस स्वरूप देणे यासाठी प्रत्यक्ष काम करणे ही तत्कालीन राजकीय उद्दिष्टांत अडकून न पडणाऱ्यांची जबाबदारी आहे.

**प्रश्न** : खरी लोकशाही येथे आणायची असल्यास काय करावे लागेल हे आपण सांगितलेत. आता, कोणत्या प्रकारची लोकशाही येत्या दहा वर्षांत प्रत्यक्षात राबविली जाईल असे आपणास वाटते ?

**उत्तर** : यासंबंधी नक्की काही सांगणे कठीण आहे. पण एवढे मात्र नक्की की येथून पुढच्या काळात येथे मार्गदर्शित लोकशाही (Guided Democracy) सुरू होईल. जे विरोधी पक्ष 'लेजिटिमेट' आहेत असे शासकीय नेतृत्वास वाटते ते पक्ष, न्यायव्यवस्था आणि वृत्तपत्रे यांना प्रत्यक्ष 'मार्गदर्शनाखाली' ठेवले जाईल. त्यांनी केव्हा कसे वागावे व करावे यासंबंधी वेळोवेळी सूचना दिल्या जातील.

कारावास भोगण्याच्या तयारीने केले गेलेले सत्याग्रह, मोर्चे, निदर्शनेही सहन केली जाणार नाहीत. असे करणाऱ्या पक्ष-संघटनांवर कायद्याने बंदी घातली जाईल. थोडक्यात २६ जून १९७५पूर्वीची परिस्थिती आता पुन्हा येणे शक्य नाही.

**प्रश्न** : आज होत असलेल्या व येथून पुढे होणाऱ्या भारताच्या अंतर्गत राजकीय स्थित्यंतरावर आंतरराष्ट्रीय दबाव–दडपणांचा काही परिणाम होईल का ?

**उत्तर** : अजीबात नाही. इथल्या राजकीय परिस्थितीवर प्रभाव पाडू शकतील असे दोनच मोठे देश आज तरी आहेत. रशिया व अमेरिका (आणि पश्चिमी राष्ट्रांचा गट) पैकी सोव्हिएट रशियाला भारतात समाजवाद यावा असे मनापासून वाटत नाही आणि अमेरिका व पश्चिमी राष्ट्रगटालाही येथल्या अंतर्गत लोकशाहीचे फारसे सोयरसुतक नाही. रशियाच्या भारताकडून अपेक्षा स्वच्छ आहेत. भारताला रशियन परराष्ट्रविषयक धोरणास बांधून घेणे, त्याची अर्थव्यवस्था पूर्व युरोपीय अर्थव्यवस्थेपेक्षा दुर्बल राखणे आणि जागतिक लष्करी योजनांमध्ये काही 'स्ट्रॅटेजिक' फायदे मिळविणे ही रशियाच्या भारतविषयक धोरणाची मुख्य उद्दिष्टचे आहेत. तर अमेरिका व पश्चिमी राष्ट्रगटाचा स्वार्थ भारतात आपल्या भांडवलाची निर्यात करणे हाच आहे. यासाठी केवळ विरोधी पक्षातच नव्हे, तर सत्ताधारी पक्षातही आपल्याला अनुकूल अशी लॉबी निर्माण करणे व टिकविणे एवढ्यावर राजकीयदृष्ट्या ते समाधानी राहतील. अमेरिकेच्या दृष्टीने भारताचे राजकीय महत्त्व पॉझिटिव्ह दृष्टीने काही नसले तरी भारताला रशियाच्या स्वाधीन करण्याने जगाच्या या भागातील सत्ता-समतोल ढळेल हे त्यांना माहीत असल्याने तेवढे 'निगेटिव्ह' महत्त्व ते भारतास देतात.

□ □


# पॅपिलॉन
# पॅपिलॉन

लेखक : हेन्री शॅरीयर
अनुवाद : रवींद्र गुर्जर

किंमत : पंचवीस रुपये
राजहंस प्रकाशन, पुणे ३०

# फिओडोर डोस्टोव्हस्की

## ( १८२१ ते १८८१ )

### उत्तरार्ध । सुमती देवस्थळे

पॅरिस... झगमगते शहर... पण डोस्टोव्हस्कीला सारेच अपरिचित... सारे अनोळखी ! भयंकर एकाकीपणा वाट्याला आला. ऐतिहासिक स्थळे होती म्हणून बरे. दहा दिवस पॅरिसमध्ये तो राहिला अन् मग इंग्लंड. तेथे हर्झेन या ज्वलंत क्रांतिकारकाशी त्याची भेट झाली. राजकीयदृष्ट्या मतभिन्नता असूनही दोन 'लेखकांचे' एकमेकांशी छान पटले. पाश्चात्य देशांचे निरीक्षण चालू होते. भौतिक प्रगतीचे वारे प्यालेले हे देश डोस्टोव्हस्कीला अनुकरणीय वाटले नाहीत. उलट 'पाश्चात्य देश प्रगतीच्या मागे धावल्याने बरबाद झाले आहेत. यातून रशियाच त्यांना वाचवेल' असा काहीसा संदिग्ध निष्कर्ष त्याने काढला. ( The west is ruined by progress. It is Russia that will save Europe. )

या प्रवासात पॉलिन् सुस्लोव्ह नावाची एक अत्यंत प्रागतिक विचारसरणीची, आत्मरत अशी स्त्री त्याच्या बरोबर होती. वास्तविक तो पॉलिन्च्या प्रेमात पडला होता. पण 'यां चिंतयामि सततं मयिसा विरक्ता' अशी अवस्था असल्यामुळे डोस्टोव्हस्कीची प्रेमभावना एकतर्फी व असफल अशी राहिली. दोघेजण जवळ जवळ २ वर्षे एकत्र रहात असूनही त्यांच्या मनाची जुळणी झाली नाही. ती तर्ककर्कश होती. तो भावनिर्भर होता. दुरावा येणार हे उघड दिसत होते. पॉलिन्चे महत्त्व एवढेच की तिच्या व्यक्तिमत्त्वाचे दर्शन डोस्टोव्हस्कीच्या निरनिराळ्या कादंबऱ्यांत आले. ती त्याच्या जीवनात नाही तरी त्याच्या साहित्यात निश्चितच चिरस्मरणीय झाली.

डोस्टोव्हस्की जरी परदेशी होता तरी तेथून तो टाइमसाठी लेख लिहीतच होता. मध्यंतरी पोलंडमध्ये बंडाळी झाली—अर्थात झारच्या सत्तेविरुद्ध ती बंडाळी होती. त्यात डोस्टोव्हस्कीने पोलंडची बाजू घेणारा एक लेख लिहिला. ही गोष्ट सरकारला पटणे अशक्य होते. लगेच टाइम् पत्रावर बंदी आली. पत्र 'सस्पेंड' करण्यात आले. डोस्टोव्हस्कीला हा धक्का अगदीच अनपेक्षित होता. पैसे संपले. जुगारीत तरी नशिबाचा हात मिळतो का हे पाहण्याचा मोह झाला. नशीब धड नव्हते. कफल्लक अवस्था झाली. संपादकाकडून पैसे मागवून तो मायदेशी आला आणि मग सारे कर्ज फेडण्यासाठी त्याला मानेवर खडा ठेवल्यासारखे लिखाण करावे लागले.

'Notes from the underground' ही कादंबरी डोस्टोव्हस्कीने लिहिली तेही एकप्रकारचे आत्मनिवेदनच होते. यातना आणि कष्ट यांची गाथा रचली होती. निवेदन अगदी सरळ—ये हृदयीचे ते हृदयी घातले जाण्याइतके प्रत्ययकारी. या 'नोटस्नां' खूप लोकप्रियता मिळाली. एका अप्रसिद्ध अशा सामान्य टीकाकाराने त्याला सांगितले, 'डोस्टोव्हस्की, आता तुमचा खरा सूर लागला आहे. याच पट्टीत तुम्ही लिहीत चला.' हा प्रामाणिक अभिप्राय डोस्टोव्हस्की कधीही विसरला नाही.

□

डोस्टोव्हस्कीची पत्नी कधी सुखासमाधानाने राहिली नाही. डोस्टोव्हस्कीसारख्या दरिद्री व दुबळ्या माणसाशी आयुष्य जखडून घेतल्याचा तिला भयंकर पश्चात्ताप होत असे. त्याच्या प्रतिभेचे मोल समजण्याइतकी बौद्धिक कुवत तिच्याजवळ मुळीही नव्हती. ती स्वतः खूप अशक्त, चिरचिरी अशी बनत चालली. तिच्या मागण्या नेहमी वाढत होत्या. ती अगदी मरायला टेकली असली तरी तिचा प्राण कुडी सोडून जाण्यास तयार नव्हता. खूप दिवस अंथरुणात रेंगाळून अखेर तिने जगाचा निरोप घेतला. एक करकरणारा पाश गळून गेला.

डोस्टोव्हस्कीने पुनश्च टाइम चालू करण्याची खटपट करण्याचे ठरविले. तो पीटर्सबर्गला तेवढ्यासाठी गेला... पण तेथे एक वेगळेच संकट त्याची जणू वाट पाहत होते. ज्याच्यावर व्यवस्थापन सोपवायचे हे गृहीत धरले होते, तो मोठा भाऊ मिखिल मरण पावला. त्याचा प्रपंच मोठा... अन् डोक्यावर ३३००० चे कर्ज ! एवढे प्रचंड कर्ज फेडण्याची कायदेशीर जबाबदारी डोस्टोव्हस्कीवर नव्हती हे खरे. पण तरीही नैतिकदृष्ट्या ती आपलीच जबाबदारी आहे असे त्याने मानले. सर्व कर्ज फेडण्याची जबाबदारी घेतली. भावाचा संसार सावरण्याचीही जबाबदारी घेतली—या वेळपर्यंत टाइम् चालू झाले होते, पण त्याचा खप आणि प्रसिद्धी अगदीच रसातळाला पोहोचलेली होती. सावकारांनी जप्तीचा धाक घातला होता. साऱ्या दिशा ओस झाल्यासारखी अवस्था होती. आपण कशासाठी जगतो आहोत ते त्याला समजेना. सभोवार असीम असा निर्वात प्रदेश आहेसे वाटत राहिले. श्वासासाठीही गुदमरून गेल्यासारखे वाटावे अशी मनाची स्थिती. मनावर ताण पडत होता, तरीही लिहिणे चालूच होते. कारण जगण्यासाठी पैसे मिळविण्याचा तेवढा एकच मार्ग त्याला परिचित होता. जप्ती टाळण्यासाठी त्याने दुसरीकडून कर्ज घेतले. नव्या सावकाराच्या अटी भयानक होत्या.

१८६६ च्या नोव्हेंबरपूर्वी डोस्टोव्हस्कीने एक नवी कादंबरी सावकाराला दिली पाहिजे— न दिल्यास पुढील सर्व लिखाणाच्या प्रकाशनाचे हक्क सावकाराकडे सुपूर्द होतील अशी ती अट होती. अडचणींच्या माऱ्यामुळे त्रासून जाऊन बिचाऱ्याने ती अट मान्य केली. लिखाणासाठी शांत वातावरण व नवे अनुभव मिळावेत या हेतूने त्याने युरोपला जाण्याचे ठरविले. जवळ पैसा असा फारच थोडा.

त्यात भर पडावी या सदिच्छेने तो जुगारीकडे वळला. नेहमीप्रमाणे अपयश. सर्व पैसे संपले. कठोर सत्त्वपरीक्षा सुरू झाली. परदेशात पैशाशिवाय जेवणखाण मिळणार कसे? डोस्टोव्हस्कीच्या प्रतिभेला नव्या कादंबरीचा आराखडा दिसत होता. Crime & Punishment ची सर्व कथावस्तू स्पष्ट झाली होती. पण लिहिण्यासाठी जरूर असणारे वातावरण मात्र सर्वस्वी प्रतिकूल होते. पैसे नसल्याने हॉटेलचा मालक जेवण देईना. फक्त सकाळ–दुपार चहाचा एक कप मिळे. तो देखील उपकार केल्याच्या आविर्भावात दिला जाई. न्हावी बंद, धोबी बंद, खोलीची सफाई बंद– जेवण बंद– रात्रीची मेणबत्तीसुद्धा मिळण्याची खात्री नाही... डोस्टोव्हस्की मित्रांना एकसारखी पत्रं लिहीत होता. पैसे मागवीत होता. पोस्टेजचा खर्चसुद्धा परवडेनासा झाला– हॉटेलचा मालक मेणबत्ती देईना... अन्न, वस्त्र, प्रकाश इ. काहीही नसताना, संपूर्ण भुकेकंगाल अशा अवस्थेत डोस्टोव्हस्कीने Crime & Punishment ही आपली जगप्रसिद्ध कादंबरी लिहिली. आपले हे लिखाण आजवरच्या सर्व साहित्याहून श्रेष्ठ ठरेल याबद्दल डोस्टोव्हस्कीला तिळमात्र शंका नव्हती. एका गरजू विद्यार्थ्याने श्रीमंत, कद्रू अशा सावकारी करणाऱ्या म्हातारीचा खून केला– आणि अखेरीस त्याला सैबेरियात हद्दपारी झाली– त्या कादंबरीचे कथाबीज. पण ते फुलवत फुलवत इतक्या उच्च स्तरावर नेले आहे की, अखेर बायबलच्या सुराशी सूर जुळवून कादंबरी पुरी होते. त्यातली काही पात्रे मनोरुग्ण (न्यूरॉटिक) आहेत, काही चमत्कारिक विसंगत वागणारी आहेत. काही पात्रे तर विशिष्ट विचार फुलविण्यासाठीच योजलेली आहेत. सर्व व्यक्ती समाजाच्या अगदी खालच्या स्तरातल्या– उपेक्षित अशा आहेत. अशा स्तरातील व्यक्तींच्या अंतरंगाचा नेमका वेध घेण्याचे सामर्थ्य डोस्टोव्हस्कीला लाभलेले होतेच. त्यामुळे ही कादंबरी अभिजात कलाकृती म्हणून गाजली. कोणाला ती रहस्यकथा वाटली, तर कोणावर त्यातल्या तत्त्वचिंतनाचाच प्रभाव पडला. एवढे मात्र खरे की वाचकांची पसंती एकमुखाने आली– आणि तसे होणार, हे उघडच होते. डोस्टोव्हस्कीने अगदी प्राण- पणाला लावून लिखाण केलेले होते. त्या अस्सल ललित कृतीला बरोबर दाद मिळाली. या कादंबरीमुळे डोस्टोव्हस्की हा टॉलस्टॉय– टर्जिनिव्हच्या तोडीचा लेखक ठरला. त्याची सामाजिक प्रतिष्ठा वाढली. मग एका मित्राकडून परतीच्या भाड्यापुरते पैसे येताच तो रशियाला परतला.

'क्राइम अँण्ड पनिशमेंट' ही कादंबरी प्रसिद्धीपूर्वीच प्रकाशकाला विकली असल्यामुळे आर्थिकदृष्टया त्याची स्थिती अत्यंत केविलवाणी होती. तो लोकप्रियतेच्या लाटेवर होता– आणि तरीही त्याच्या विवंचना मनस्वी होत्या... जेवणाखाणाचीसुद्धा भ्रांत पडावी इतकी ताणलेली स्थिती! यासंबंधी काय उपाययोजना करावी याच्या चिंतेत असता त्याला सावकाराशी केलेल्या कराराचे स्मरण झाले. १ नोव्हेंबरच्या आत कादंबरी द्यायची होती– ३–४ ऑक्टोबरपर्यंत तर एक ओळही लिहून झालेली नव्हती. वेळेवर हस्तलिखित सुपूर्द केले नाही तर पुढच्या सर्व लिखाणाचे हक्क सावकाराच्या तावडीत जाणार होते. डोक्यावरची टांगती तलवारच ती! महिन्याभरात लिखाण कसे उरकणार? मित्राच्या सल्लामसलतीने स्टेनोटायपिस्टची योजना झाली. अँना ग्रेगोरिव्हना स्मिट्किन् नावाची वीस वर्षाची तरुण मुलगी कामावर हजर झाली. डोस्टोव्हस्कीने तावडतोब तिला कादंबरी 'डिक्टेट' करायला सुरुवात केली. अँनासारख्या तरुण, प्रसन्न आणि उत्साही मुलीबरोबर काम करणे हा अनुभव डोस्टोव्हस्कीला फारच सुखदायक वाटला. अवघ्या २५ दिवसांत, अटीतटीने कष्ट करून कादंबरी पूर्ण केली. हस्तलिखित घेऊन तो सावकाराकडे गेला. पण सावकार पट्टीचा लबाड! परगावी गेला, हस्तलिखित स्वीकारू नये अशा सूचना हाताखालच्या कारकुनांना केलेल्या होत्या. अशा रीतीने एकदाचा वायदा चुकला की सर्व हक्क पदरात पडतील ही आशा... डोस्टोव्हस्कीने ते हस्तलिखित नजीकच्या पोलीस स्टेशनवर नेऊन दिले. रीतसर तारीख घालून पावती घेतली आणि एका मोठ्या संकटातून स्वतःची सुटका करून घेतली. गॅम्बलर या कादंबरीची जन्मकथा ही अशी 'सुरस आणि चमत्कारिक' आहे.

'गॅम्बलर'चे मुख्य आकर्षण म्हणजे त्यातली पॉलिनवरून घेतलेली व्यक्तिरेखा. असफल प्रेम– अकस्मात बदलणारे मूड्स... जुगारीतले अनुभव... ही कादंबरी म्हणजे काही डोस्टोव्हस्कीच्या प्रतिभेचा खास आविष्कार नव्हे. अगदी धावत पळत पूर्ण केलेले लिखाण आहे हे. अन् तरीही आंतरमनाचा वेध घेण्याची लेखकाची क्षमता स्पष्ट जाणवते.

¤

गॅम्बलरचे लिखाण चालू असता डोस्टोव्हस्कीच्या मनात उलघाल चाललेली होती. त्याची 'लघुलेखिका' अँना त्याला फार आवडली होती. तिला मागणी घालण्याचा विचार मनातून जाईना. दोघांच्या वयात २४ वर्षांचे अंतर होते, खरे तर ती त्याची मुलगी शोभावी इतकी लहान होती. तरीही डोस्टोव्हस्कीच्या मनातले वादळ संपेना. शेवटी एकदाचा धीर करून त्याने तिला मागणी घातलीच. अँनाने त्याच्या प्रतिभेचा आविष्कार पाहिला होता. तेव्हा या प्रतिभावंताची सहचरी होण्याचे तिने मोठ्या आनंदाने मान्य केले. १८६७ मध्ये डोस्टोव्हस्कीने अँनाशी विवाह केला. त्याची निवड अगदी अचूक होती. उभयतांचे एकमेकावर प्रेम तर होतेच. अँना हो जन्मसिद्ध सेक्रेटरी होती. परिचारिका होती. ती डोस्टोव्हस्कीच्या प्रतिभेची स्फूर्ती वगैरे कधीही होऊ शकली नाही. पण त्यात काही फारसे बिघडले नाही. पत्नीपासून स्फूर्तीपेक्षा आणखी वेगळ्याच व्यावहारिक गोष्टींची त्याला गरज होती आणि त्याची या 'सेक्रेटरी'ला पूर्ण जाणीव होती. अँनाचा मुख्य गुण म्हणजे नीटनेटकेपणा अन् व्यवहारी धोरण. या गुणांच्या जोरावर तिने डोस्टोव्हस्कीला अनेक संकटांतून वाचविले. सावकारांशी वाद घालून त्यांना निरुत्तर करण्यात ती चांगली पटाईत झाली. पुस्तकविक्रीचा व्यवहार ती अगदी कसोशीने करीत असे. तेव्हा एकंदर पहाता डोस्टोव्हस्कीची गरज सर्वप्रकारे भागविणारी अशी ही मुलगी होती. नववधूचे आगमन डोस्टोव्हस्कीच्या सावत्र मुलाला– पाशाला– पटणे शक्य नव्हते. तो तिला अत्यंत त्रास देई. वादविवाद होत. घरातले वातावरण गढूळ होऊन जाई. त्याचा डोस्टोव्हस्कीच्या मनावर विलक्षण ताण पडला. परिणामी फिटस् येऊ लागल्या. हे सारे कसे काय सहन करावे हे त्याला समजेना. अखेर डॉक्टरांच्या सल्ल्यावरून परदेशी जाण्याचा त्याने निर्णय घेतला. संपूर्ण विश्रांतीची गरज होती. प्रवासाला पैसा नव्हता. आर्थिक विवंचना संपेनात. अखेर अँनाच्या माहेरून आलेले फर्निचर

गहाण ठेवून पैसा उभा केला– प्रवासास सुरुवात झाली.

प्रवासासाठी अधिक पैसे मिळावेत म्हणून डोस्टोव्हस्कीने जुगारीचा मार्ग धरला. परदेशात असेल नसेल तेवढा पैसा त्याने जुगारीत घातला. पण सगळे पैसे बुडाले. नशिबाचा कौल काही लागेना. अॅनाने त्याच्या जुगारीस हरकत घेतली नाही, कारण त्याच्या मनाविरुद्ध वागण्याचे तिला धारिष्टच नव्हते. तसे केल्यास डोस्टोव्हस्कीला फीट येईल अशी तिला धास्ती वाटे. डोस्टोव्हस्कीजवळ जुगारीपायी कपर्दिकही उरली नाही. अॅनाच्या अंगठ्या, डूल इ. किडूकमिडूकसुद्धा गहाण पडले. तरी नशीब साथ देईना. आता जुगारीत नशिबाची परीक्षा पहायला अवसर नव्हता. लिखाणावर पैसा मिळविणे हाच खात्रीचा मार्ग स्वीकारणे जरूर होते. डोस्टोव्हस्की अत्यंत विमनस्क मनस्थितीत होता. तरी तशा अवस्थेत त्याने The Idiot ही कादंबरी लिहायला घेतली. रशियन मेसेंजर या पत्रकातून ती क्रमशः प्रसिद्ध होत गेली. ईडियट्मध्येही डोस्टोव्हस्कीचे आत्मानुभव व्यक्त झालेले होतेच. नेहमीप्रमाणे ही कादंबरी पुरुषप्रधान होती. त्यातल्या व्यक्तिरेखा या एखाद्या कल्पनेचे रूपक वगैरे नसून खऱ्याखुऱ्या व्यक्ती होत्या. डोस्टोव्हस्की अगदी जीव ओतून लिहीत होता कारण त्याला एक नवीच प्रेरणा मिळाली होती. अॅना गरोदर होती. डोस्टोव्हस्कीला विलक्षण आनंद झाला होता. बाळ जन्माला येण्यापूर्वीपासूनच त्याने बाळावर प्रेम करायला सुरुवात केली होती–ईडियटमध्ये अनेक अतर्क्य, असंभाव्य घटना आहेत, पण वास्तवाशी खिळवून टाकणारा प्रत्ययही आहे. ही कादंबरी तशी वाचनीय होती–पण क्राइम अॅण्ड पनिशमेन्टची सर काही आली नाही. डोस्टोव्हस्कीचा अहंकार दुखवला गेला. चित्त विस्कटल्यासारखे झाले. लोकप्रियतेच्या लाटेला अचानक ओहोटी लागणार की काय या आशंकेने त्याचा छळ मांडला होता. व्यक्तिजीवनातही दुःखाचा प्याला ओठाशी आला होता. अॅनाला मुलगी झाली...त्याने बाळाला इतका जीव लावला ..पण हे निष्पाप सुख काही टिकले नाही. दोन महिन्यांनी मुलगी मरण पावली. दोघजण हताश झाले. डोस्टोव्हस्कीला काही सुचेना. बाळाची आठवण मनावेगळी होईना. आर्थिक दुरवस्थेचे चटके तर बसतच होते. सतत लिहीत राहिल्याशिवाय मार्ग तर दिसत नव्हता. प्रतिभावंताच्या ओळीतले आपले नाव टिकविणे अगत्याचे होते. लिहिणे थांबते, तर तो संपूनच गेला असता. ही जाणीव स्पष्टपणे झाल्यावर डोस्टोव्हस्कीने व्यक्तिगत दुःख, निराशा मनातून निपटून टाकून नव्या कादंबरीची आखणी केली. The Possessed—'झपाटलेला' ही कादंबरी आकार घेऊ लागली. त्यात पेट्रोशव्हस्की प्रकरणाचे स्पष्ट निनाद ऐकू येतात. नायक क्रांतिकारक आहे. 'मधल्या भिंती' पाडून टाकून समाजात समानता आणावी अशा मनाचा आहे. पण तो 'टिपिकल रशियन' आहे. रशिया व इथले लोक हे देवाचे अत्यंत लाडके आहेत अशी त्याची श्रद्धा आहे. एकंदर सूर क्रांतीशी–म्हणजे कम्युनिस्टांना अभिप्रेत असलेल्या क्रांतीशी–सुसंगत नाही. समाजवादी विचारसरणीची स्वप्ने पहाणाऱ्या वाचकांना असले परंपरावादी विचार आवडले नाहीत. चवक प्रतिगामी वाटले. या कादंबरीतील लेखकाचे अधःपतन झाले असून त्याचे साहित्यिक दिवाळे वाजले असल्याची हाकाटी करण्यात आली. धर्माला अफूची गोळी मानणाऱ्या मंडळींना ख्रिस्तप्रणीत विचारसरणीचा एवढा प्रभाव किंवा पगडा मान्य नव्हता. डोस्टोव्हस्कीच्या सामाजिक प्रतिष्ठेला एका अर्थाने ढळ पोहोचला. मात्र कादंबरीला वाचकवर्ग फार मोठा मिळाला. कारण श्रद्धाशील वाचकांना ही कादंबरी मनापासून आवडली. आणि अशी मंडळीच बहुसंख्य असल्याने आर्थिकदृष्टचाही ही कादंबरी उपकारक ठरली. त्यानंतरच्या Enternal Husband या कादंबरीचेही वाचकांनी चांगले स्वागत केले.

आता परदेशात हिंडत राहण्याचा डोस्टोव्हस्कीला कंटाळा आला. 'Life of a Sinner' नावाची कादंबरी त्याच्या डोक्यात घोळत होती. मात्र त्यासाठी मायदेशात जाण्याची ओढ लागली होती. अॅना गरोदर होती–आधीच्या लिखाणावर मिळालेले पैसे संपून गेले होते. खर्चाची तोंडमिळवणी होईना. नव्या कादंबरीसाठी त्याने प्रकाशकाकडून पैसे मागवून घेतले आणि तो मायदेशी आला. डोक्यातल्या नव्या कल्पनांचे पोषण मायदेशातच व्हावे ही अपेक्षा होती. खेरीज अॅनालाही ते सोयीचे होते. अवघडलेल्या अवस्थेत मायेच्या माणसात असलेले बरे. १८७१ मध्ये तो रशियाला परतला. आपली प्रतिभा आता खऱ्या अर्थाने अंकुरित होईल याबद्दल त्याला मुळीच संदेह नव्हता. मनात निरनिराळे आकृतिबंध तयार होत होते. सुंदर भविष्याची स्वप्ने मनोमनी कुरवाळीत तो लेखनाला भिडला होता.

मन उत्फुल्ल असले तरी परिस्थिती मात्र वाकुल्या दाखवीत होती. निवांत लिहिणे अशक्य करणारे समरप्रसंग उद्भवत होते. घरातले सर्व सामान सावकाराकडे गेलेले.–खेरीज त्यांचे वायदे! तगादे!...सावकारांची तोंडे चुकवता चुकवता नाकी दम येत होता. एका जर्मन सावकाराने धमकीच दिली–'मी एक साधा जर्मन माणूस अन् तुम्ही प्रतिभावंत रशियन साहित्यिक. पण मला जगाला असे दाखवून द्यावयाचे आहे की एखादा साधा जर्मन माणूससुद्धा रशियन प्रतिभावंताला तुरुंगात डांबून ठेवू शकतो.'–अॅना म्हणाली 'अगदी खुशाल! तिकडे तुरुंगात बसून डोस्टोव्हस्की शांतपणे पुस्तके लिहीत बसतील त्यांचे त्यात काहीही बिघडायचे नाही. मग मात्र त्यांच्या जेवणाखाणाचा खर्च तुम्हाला करावा लागेल एवढे लक्षात ठेवा!–' सावकाराने काढता पाय घतला.

पण एकंदर सर्व सावकारांशी झुंज देणे कठीणच होते. अॅनाने एक मार्ग शोधून काढला डोस्टोव्हस्कीच्या दोन कादंबऱ्यांचे एकत्र पुस्तक प्रसिद्ध केले. स्वतःच प्रकाशक बनली. कागद आणणे, छपाई करविणे, प्रुफे तपासणे इ. सर्व कामे तिने स्वतःच केली. पुस्तक विक्रेत्यांना मार्जिन असे फारच थोडे ठेवले (१५%) धडाकून पुस्तक-विक्रीला सुरुवात केली. साहित्याचा 'व्यापार' व्यावहारिक दृष्ट्या किती किफायतशीर होतो हे तिने दाखवून दिले. सर्व कर्जदारांना वाटेला लावले–आर्थिक ताण कमी झाला.

¤

डोस्टोव्हस्कीची एकंदर मते क्रांतीच्या दृष्टीने पहाता विरोधी

## तो लेखनाला आता भिडला होता....

अशी होती. युरोपातील प्रगतीची घोडदौड जशीच्या तशी अनुसरावी हे त्याला अजीबात मान्य नव्हते. एकंदर तो Conservative–परंपरावादी असाच होता. आणि त्याची ही मते त्याच्या अनेक वर्षांच्या विचारमंथनाचे फलित म्हणून तयार झालेली होती. आपल्या मतांचा प्रसार करता यावा अशी इच्छा असणे स्वाभाविक होते. तशी संधी लवकरच प्राप्त झाली. ' सिटिझन् ' या पत्राचा मुख्य संपादक म्हणून त्याने काम करावे अशी सूचना आली. पगार उत्तम मिळणार होता. (२५० रुबल्स. सध्याच्या भारतीय चलनात त्याची किंमत नव्हे क्रयशक्ती ४५०० रुपयांहून मोठी धरायला हवी.)

या पत्रातून डोस्कोव्हस्कीने आपल्या मतांचे पद्धतशीर प्रतिपादन करण्यास सुरुवात केली. या पत्रात ' लेखकाची दैनंदिनी ' नामक सदर तो लिहीत असे. या दैनंदिनीत तो चालू घडामोडीविषयीची आपली मते अत्यंत प्रामाणिकपणे मांडीत असे. स्वतःच्या दृष्टीने घटनांचे विश्लेषण करीत असे. त्यातून त्याची निर्मळ देशभक्ती, सच्ची धर्मनिष्ठा आणि रशियन् जनतेवरील उत्कट प्रेम, श्रद्धा व्यक्त होई. त्याची कित्येक विधाने आजच्या काळाने हास्यास्पद ठरविली आहेत. ' रशियन खेडुताने आपला साधेपणा, निरागसता आणि ख्रिस्तावरील श्रद्धा जतन केलेली आहे. त्याचा अडाणीपणाच त्याचे युरोपीय रोगापासून संरक्षण करील...रशियन जनतेला ख्रिस्ताची जाण आहे· त्यांनी ख्रिस्ताला सदैव आपल्या हृदयात स्थान दिलेले आहे...रशियन खेडूत हाच खरा देवाचा लाडका आहे...ही अडाणी रशियन जनता केवळ रशियाचाच नव्हे तर जगाचा उद्धार करील, ' अशा थाटाची त्याची विधाने वाचून आज फक्त गंमत वाटते. पण डोस्टोव्हस्कीची ती अत्यंत प्रामाणिक अशी मते होती. त्या काळात अनेकांना त्याची श्रद्धा अगदी संजीवनीसारखी वाटली. तो एक महान द्रष्टा–श्रेष्ठ देशभक्त आणि अलौकिक प्रतिभेचा साहित्यिक आहे असे अनेकांना वाटत होते. डोस्टोव्हस्कीची लोकप्रियता अक्षरशः शिगेला पोहोचली. त्याला असंख्य पत्रे येत असत–बोलावणी येत–सल्ला विचारला जाई.

रूसो-टर्की युद्ध सुरू झाले. डोस्कोव्हस्की मुक्तकंठाने राष्ट्रीय अस्मितेची स्तुतिस्तोत्रे गात राहिला. मातृभूमीवर खरोखरीच त्याने वेडचासारखे प्रेम केले. त्या देशप्रेमापायी रशियाने केलेले युद्धसुद्धा या ख्रिस्तप्रेमी नागरिकाला अगदी न्याय्य, नव्हे पवित्र वाटू लागले. (What can be holier than war ? Russians are warring against the enemies of Christ. They wll serve the Chirst.) वगैरे...' रशियाचा भावी जगाला ख्रिस्तसंदेश जगून दाखविणार आहे ' ही त्याची श्रद्धा ! आज डोस्टोव्हस्कीची विधाने वाचून फक्त हसू येते... डोस्टोव्हस्कीच्या विशिष्ट विचारसरणीने राजदरबारी त्याची प्रतिष्ठा वाढली. अर्थात त्या हेतूने काही तो आपली मते मांडीत नव्हता... खरोखरच त्याची तशी श्रद्धा होती. पोटतिडिकेने ती श्रद्धा विवरण करून सांगणे हे तो आपले नियत कर्तव्य मानीत होता. एके काळी सैबेरियाच्या तुरुंगात डांबलेला हा लेखक झारला आता अत्यंत गौरवास्पद वाटू लागला. राजदरबारी मानाचे स्थान मिळाले–१८७८ मध्ये इंपीरियल् अकादमी ऑफ सायन्स या संस्थेचे वाङ्मयाच्या शाखेचे सदस्यत्व त्याला देण्यात आले. फार मोठा सन्मान मिळाला. आयुष्यात पुष्कळच कृतकृत्य वाटावे अशा अनुकूलतेच्या झुळका येण्यास सुरुवात झाली.

कोणताही आनंद संपूर्णतया निर्लेप असणे ही गोष्ट डोस्टोव्हस्कीच्या प्राक्तनाच नव्हती– सामाजिक मान्यता वाढली. पण स्वतःच्या मुलाच्या मृत्यूने त्या आनंदाला छेद मिळाला. पुत्रशोक एकंदर सहन करणे कठीणच होते. पण डोस्टोव्हस्कीला असह्य दुःख होण्याचे कारण म्हणजे त्याचा लहान मुलगा अपस्माराच्या इटक्यानेच वारला होता. इतक्या लहान वयात हे झटके येण्याचे कारण केवळ आनुवंशिक असावे–तेव्हा आपल्यामुळेच या अश्राप जीवाचा मृत्यू ओढवला. वास्तविक आपणच या मृत्यूस जबाबदार आहोत अशी त्याची भावना झाली. तो अतिशय बेचैन झाला. विमनस्कतेने त्याला पुरे वेढून टाकले. त्याच्या मनाला थोडासा दिलासा मिळावा म्हणून ॲनाने त्याला ऑप्टिना पुस्टिन् येथील धर्ममठात जाऊन तेथील साक्षात्कारी धर्मगुरू फादर ॲब्रोसिस् यांची भेट घेण्याचा सल्ला दिला. त्याप्रमाणे डोस्टोव्हस्की धर्मगुरूंना भेटला. ते फार थोर सिद्धपुरुष होते– त्यांनी डोस्टोव्हस्कीचे पुत्रशोकाने व्यथित झालेले मन शांत केले. त्यांच्या सहवासात तो ८–१० दिवस राहिला. मन समाधानी झाल्यावर परतला. फादर ॲब्रोसिस् यांच्या व्यक्तिमत्त्वाची त्याच्या मनावर जबरदस्त छाप पडली. ब्रदर्स कॅरेमेझॉव्ह या कादंबरीतील फादर झोसीमा या व्यक्तिरेखेतून हे धर्मगुरू वाचकांना परिचित झालेच आहेत.

डोस्टोव्हस्कीची लोकप्रियता ' लेखकाच्या दैनंदिनीमुळे ' वाढत गेली. सर्वसामान्य रशियन वाचकाला तो हवाहवासा वाटू लागला. राष्ट्रप्रेमाला सतत फुलवीत रहाणारा हा लेखक लोकप्रियतेच्या लाटेवर आरूढ व्हावा हे उघडच होते. परंतु या प्रतिभावंत लेखकाने आपले सामर्थ्य केवळ वर्तमानपत्री लिखाणात व्यतीत करावे ही गोष्ट जाणत्या समीक्षांना बरी वाटेना. यापेक्षा जास्त मौलिक साहित्य लिहिण्याची त्याची योग्यता आहे, अभिजात साहित्य तो लिहू शकतो. तेव्हा तत्कालीन घडामोडीविषयी लिहिण्यातच त्याची शक्ती अटून जाऊ नये अशा हेतूने नेक्रॉसॉव्हने त्याला कादंबरी लिहिण्याची विनंती केली. १६ पानांना २५० रूबल्स या हिशोबाने पैसे देण्याचे आश्वासन दिले. हे मानधन डोस्टोव्हस्कीला विलक्षण आकर्षक वाटले... वर्तमानपत्राची कटकट न करता निवांतपणे लिहून जर पुरेशी रक्कम मिळत असेल, तर तो नोकरीचा व्याप सोडलेलाच बरा. डोस्टोव्हस्कीने कादंबरीवर चित्त एकाग्र करण्याचे ठरविले. नोकरी सोडली. दूर उपनगरात लहानशा घरात रहायला गेला. वर्तमानपत्राचे झंझट दूर केले– फक्त ' लेखकाची दैनंदिनी ' लिहिण्याची प्रथा चालू ठेवली. आपली सर्व शक्ती केंद्रित करून त्याने ब्रदर्स कॅरेमेझॉव्ह ही कादंबरी लिहिण्यास सुरुवात केली. पुत्रशोकाचे दुःख दूर करण्यासाठी तो सतत लिखाणात बुडून गेला.

गेली ४-५ वर्षे त्याला ' Life of a Sinner ' या कादंबरीचा वेध लागलेला होता. या नावाची कादंबरी त्याने लिहिलीच नाही. तथापि ' Sinner ' संबंधी, त्याच्या, अंतर्मनाविषयी पापकृत्य केलेल्या व्यक्तीच्या अंतरंगातील उलघालीविषयी त्याने खूपसे चिंतन केलेले असावे. डोस्टोव्हस्कीला पाप-पुण्य, पापाची जबाबदारी, त्यामागील कारणपरंपरा, कार्यकारणभाव, प्रत्यक्ष पापी वासना आणि पापाची कृती-प्रेरणा आणि प्रत्यक्ष घटना–या सर्वाबद्दल बरेच काही सांगा

यचे होते. एखाद्या गोष्टीचे 'Obsession' व्हावे तसे याबाबतीत डोस्टोव्हस्कीची अवस्था होती. चार वर्षेपर्यंत गुन्हेगारांत–तुरुंगात राहिल्याने गुन्हा, पाप–त्याची कारणपरंपरा इ. संबंधी त्याच्या मनावर विलक्षण खोल असा परिणाम झालेला होता. डोस्टोव्हस्कीच्या प्रतिभेचे खरेखुरे उन्मेष या कल्पनांच्या संदर्भातच व्यक्त झालेले आहेत. त्याच्या बहुतेक सर्व कादंबऱ्यांत परमेश्वरविषयक चिंतन असतेच किंवा 'देव' हे एक अमूर्त पात्र त्याच्या कादंबऱ्यात सर्वत्र वावरत असते. पापपुण्यांच्या किंवा परमेश्वराच्या संदर्भाशिवाय मानवी जीवन संभाव्य आहे असे जणू त्याला वाटतच नाही. या मूलभूत कल्पनांचे विवरण करीत असताना आपण रशियातल्या सर्वसामान्य व्यक्तीच्या सद्सद्विवेकाला वाचा फोडीत आहोत अशी त्याची भावना होती.

ब्रदर्स कॅरेमेझॉव्ह या कादंबरीत डोस्टोव्हस्कीच्या सर्व वैशिष्ट्यांनी कलागुणांनी उच्चांक गाठलेला आहे. त्याच्या परिणतप्रज्ञेचा संपूर्ण आविष्कार त्याच्या या अखेरच्या कादंबरीत पहायला सापडतो. त्याच्या सर्व ललितकृतीत ही कादंबरी श्रेष्ठ आहेच, परंतु जागतिक वाङमयातही या ललितकृतीला फार श्रेष्ठ स्थान आहे. कित्येक चिकित्सक टीकाकारांनी जगातल्या उत्कृष्ट दहा कादंबऱ्यांत ब्रदर्स कॅरेमेझॉव्ह या कादंबरीचा समावेश केलेला आहे. वस्तुतः ही प्रदीर्घ कादंबरी अपुरीच आहे. त्याचा दुसरा भाग लिहून व्हायचा होता. तत्पूर्वीच डोस्टोव्हस्कीने जगाचा निरोप घेतला. आहे एवढा पहिला भागही विलक्षण प्रभावी आहे.

ब्रदर्स कॅरेमेझॉव्ह ही एक अत्यंत क्रूर, विषयांध अशा बापाची अन् त्याच्या ४ मुलांची कथा आहे. तीन मुलगे–औरस–एक अनौरस मुलगा घरात नोकरासारखा रहातो आहे. तत्कालीन रीतिरिवाजाशी हे सुसंगत... शेवटचा मुलगा अल्योषा हा वृत्तीने अत्यंत धार्मिक, सद्वृत्त असा आहे.. मोठे दोघे मुलगे डिमिट्री आणि इव्हान हे भयंकर आहेत. ते वडिलांचे खरे प्रतिस्पर्धी...स्पर्धा आहे एका स्त्रीसाठी... ती स्त्री अत्यंत सामान्य दर्जाची–वेश्या. वडील त्या स्त्रीला पैशाच्या जोरावर जिंकण्याच्या प्रयत्नात आहेत. त्यामुळे डिमिट्री अत्यंत उखडलेला. इव्हानला तर वडिलांच्या मृत्यूचा ध्यास लागलेला. त्या वेश्येवर याचे खरे प्रेम. वडील एकदाचे मरतील तर आपले जीवन सुरळीत चालेल ही विचाऱ्याची खात्री. वडिलांच्या मृत्यूबद्दल स्वप्नरंजन सुरू ! प्रत्यक्ष खून करतो तो मात्र अनौरस मुलगा स्मेर्डिकॉव्ह–अन् अखेर वडिलांचा खून केल्याबद्दल शिक्षा होते ती डिमिट्रीला ! चौघे भाऊ चार भिन्न प्रवृत्तींचे द्योतक– (रूपकात्मक वाटावे इतके !) फादर कॅरेमेझॉव्ह, चार मुलगे आणि ती स्त्री या सर्वांच्या व्यक्तिरेखा अप्रतीम–जित्रत अशा वाटतात. त्यात पुन्हा पाप, अनुपाप, परमेश्वर इ. विषयीच्या कल्पनांची गुंफण आहेच. खुद्द लेखकाचे आत्मनिवेदन कित्येक संदर्भात सहजी ओळखू येण्याइतके स्पष्ट आहे. उदाहरणार्थ, इव्हान हा क्र. २ चा मुलगा खुद्द लेखकच आहे हे लक्षात येण्यास वेळ लागत नाही. तीही त्याची फक्त एक बाजू आहे, एक परिणाम आहे. डोस्टोव्हस्कीला स्वतःमधली जी जी वैशिष्ट्ये त्याज्य–वाईट अशी वाटतात, ती सर्व इव्हानमध्ये व्यक्त झालेली आहेत. )Ivan is that part of the author's soul that he wanted to cast away.) या कादंबरीत जबरदस्त संघर्ष आहेत, पण ते केवळ व्यक्तीपुरते मर्यादित न रहाता विश्वात्मक पातळीवर जातात–प्रातिनिधिक बनतात . दोन भिन्न कल्पनांचे संघर्ष ठरतात. (conflict of ideas) निरनिराळ्या व्यक्तींमध्ये वाचकाला स्वतःचे प्रतिबिंब दिसत रहाते. आपल्या व्यक्तिमत्त्वाच्या छायाचित्राचे 'निगेटिव्ह' पाहिल्यासारखे वाटत रहाते. अर्थात ते चटकन लक्षात येत नाही–कारण ती क्ष-किरणांनी घेतलेल्या फोटोच्या निगेटिव्हसारखी भासत रहाते.

या कादंबरीतली पात्रे सत्य आणि काल्पनिक अशा दोन पातळ्यांवर जगत रहातात. काही घटना असंभाव्य वाटण्याजोग्या आहेत–काही ठिकाणी कादंबरी अत्यंत शब्दबंबाळ झालेली आहे. माणसे बोलतात–बोलतात म्हणजे १०–१० पाने झाली तरी भाषण संपतच नाही. स्मेर्डिकॉव्ह व अशिक्षित अनौरस मुलगासुद्धा चांगली विद्वतापूर्ण भाषणे वगैरे करतो. पुष्कळसे आभास आहेत, रूपके आहेत–स्वप्नरंजन–कोर्ट-सीन–ट्रायल–वकिलांची विलक्षण परिणामकारक भाषणे इ. सारे काही अत्यंत प्रत्ययकारी शब्दात व्यक्त झालेले आहे. मात्र वास्तव आणि काल्पनिक यापैकी एकाच पातळीवर डोस्टोव्हस्की निश्चितीने स्थिरावलेला नाही. झारशाही आणि क्रांती–किंवा बदललेली समाजरचना या दोघात जशी त्याला नेमकी निवड कधी करता आली नाही, तसाच हा प्रकार होता. ब्रदर्स कॅरेमेझॉव्ह या कादंबरीमुळे त्याची कीर्ती सर्वत्र पसरली. तो एक परिणतप्रज्ञेचा श्रेष्ठ रशियन साहित्यिक आहे यात कोणाला संदेह उरला नाही. जनतेची सत्प्रवृत्तीवरील श्रद्धा साहित्याने अधिकाधिक दृढ झाली. जनतेने तसेच राजदरबारानेही त्याला निश्चित मान्यता दिली. आर्थिक ताण संपला. मध्यंतरी ॲनाने पुस्तकाचे दुकान काढलेले होते. त्यातून समाधानकारक प्राप्ती होत असे. तेव्हा अतःपर अगदी निश्चितपणे जगता येण्याची शक्यता निर्माण झाली खरी !

निपटलेले आनंदहीन बालपण, भीषण तुरुंगवास, सक्तीची लष्करी नोकरी, आजार, जुगार, कर्ज, अपरंपार कष्ट... या सर्व यातनापर्वात तो जन्मभर फरफटत गेलेला होता. आता मात्र इतक्या वर्षांचे कष्ट फळाला आले होते. शांत–प्रतिष्ठित जीवनाचे आश्वासन मिळाले होते– भविष्य हृदयंगम होते खरे, पण येथवर येईतो त्याची पार दमछाक झालेली होती. पाय सोलवटून रक्तबंबाळ झाले होते. तो आता अगदी जराजर्जर, अशक्त असा झाला होता. छातीच्या रोगाने पार पिंजून गेला होता. शरीर झिजले तरी मनाची उभारी कायम होती. 'रायटर्स डायरी'चा पुढील भाग तो लिहीत होता–आणखीही काही संकल्प होते. प्रथमतः त्याला ब्रदर्स कॅरेमेझॉव्हचा उत्तरार्ध लिहायचा होता. ती अल्योषाची जीवनगाथा ठरणार होती. स्वतःची स्मरणगाथा लिहायची होती. आणि ख्रिस्तजीवनावर एक पुस्तक संकल्पित होते. सारे संकल्प पूर्ण करायला दहा वर्षांचा अवधी लागेल असा डोस्टोव्हस्कीचा अंदाज होता. त्या दृष्टीने त्याने कामाची आखणी करण्यास सुरुवात केली. उतारवयात का होईना, पण त्याला

जी राजमान्यता व लोकमान्यता लाभली होती, त्यामुळे तो स्वतःवर खूष होता. मुले फारच छोटी होती...ती एक जराशी काळजी वाटे. पण अॅना कर्तव्यदक्ष, धोरणी होती–व्यवहारी होती...तो एक फार मोठा दिलासा होता. आता डोस्टोव्हस्कीचे जीवन सुरळीत चालेल असे भविष्य स्पष्टच दिसत होते.

इ. स. १८८० च्या मेमध्ये पुष्किन्च्या पुतळ्याचा अनावरण समारंभ होता. ' Society of the friends of Russian Literature ' या संस्थेतर्फे समारंभ आयोजित केलेला असून त्या वेळी डोस्टोव्हस्कीला प्रमुख पाहुणा म्हणून बोलावणे आलेले होते. टर्जिनिव्ह या समारंभात भाग घेण्यासाठी फ्रान्सहून आला होता. टॉलस्टॉयला आमंत्रण असले तरी तो उपस्थित रहाणार नव्हता. इतर अनेक मान्यवर साहित्यिक पुष्किन्च्या पुतळ्याच्या अनावरण–समारंभाच्या निमित्ताने एकत्र जमणार होते. अशा वेळी मुख्य पाहुणा म्हणून आपली निवड व्हावी याचा डोस्टोव्हस्कीला विशेष आनंद होणे स्वाभाविकच होते. डोस्टोव्हस्कीला प्रमुख मान देण्याचे कारण असे की, रशियातील दोन्ही विचारधारांना (ऑक्सिडेंटॅलिस्ट व स्लाव्होफिल्स) त्याच्याविषयी आपुलकी वाटत होती. पहिल्या गटास तो एक थोर ' युरोपियन ' वाटे तर दुसऱ्या विचारधारेच्या अनुयायांना तो श्रेष्ठ असा रशियन द्रष्टा वाटे. दोन्ही विचारधारांना तो आपल्यातला वाटत होता. इतकेच नव्हे तर राज्यकर्त्या अधिकारी वर्तुळातही डोस्टोव्हस्कीविषयी परमादर वाटत होता. या समारंभासाठी सपत्नीक जाण्याची त्याची इच्छा होती. परंतु खर्च जास्ती पडेल म्हणून त्याने अॅनाला बरोबर नेले नाही. म्हणजे आर्थिक स्थिती सुधारली होती ती इतपतच ! कर्जभार नाही हाच मोठा आनंद होता खरा !

पुष्किन्च्या पुतळ्याचा अनावरण–समारंभ राजघराण्यातील एका व्यक्तीच्या मृत्यूमुळे पुढे ढकलला गेला. डोस्टोव्हस्की मॉस्कोतच राहिला. समारंभाच्या निमित्ताने अनेक साहित्यिक जमले होते. सांस्कृतिक क्षेत्रातल्या वरच्या स्तरातली सर्व मंडळी जमली होती. त्यांच्या गाठीभेटी घेण्यात फार मोठा आनंद होता. डोस्टोव्हस्कीला अनेक ठिकाणांहून बोलावणी येत होती. तो जाईल तेथे त्याला फार सन्मानाने वागविले जात होते. स्वतःच्या लोकप्रियतेचे खरे तर त्याला खूप आश्चर्य वाटत होते.

५ जून १८८०. पुष्किन्च्या पुतळ्याच्या अनावरणाचा समारंभ गाजला. फार मोठ्या थाटामाटाने समारंभ पार पडला. प्रमुख वक्ता होता डोस्टोव्हस्की. त्याच्या भाषणापूर्वी टर्जिनिव्हचे भाषण झाले आणि नंतर डोस्टोव्हस्की...त्याचे वक्तव्य केवळ अप्रतीम असेच झाले. पुष्किनला वेगवेगळ्या विचारधारांत खेचण्यापेक्षा त्याला आपल्या रशियन अस्मितेचे प्रतीक मानले पाहिजे आणि ते का ? –याची कारणमीमांसा करणारा विचार त्याने फुलवीत फुलवीत अगदी टोकाला नेला...दोन्ही विचारधारा साकल्याने त्यात समाविष्ट झाल्या. विरोधकांचा विरोध पार विरून गेला. वैमनस्य संपले. आता कोणी स्लाव्होफिल् नहते–कोणी ऑक्सिडेंटॅलिस्ट नव्हते–सर्वजण केवळ ' रशियन ' होते. डोस्टोव्हस्कीच्या भाषणातल्या विधानात तर्कसंगतीपेक्षा भावनोत्कटताच अधिक होती–अत्यंत परिणामकारक होती. भाषणाला लोकांनी उत्स्फूर्त दाद दिली. लोक अक्षरशः भारावून गेले. एखाद्या विद्युत्‌शक्तीने भारावून गेल्यासारखा तो बोलत होता. डोळ्यात विलक्षण असे सात्त्विक तेज विलसत होते. त्याच्या आयुष्यातला तो सर्वोच्च आनंदाचा अन् प्रतिष्ठेचा क्षण होता तो. एरव्ही जराजर्जर, आजारी अन् थकलेल्या आवाजात बोलणारा डोस्टोव्हस्की पुष्किन्‌विषयी बोलताना अगदी खुल्या आवाजात, ठामपणाने बोलत होता. त्याचे ते भावमंत्रित वक्तव्य ऐकून श्रोते मंत्रमुग्ध झाले. गहिवरून आले. टाळ्यांचा गजर... सर्वांच्या तोंडून धन्योद्‌गार...लोक आनंदाने बेहोष झाले होते. श्रोतृवृंदातल्या स्त्रिया त्याच्याभोवती गोळा झाल्या अन् म्हणाल्या– ' आपण द्रष्टे आहात–तुमची पुस्तके वाचून आम्ही अधिक चांगली माणसे झालो. '

दुसऱ्या अधिवेशनाच्या वेळी काही स्त्रियांनी बसल्या जागी गुपचूप पैसे गोळा केले. जवळच्या दुकानातून उंची पुष्पचक्र आणविले. समारंभ आटोपल्यावर व्यासपीठावर जाऊन अनौपचारिकपणे ते पुष्पचक्र डोस्टोव्हस्कीला अर्पण केले. त्यावर लिहिले होते, ' रशियन स्त्रियांबद्दल आपण उदात्त उद्‌गार काढलेत...त्यांच्याकडून सप्रेम भेट. ' डोस्टोव्हस्कीचे भाषण इतके प्रभावी झाले होते की, श्रोतृवृंदातील एकमेकांच्या प्रतिस्पर्ध्यांनी परस्परांना प्रेमाने मिठ्या मारल्या. विरोध मावळून जाऊन स्नेहबंध सुरू झाले. लोकगंगेच्या लाटांवर लाटा व्यासपीठाच्या दिशेने उसळत राहिल्या. काही लोक त्याच्या पायाशी वाकले–त्याच्या हाताचे चुंबन घेतले. एक विद्यार्थी तर भावनावेग अनावर झाल्याने डोस्टोव्हस्कीच्या पायाशी मूर्च्छित होऊन पडला. राष्ट्रीय वृत्ती आणि बंधुभाव या भावनांनी लोक भारावले. प्रचंड जनमानसाला सद्‌भावनांची प्रेरणा देणाऱ्या डोस्टोव्हस्कीबद्दल सर्वत्र आदराची भावना पसरली.

लोकांनी व्यक्त केलेला सद्‌भावनेचा आविष्कार इतका उत्स्फूर्त व सच्चा होता की त्या रात्री डोस्टोव्हस्कीला झोप येईना.पुष्किन्च्या मृत्यूची बातमी कळल्यापासून तो थेट त्याच्या पुतळ्याचे अनावरण करीपर्यंतचा जीवनपट नजरेसमोर थरथरत राहिला. डोळे वारंवार भरून आले. चैन पडेना. मध्यरात्री तो खोलीबाहेर आला...टॅक्सी केली...थेट पुतळ्याशी आला...पुतळ्याच्या पायाशी क्षणभर विचारमग्न झाला...आणि मग स्वतःला मिळालेले पुष्पचक्र त्याने पुष्किन्च्या पायी अर्पण केले. आपणही आता मृत्यूच्या फार सन्निध आलेलो आहोत ही भावना मनात भरून राहिली. सबंध जन्मभर तो नाना तऱ्हेच्या संघर्षांनी घायाळ झालेला होता–विकलांग अशी अवस्था झाली होती. जन्मभर उपेक्षा सहन केली होती आणि आता जीवनाचे पैलतीर दिसायला लागल्यावर लोकमान्यतेची अन् राजमान्यतेची पावती आली होती...मनात आनंद भरला होता...पण तो सहन करण्याचीसुद्धा फारशी ताकद नव्हती. हा आनंद आपण किती दिवस उपभोगणार ? आयुष्याची दोरी काचून, पिचून तुटायला आलीय...आता मान मिळाला काय आणि नाही काय ?...सारे सारखेच नव्हते का ? आता हा उंबरा ओलांडून, सारे इथल्या इथे ठेवून जायचे आहे...असे काही विमनस्क विचार त्याच्या मनात तरळून गेले.

डोस्टोव्हस्कीच्या भाषणाचा जयजयकार वातावरणात विरून गेल्यावर क्रांतिकारक पक्षाने त्याच्या भाषणाचे वाभाडे काढायला

सुरुवात केली. त्याचे भाषण 'ॲब्सर्ड...अनैतिहासिक व अर्थशून्य' आहे अशी टीका झाली आणि ही टीका डोस्टोव्हस्कीने मनाला फार लावून घेतली. मूर्च्छा वारंवार येऊ लागली—दोन आठवडे तो अंथरुणाला अगदी खिळून होता. जरासे सावरल्यावर त्याने पुनश्च लिखाणास सुरुवात केली. १० वर्षे काम पुरेल एवढे संकल्प सोडलेले होतेच—

त्यानंतर ४-५ महिन्यांनी एक अगदी साधी घटना घडली... नेहमीप्रमाणे तो रात्री लिहीत बसलेला होता. मध्यरात्र उलटून गेलेली. मध्येच पेनच्या टोपणाला धक्का लागून ते घरंगळत खाली पडले—शेल्फखाली कुठे तरी पडले. ते उचलण्यासाठी डोस्टोव्हस्की वाकला. त्याच्या घशात काही तरी घट्ट, गरम, चिकट असा पदार्थ आला—बाहेर पडला. रक्त होते ते. दाढी-मिशा रक्ताने माखल्या. रक्ताच्या काळपट गठुळ्या डोस्टोव्हस्कीने पुसून टाकल्या अन् कामाला सुरुवात केली.

दुसऱ्या दिवशी बहीण जेवायला आली होती. जेवताना प्रथम बालपणच्या मधुर आठवणी निघाल्या...पण अखेर मात्र कौटुंबिक इस्टेटीविषयी—वाटणीसंबंधी बहीण बोलायला लागली. त्या संदर्भात ती डोस्टोव्हस्कीला फार टोचून बोलली—त्याला लागेल असे बोलली...त्याच्यावर क्रूरपणाचा व लबाडीचा आरोप केला. त्याला हे ऐकवेना—तो जेवण टाकून उठला आणि आपल्या अभ्यासिकेत जाऊन सुन्न मनाने बसून राहिला. मनाला अतिशय वेदना झाल्या—आणि परिणामी रक्ताची गुळणी आली. ॲनाने तातडीने डॉक्टरना बोलावले—पण ते येईतो पेशंट अगदी शांत झालेला होता, अन् अंथरुणावर बसून मुलांना चित्रे वगैरे दाखवीत होता. डॉक्टर तपाशीत असता पुनश्च रक्ताची गुळणी आली. डोस्टोव्हस्कीची शुद्ध हरपली—जरा वेळाने शुद्धीवर येताच।त्याने धर्मगुरुंना बोलवायला सांगितले. कन्फेशन्, कम्यूनियन् इ. धार्मिकविधी उरकले—आणि मग त्याची प्रकृती खूपच सावरली. डॉक्टरांनासुद्धा चांगली आशा वाटू लागली. नव्या हुरूपाने उपाययोजना झाली अन् डोस्टोव्हस्कीला निवांत झोप लागली.

२७ जानेवारी १८८१—रात्री १२॥ चा सुमार. ॲना काळजीने कोळपून गेलेली—त्याच्या खोलीत पडून राहिलेली—गेले २-३ तास डोस्टोव्हस्कीला काळजीने घेरून टाकले होते. मृत्यू समोर दिसत होता—अपुऱ्या संसाराची काळजी वाटत होती—खंत वाटत होती... अखेर ॲनाला उठवलेच अन् तो म्हणाला, 'ॲना, आज मी मरणार!'

तिने त्याची खूप समजूत घातली—डॉक्टरांचा अनुकूल अभिप्राय सांगितला. पण त्याला ते पटले नाही. त्याने तिला बायबल आणायला सांगितले. सैबेरियाच्या तुरुंगात डांबले जाण्यापूर्वी डिसेंबरिस्ट क्रांतिकारकाच्या पत्नीने दिलेली ती पवित्र प्रत—'उघड अन् वाच.' या त्याच्या आज्ञेनुसार तिने वाचायला सुरुवात केली—अन् तिने जे वाचले त्याचा त्याने स्वतःच्या मरणाशी संबंध जोडून टाकला. हे त्याचे तर्कट ऐकून तिला रडू कोसळले...,

दुसऱ्या दिवशी ११ वाजता तो जागा झाला. मृत्यूचे पाश पुरे आवळले गेल्याचे त्याला जाणवले. मुलांना जवळ बोलावून त्यांना आशीर्वाद दिला. तुरुंगवासात जिने साथ दिली, ती बायबलची प्रत त्याने मुलाच्या हाती दिली. परमेश्वरावर निष्ठा ठेवण्यास सांगून त्याने कुटुंबाचा निरोप घेतला. नंतर पुनश्च हॅमरेज...आणि मग त्याची शुद्ध हरपली...ती कायमचीच रात्री साडेआठच्या सुमारास डोस्टोव्हस्कीची प्राणज्योत विझली...

असंख्य जनसमुदाय त्याच्या अंत्यदर्शनासाठी जमला होता. ॲना भकास चेहेऱ्याने घरभर फिरत होती. काय करावे हे तिला सुचत नव्हते. ही सारी माणसे आपल्यात व फिओडोरमध्ये निष्कारणच भिंतीसारखी उभी आहेत असा तिला भास होत होता. लोकांची अशी अविरत रीघ लागावी ही गोष्ट तिला अजीबात मान्य नव्हती... दुसऱ्या दिवशी अर्थमंत्र्याकडून डोस्टोव्हस्कीच्या कुटुंबाला २००० रुबलसचे वर्षासन दिले असल्याचे पत्र आले. क्षणभर तिला इतका आनंद झाला! ही बातमी डोस्टोव्हस्कीला सांगण्यासाठी ती त्याच्या खोलीत गेली...अन् मग तिला तीव्रतेने जाणवले की ही वार्ता तो कधीही ऐकू शकणार नव्हता.

डोस्टोव्हस्कीचा अंत्यसंस्कार अक्षरशः राजेशाही थाटाने पार पडला. जनसागराला तर भरती आलेली होती. दफन करण्याच्या दिवशी सकाळी स्मशानभूमीवर अपरंपार गर्दी झाली. चॅपलमध्ये शवपेटिका होती. गर्दी होऊ नये म्हणून पोलीस कोणालाही आत सोडीत नव्हते. 'अहो, पण मी डोस्टोव्हस्कीची पत्नी आहे, मला तरी जाऊ द्या.' ॲनाने अशी विनंती करताच पोलीस म्हणाले, 'आतापर्यंत ४-५ बायका आपण डोस्टोव्हस्कींची पत्नी आहोत असे सांगून आत गेलेल्या आहेत. काही एकट्या तर काही मुलांसकट! आता आम्ही तुम्हाला सोडणार नाही.' अखेर पोलिसांची खात्री पटवून तिला आत जावे लागले. अंत्यसंस्काराच्या वेळी जनता आणि राजकीय अधिकारी असे सगळेच उपस्थित होते.

डोस्टोव्हस्कीचे साहित्य जगातील अभिजात साहित्य म्हणून मान्यता पावले आहे. त्याने चिरनिद्रा घेतल्यानंतर त्याचा खरखुरा प्रवास सुरू झाला...क्राइम् ॲंड पनिशमेंट आणि ब्रदर्स कॅरेमेझॉव्ह-सारख्या चिरंजीव ललितकृती डोस्टोव्हस्कीचा जगप्रवास कायम चालू ठेवतील.

# स मा प्त

कथा

# दोन मुलं

वसंत दुबळे

मध्यम वर्गीयांच्या सामुदायिक वातावरणात रहाण्याचा प्रयत्न हा प्रत्येक मध्यम वर्गीय करतोच ! त्याच्या मते अशा ठिकाणी मतामतांचा आक्रमक गलबला नसतो आणि मतभिन्नता व त्याची चर्चा पेल्यातील चहाबरोबरच संपत असते. भांडणावर अबोला हा सुखकर उपाय असतो आणि भेटलं की जिवण्या रुंदावत 'अं, काय' किंवा बायकांनी उगाचंच 'आवरलं का' असं रोज विचारणं त्यांच्या अंगवळणी पडलेलं असतं.

परंतु १ लाख वस्तीच्या शहरात अशीच जागा प्रत्येकाला मिळेल हा मुद्दा वादग्रस्तच आहे. तर जागा मिळणंच कठीण झाल्याने झोपडपट्टीलगतच्या 'हातावर पोट' वगैरे असलेल्या माणसांच्या लेनमध्ये गेली कित्येक वर्षे मी यशस्वीरीत्या रहात आहे. प्रथम प्रथम वेगळं वाटायचे. सकाळी उठल्यापासून एकमेकींना 'रंडी-ब्रोडकी' ठरवणाऱ्या बायका, त्यांना न जुमानता दिवसभर उनाडणारी असह्य वाढीव पोरं आणि दिवसभर कामापोटी वणवण केल्यावर मिळकतीतली धुंदी डोळ्यावर घेऊन येणारे नरवीर... त्यातून एखाद्याच्या आगळीकीने बेरात्री उडणारी तोंडातोंडी... त्यातले-गुप्त अवयवांचे संबंधाचे उल्लेख... मारामारी याने पूर्वी जीव खालीवर व्हायचा. पण आता मात्र त्यामागची नैसर्गिकता, त्यांची अगतिकता आणि मानसशास्त्र माहीत झालंय.

एकदा सुटीचा जरा लवंडलो असताना पायरीवर दंगा-रडारड ऐकू आली. दार उघडून बघितलं तर लवतरातली धुळीनं माखलेली दोन लहान पोरं रडत होती आणि कानावर हात दुमडत गल्लीतल्या दोन पोरांच्या टपल्या खात होती. 'भाडचा' असा उल्लेख करत मारणारी ती मुलं पाहून मला राग आला. दरडावून त्या पोरांना मी याचा जाब विचारला. ती एकमेकाकडं बघून हसली. यानं मी जास्तच चिडलो. एक पायरी खाली उतरलो. दुपारचं उन नुकतंच पायरीवरून सरकल्यानं ती अजून गरम होती. पोळत असलेला पाय तसाच दाबून ठेवत मी म्हणालो,

'एक घटका लेको धड डोळा लागू देत नाही... वर हसता होय रे ! तुमच्या बापांना सांगू का ?' या माझ्या धमकीचं मलाच हसू आलं.

'का मारताय रे त्यांना ?' मी विचारलं.

'दोपारच्याला म्हारं त्या झोपडयातनं कशापाई उलथायला येत्यात मंग ?

यावर माझा आविर्भाव काय झाला कोणास ठाऊक पण पुटपुटत माघार घेत ती पोरं दूर झाडाखाली जाऊन बसली.

तोपर्यंत ती दोन मुलं भेदरलेली माझ्याकडे बघत उभी राहिली होती. संतापानं दोन पायऱ्या खाली उतरत ओरडलो, 'चालते व्हा... साली...' दातओठ खात लहान मुलासारखा... माझ्या तोंडून शब्द फुटेना.

ती पोरं भिऊन लांब उन्हात उभी राहिली. धुळीत त्यांची लहान पावलं रुतली होती. चटक्यामुळे ती पाय स्थिर ठेवू शकत नव्हती. 'पुन्हा या तर खरं' असं निर्वाणीचं बोलून आत येऊन मी कलंडलो. विचार करू लागलो.

संतापानं ध्यानात आलं नाही, परंतु पाय खूपच पोळले होते. पायऱ्या सावलीत अजून थंड व्हायच्या होत्या. तळवे हुळहुळत होते. उन्हात उभ्या राहिलेल्या त्या पोरांचं काय झालं असेल ? सहजच विचार चाटून गेला.

तशी मला इथे कोणाबद्दल आत्मीयता वाटत नव्हती. क्षणापूर्वी ती भेदरलेली मुलं ज्या टपोऱ्या डोळ्यांनी माझ्याकडे बघत होती त्यात कारुण्य, भीती, कृतज्ञता अशा काही शब्दातीत भावनांचं वेगळंच आवाहनात्मक मिश्रण बनलं होतं. परंतु रागाचे भरात त्या आवाहनाकडं मी दुर्लक्ष केलं हे मला डाचू लागलं. एरवी चित्रकार असतो तर त्या अबोल भावना रेखाटण्याची तीव्र इच्छा मी दाबू शकलो नसतो.

त्यांच्या त्या बालीश आणि वक्तशील डोळ्यांनी मला खेचून घेतल्यासारखं झालं. ती पोरं कुठली वगैरे चवकशी मला नव्हती. त्याची जरूरीही नव्हती. नियमित सकाळपासून दाराशी मातीत ती खेळत असायची. एक चार वर्षांचं, दुसरं अगदी पाठचं असल्यासारखं. चेहऱ्यात अस्वच्छता हेच साम्य ! आणि ते टपोरे काळे डोळे. दुपारी उन्हं कलली की सावलीत घराच्या पायऱ्यांवर येऊन बसायची. इथे क्वचितच हाकलतात आणि इतर पोरं येत नाहीत याची त्यांना खात्री असावी.

कपडयाचा एकच जोड... फाटका. आठ आठ दिवस अंगावर असायचा. गुडघाभर पाय मातीत भरलेले असायचे. तुकतुकीत काळ्या चेहऱ्यावर त्याचे डोळे मोठी जागा व्यापत... किंबहुना त्यातच त्यांचं सारं व्यक्तिमत्त्व होतं.

खेळायला–बोलायला त्यांच्याकडे विषय नसायचा. रस्त्यातल्या दगड–धोंडयांबद्दल एकमेकांना उलटसुलट प्रश्न करत पायरीवर उगाच पाय हलवत दोघं बसायची. पेंग आल्यासारखी भरकटत बोलत रहायची. त्यात त्यांचं मन कसं रमायचं याचं मला कुतूहल होतं. एकमेकांच्या डोक्यात माती घालून त्यात मनमुराद आनंद लुटण्यापासून त्यांच्या खेळाच्या कल्पना असत.

सकाळी सकाळी शेजारचे अंतूमामा बाहेर उभे राहून किलकिल्या डोळ्यांनी सूर्य पहात पुटपुटत उभे रहायचे. त्यांच्या लेंग्याची नाडी नेहमी लोंबत रहायची. एकमेकांना खुणावत ती मुलं नाडीकडं पहात चोरून हसायची. वैचित्र्य हे अशा अल्पवयीन मेंदूला देखील कसं पटतं ? लक्ष गेल्यावर अंतूमामा त्या पोरांना हाकलायला बघायचे. पण ढिम्मपणा त्यांच्याही अंगवळणी पडला होता. खोलीत येता येता म्हणायचे, 'कुठनं नवीन नवीन कार्टी येतात कोण जाणे !' मला त्यांचं बोलणं उगाचंच लागायचं. मग ते घरमालक उधळ्या मेव्हण्यांना नावं ठेवत– कागाळ्या सांगत बसायचे.

अगदी संध्याकाळ होईपर्यंत ती मुलं घरासमोरच असायची. मागं हात बांधून...पोट काढून शिष्टासारखी इतरांचा गोट्यापाकिटांचा खेळ बघत एकाग्र व्हायची.

ती खुदखुदून हसलेली ऐकली की त्यांचं अरूप...घाण...गरिबी. निराधारत्व सगळं विरघळून गेल्यासारखं मला वाटायचे. वाटायचं...काखेत हात घालून पटकन् उचलून आणावं आणि माझ्या–अंतूमामांच्या–घैसासांच्या झकपक पोरांच्यात बसवावीत. थोडं दूर उभं रहात स्वतःची कलाकृती बघितल्यासारखं पहावं. सर्वांचा उत्साह, चैतन्य, बालीशपणा यांचा सारखेपणा अनुभवावा. जगातली आणखीही मुलं आणून अशा पंक्तीत बसवावीत. त्यांची हाडं, रक्त, मांस, यांचं वेगळेपण मनाला शिवू नये. माणसानं स्वतःच्या रक्ताच्या गोळ्याचाच तेवढा हट्ट का धरावा?

थोड्या वेळानं हा कैफ उतरायचा. उमजायचं की असं असत तर असंख्य मुलं भुकेली–रोगपीडित–असंस्कृत का राहिली असती?

पण का कोणास ठाऊक, दोघांबद्दलची माझी आस्था एकच राहिली. ती मुलं आसपास वावरायची, इतरांचा मार खायची, एकमेकांची समजूत काढायची, चिडून इतर पोरांना दगड वगैरे मारायला उठायची; माझ्या मोठ्यानं अभ्यास करणाऱ्या मुलांकडं डोळे फाडफाडून, पायरीवर जवळजवळ आडवे होत बघत बसायची, पण निव्वळ कुतूहलापलीकडे मी गेलो नाही. त्यांची प्रत्येक भूमिका–कृती ही नैसर्गिक मनुष्यभावनांचं प्रात्यक्षिक वाटायचं.

एकमेकात वडबडताना कशावरून तरी दोघं चिडीला आली. एकाने दुसऱ्याला अगदी सणसणीत शिवी दिली. त्या शिवीचा उच्चार, त्याचे हावभाव, संतापात त्यांच ते अगदी बुडून जाणं, इतकं सहज आणि वेगळं होतं की मला ते खूपच अपील झालं. त्या शिवीद्वारे आपण कोणत्या बाबीचा उल्लेख केला... त्याचा अर्थ काय याचा त्याला मागमूस नव्हता. इतरांचं ऐकून ऐकून ठराविक प्रकारच्या भावना व्यक्त करताना वापरावयाचा वाक्प्रचार म्हणूनच ती शिवी त्याने अगदी निरागसपणानं वापरली होती. त्या निरागसपणानंच मला वेढून टाकलं होतं. मला वाटलं, मेव्हण्यांबद्दल पाठीवर लोकांकडं बडबडण्यापेक्षा अंतूमामानं त्याला अशी एखादी इरसाल शिवी का ठेवून देऊ नये? यानं माझं मलाच हसू आलं.

'का हसलात?' तांदूळ निवडताना बायकोने असे प्रश्न विचारलेच पाहिजेत.

'सहज.'

'मला माहीत आहे. त्या पोरांच्या शिवीवर फुटलं असेल. पण त्यानंच आपली पोरं बिघडतात. परवा राजीव असं काही बोलला तेव्हा कोकललात हो? या पोरांना इथं थारा देता कामा नये.'

खरंच! आपली मुलं बिघडू नयेत यासाठी आपण चांगलाच आटापिटा करतो. मग या मुलांची अशी काळजी कोण घेतं? यांचे काय होणार? मग वाटायचे ही मुलं म्हणजे रंग न भरलेली चित्रं असतात. आऊट लाईन्स नुसत्या! हळूहळू त्यात लफंगेपणा, उचलेगिरी, बेछूट उग्रता, वासना यांचे रंग भरले जाणार आहेत.

त्या दिवशी सफरचंदे खात बसलेल्या माझ्या पोरांकडं ती मुलं आशाळभूत होऊन पहात होती. मी काय केलं? माझ्या मुलांना आत बसून खाण्याबद्दल सुनावलं का? एखादी फोड त्या मुलांना मी का देऊ केली नाही? रोजची ब्याद होईल म्हणून?

अशा विचारांनी मी दुबळा होत रहातो. ती मुलं सहज येऊन दरादरा ओढत वाळवंटात मला नेऊन टाकतील असं वाटतं.

रात्रीचा साधारण एक वाजला असावा. दारासमोरच्या आरडाओरडीनं जागा झालो. नेहमीचाच प्रकार असेल म्हणून कुशी बदलली. ट्रकच्या आणि माणसांच्या बोलण्याच्या आवाजातूनही मला मुलांचं आक्रंदण ऐकू आलं. झपाट्यानं उठून मी दार उघडलं. एक ट्रक दारात थडथडत उभा होता आणि त्याच्या हेडलाइटच्या प्रकाशात धूळ तरंगत होती. ड्रायव्हर खाली उतरून त्या दोन मुलांची चौकशी करत होता. त्याच्या बळकट हाताला धरून ती थरथरत रडत उभी होती. अस्पष्ट प्रकाशातले त्यांचे चेहरे फिके, भीतिग्रस्त दिसत होते. आजूबाजूची माणसं जागी होत होती. अंतूमामा आणि इतर घराच्या पायरीवर जमले होते. मी खाली उतरलो. ड्रायव्हरनं मला काय घडलं त्याची कल्पना दिली. ती मुटकुळं करून घरासमोर धुळीत झोपी गेलेली मुलं ट्रक कडेला लावताना त्याच्या लक्षात आली नव्हती. कुत्री समजून गाडी अगदी जवळ नेऊन थांबवतांना त्यांना जाग आली आणि भयंकर किंचाळत उठल्यावर ड्रायव्हरनं कचकन ब्रेक लावले होते.

'आयेऽऽऽऽ आयेऽऽऽ' असे रडत असलेली ती मुलं पाहून मन शहारलं. भीती त्यांना व्यापून उरली होती. अचानक जागं झाल्यावर प्रचंड धूड अंगावर चालून येतंय हे बघून मागसाला काय वाटेल याची कल्पना मी करू लागलो. सर्व गोष्टींचा मला राग आला.

'ही मुलं अशी बेवारशी का? त्यांना झोपायलाही जागा नाही काय? खातात कुठं, जगतात कशी?' झपाट्यानं मी एकाला उचललं, दुसरं ड्रायव्हरनं घेतलं. अंतूमामा आणि इतर एकदोघं कुतूहलानं मागं निघाली. बाकीची या विषयावर गप्पा मारत थांबली असतील. कुणीतरी पोरांच्या झोपडीची वाट दाखवली. झोपडपट्टीतल्या एका मोडक्या झोपडीसमोर उभे राहिलो. दगडांच्या राशी–साचलेली डबकी–खोक्याच्या फळ्या आणि डब्यांच्या पत्र्यांनी बनलेलं दार आम्ही ठोकलं. आत खुसपुस ऐकू आली.

'कोण आहे का?' मी.

'ओऽऽ तुमची प्वारं आनल्यात. रस्त्यावर मरायला घाटतीवती व्हय?' ड्रायव्हरच्या या वाक्यावर एका बाईची दबलेली बोंब ऐकू आली. दार उघडून ती बाहेर आली. झेप टाकून तिनं पोरांना ओढून जवळ घेतलं. आत खाकरणाऱ्या मनुष्याला उद्देशून शिव्या मोजत रडायला लागली.

मी विचारलं, 'बाईऽऽ तुमची मुलं नं ही? या वेळी अशी घरी झोपवायची सोडून उकीरड्यावर कशी टाकता? ट्रकखाली चालली होती ना आत्ता!!'

छातीवर हात पिटत ती उद्गारली, 'काय सांगू सायब? या उकिरड्यापरीस त्यो लइ ब्येस! म्या पोरं भाइर न्हाय टाकली. हतं आंगणांत झोपितीती. कवा ग्येलो असत्याल भटकाया–मला म्हायत नाय. बगा सायेब, ह्ये माणसं लोकांनला रातीची पोरं झोपडीत नको असायला. पोटापायी समदं करावं लागतंय...'

'पहा–म्हणत नव्हतो की ही पोरं अशाच बायकांची असणार–थारा देता कामा नये–लेकाचे–' अंतूमामा हळू माझ्या कानात कुजबुजले. त्यांचा हा आगाऊपणा मला कर्कश वाटला...भीती दाखवून गेला. आसपास जाग येऊ लागली होती.

मी पाठ फिरवून चालू लागलो. असंख्य मुलांच्या कलेवरांच्या, बाल्याचा; अन्न, वस्त्र, भूक, आरोग्य, वात्सल्याच्या गरजेचा चिखल रस्त्यात माजला होता. त्यातून वाट काढत मला घराकडं जायचं होतं. ☐ ☐

पुस्तके

## अरण्यरुदन....डांगे....आणि लू मंडळ

# प्रतिक्रिया - खुलासा

'अरण्यरुदन आणि पालखीची गाणी' या काव्य-संग्रहावरच्या श्री. अ. प्र. डांगे यांच्या दि. ७-२-१९७६ च्या अंकातील परीक्षणासंबंधीची आमची प्रतिक्रिया.

१ : पुस्तक परीक्षणात पुस्तकाच्या रसग्रहणात्मक परिचयाला प्राधान्य आणि त्या संदर्भात कराव्या लागणाऱ्या जनरलायझेशन्सना दुय्यम महत्त्व असावे, पुस्तकाच्या रसग्रहणात्मक परिचयाला प्राधान्य दिल्यामुळे परिचय-वस्तूच्या संदर्भात अटळ व अचूक असणारीच सर्वसामान्य विधाने लेखात केली जात आहेत वा नाहीत याचे भान लेखकाला राहणे सोपे होते आणि स्वैर व अप्रस्तुत मतप्रदर्शनाचा धोका कमी होतो. अशोक डांग्यांच्या लेखात हे भान राखले गेलेले दिसत नाही. प्रस्तुत परीक्षणात प्रत्यक्ष परिचय-वस्तूसंबंधीच्या चिंतनात श्री. डांगे उणे पडलेले दिसतात व परिणामी लेखनात दिशाहीनता जाणवते.

२ : सुरुवातीच्या तीन परिच्छेदांत आजच्या मराठी (नव)कवितेसंबंधी काही जनरलायझेशन्स केलेली आहेत. श्री. डांगे यांना असे म्हणावयाचे आहे असे दिसते : आजच्या मराठी कवितेची दोन गटांत विभागणी करता येईल — १. वैयक्तिक जाणिवेची कविता—ग्रेस, महानोर, पोतदार, खोत, गुर्जर, कल्लोळी, कारेकर इ. २. सामाजिक जाणिवेची कविता—पाडगावकर, सुर्वे.

नामदेव ढसाळांच्या बाबतीत मात्र श्री. डांगे यांचा गोंधळ झालेला दिसतो. कवितेची सुबोध वर्गवारी करण्याबद्दल आणि श्री. डांगे यांना अभिप्रेत असणारी वर्गवारी ही वस्तुस्थिती आहे किंवा नाही याबद्दल मतभेद असू शकतील. (उदा. आम्हाला पाडगावकर आणि सुर्वे प्रभृतींची कविता ही हेतुपुरःस्सर समाजाभिमुख झालेली कविता avowedly social in outlook—वाटते. तर खोत—गुर्जर प्रभृतींची कविता ही विशाल सामाजिक संदर्भातील वैयक्तिक कविता वाटते.) पण आधीच मराठी कवितेची वर्गवारी करून, ती सर्वमान्य वस्तुस्थिती असे गृहीत धरून परीक्षणासाठी आलेले पुस्तक त्यात कुठे बसते हे पाहणे हा आम्हाला अव्यापारेषु व्यापार वाटतो.

३ : परीक्षणातील जे शेवटचे दोन परिच्छेद प्रस्तुत पुस्तकावाबत आहेत, त्यातदेखील श्री. डांग्यांनी अत्यंत संदिग्ध स्वरूपाची अधांतरी विधाने विखुरलेली आढळतात. उदाहरणार्थ : १. कदाचित तशी तुटक अभिव्यक्ती कवीला अभिप्रेत असेलही किंवा नसेलही... २. भोगांची पालखी शब्दातून वाहून नेताना कुलकर्णींचे शब्द मोकळे होतात. इ. इ. एकूणच डांग्यांचे पुस्तकावरील लिखाण हे प्रचितीचे बोलणे वाटत नाही. यावरून दोन शक्यता संभवतात. एक तर श्री. डांगे यांना 'अरण्यरुदन आणि पालखीची गाणी' हा संग्रह फारसा आवडलेला नसताना खाजगी कारणास्तव त्यावर लिहावे लागले असावे किंवा श्री. डांगे यांची सवेदनक्षमता पुस्तकातील कविता समजावून घेण्याच्या दृष्टीने पुरी पडली नसावी व परिणामी कवितांसंबंधी काही मौलिक विचार करणे त्यांना शक्य झाले नसावे. श्री. डांगे यांच्या प्रामाणिकपणावर आमचा विश्वास असल्याने दुसरीच शक्यता आम्ही प्रत्यक्ष घडली असे मानतो.

४ : 'अरण्यरुदन आणि पालखीची गाणी' तील कविता ही खोत—ढसाळ—गुर्जर प्रभृतींच्या कवितेच्याच जातीची आहे, असे श्री. डांगे म्हणताहेत असे वाटते. त्याच्याशी आम्ही सहमत नाही. प्रस्तुत पुस्तकातील दोन कवितांची शीर्षकेच दिलीप कुलकर्णींच्या कवितेचे वेगळेपण सिद्ध करणारी आहेत. तसेच त्यांचे बाह्यांगही. शिवाय कवितेतील प्रतिमासृष्टी हा कवितेच्या आशयाचा अविभाज्य घटक असतो, दिलीप धोंडो कुलकर्णींच्या प्रतिमासृष्टीचे वेगळेपणही उठून दिसणारे आहे, एका परंपरेशी नाते सांगणारे. कुलकर्णींच्या कवितेचे खोत, ढसाळ, गुर्जर प्रभृतींच्या कवितेशी असणारे साम्य सकृतदर्शनी स्वरूपाचेच आहे. दोन्ही कविता 'नव' आहेत असे म्हटल्यानंतर ते संपते. या वेगळेपणाचे श्रेय कुलकर्णींना देऊन त्याचे मूल्यमापन करण्याचे कर्तव्य श्री. डांगे यांनी बजावलेले दिसत नाही.

५ : परीक्षणात दिलेली कवितांची तीनही अवतरणे चुकीची लिहिली गेली आहेत. उदा. 'तुझ्यातून परतलाय माझा आवाज' असं मुळात असताना 'तुझ्यातून परतलंय माझं आकाश' असं लिहिलं जाणं ही चूक कंपोझिटरची वाटत नाही. कविता नीट न वाचल्याचं हे चिन्ह आहे का ?

६ : पुस्तक परीक्षण ही एक सामाजिक जबाबदारी आहे. वृत्तपत्र-नियतकालिकातून लिहिल्या जाणाऱ्या पुस्तक-परीक्षणांचे सर्वसामान्य वाचकांच्या संवेदनक्षमतेवर, अभिरुचीवर दूरगामी परिणाम होतात. मुख्य कारण असं की अभिजात समीक्षा-व्यापारापासून सर्वसामान्य माणूस चार पावलं दूरच राहतो व वृत्तपत्रीय परीक्षणांतूनच स्वतःची साहित्यविषयक मते बनवतो. ही वस्तुस्थिती असल्यामुळे पुस्तक परीक्षकांवर एक गंभीर जबाबदारी पडते. ही जबाबदारी व्यवस्थित पार पाडावयाची असल्यास परीक्षकास बौद्धिक गचाळेपणा करून चालणार नाही. वृत्तपत्रीय परीक्षणात जनरलायझेशन्स होणे जितके साहजिक आहे, तितक्याच प्रमाणात परीक्षकाने आपण अनधिकाराने नाजुक गुंतागुंतीच्या अभिजात समीक्षेच्या क्षेत्रात गोंधळ निर्माण करत नाही आहोत, याची दक्षता घेतली पाहिजे. वृत्तपत्रीय परीक्षणात केली जाणारी सर्वसामान्य विधाने ही त्या घडीला साधारणपणे सर्वमान्य असणाऱ्या समीक्षा-सिद्धान्ताची जाण परीक्षकाला आवश्यक असते. तेव्हाच वैचारिक मतभेद आणि वैचारिक गोंधळ यातील फरक स्पष्ट होतो आणि साहित्याच्या आस्वादासाठी आवश्यक असलेले निरोगी वातावरण पुस्तक-परीक्षक निर्माण

करू शकतो. श्री. डांग्यांनी या बाबतीत निराशा केली आहे असे प्रस्तुत परीक्षणाच्या संदर्भात खेदाने नमूद करीत आहोत.

**चंद्रकांत कल्लोळी, अनिल द्रविड व इतर**

'लृ' लेखन वाचन मंडळ, कोल्हापूर

७-२-१९७६

☐

लृ लेखन वाचन मंडळाच्या 'अरण्यरुदन आणि पालखीची गाणी' ह्या माणूसमधील (७ फेब्रुवारी) माझ्या परीक्षणावरील चर्चा वाचली. त्या संबंधात मी खालील गोष्टी स्पष्ट करतो.

१ : कवितांच्या अवतरणांसंबंधीच्या चुका ह्या केवळ कंपोझिंगच्याच आहेत.

२ : कवितेतील प्रतिमासृष्टी हा कवितेच्या आशयाचा अविभाज्य घटक असतो हे अगदी बरोबर असले तरी केवळ प्रतिमा म्हणजेच आशय नव्हे हेही लक्षात घ्यायला हवे आणि अरण्यरुदनमधल्या प्रतिमा ह्या दुर्दैवाने नुसत्या प्रतिमाच ठरतात. कवितेच्या एकसंध आशयाची उभारणी करण्यात त्या अयशस्वी ठरतात. म्हणूनच अरण्यरुदनमधल्या कविता तुटक तुटकपणेच जाणवतात. अर्थात ह्या उपमांच्या देखणेपणाची दखल त्या परीक्षणात आवर्जून घेतली आहे.

३ : अलीकडच्या सगळ्याच नव्या कवितांची दखल घेऊन, त्यांची वर्गवारी करून, त्या संदर्भात अरण्यरुदनचा विचार करणे हे तर मुळीच चुकीचे ठरत नाही.

४ : ह्या परीक्षणातले केवळ दोनच परिच्छेद अरण्यरुदनच्या वाटयाला आले आहेत हे योग्यच आहे त्या कवितेच्या व्यक्तिमत्त्वाच्या मर्यादाच त्याला कारणीभूत ठरतात असे ह्या चर्चेच्या संदर्भात प्रामाणिकपणे स्पष्ट करावे लागते.

५ : संवेदनक्षमता, मौलीक विचार, सामाजिक जबाबदाऱ्या, बौद्धिक नेटकेपणा, अशा सर्व गोष्टींचा प्रत्यय या परीक्षणातून येत नाही असे ते म्हणतात. ह्यावरून ते अजूनही परीक्षणासंबंधीच्या आपल्या पारंपारिक, ठोकळेबाज, पूर्वग्रहदूषित कल्पनांनाच चिकटून राहताना दिसतात असेच दुर्दैवाने म्हणावे लागते. म्हणूनच समीक्षा-सिद्धान्ताचा खोटा बडिवार ते मंडळ माजवत रहाते हेच खरे ठरेल. येवढेच.

**—अशोक प्रभाकर डांगे**

**[ही चर्चा येथे थांबवण्यात आली आहे—सं.]**

फ्रॉम रशिया...

# माझी दारं बंद का करता ?

लेव्ह पॅट्रोव्हिच, ज्यू नागरिकांनी इस्त्रायलला स्थलांतर करावे म्हणून आपण प्रयत्न करीत असता त्यासाठी आपण आपल्या फ्लॅटमध्ये एक कचेरी उघडली आहे. तुम्ही अनेक कुटुंबे मोडली आहेत, लहान मुलांना आईवडिलांपासून अलग केले आहे, व झिओनिस्ट प्रचार केला आहे. इस्त्रायलला स्थलांतर करणारा प्रत्येक रशियन ज्यू तुमचा बळी आहे. कधीतरी तुम्हाला याचा जाब द्यावा लागेल.—पाव्हेल पर्सटेव्ह.

—माननीय, जे माझ्याकडे येतात त्यांनी माझ्याकडे येण्यापूर्वीच रशिया सोडण्याचा निर्णय घेतलेला असतो-ज्यांना देश सोडावास वाटतो पण जे माझ्याकडे अद्याप आलेले नाहीत त्यांना तुमची भीती वाटते. इस्त्रायलला स्थलांतर करावे अशी भावना रशियन ज्यूंच्या मनात कोण निर्माण करतं, त्याचा प्रचार कोण करतं हे जर तुम्हाला खरोखरच जाणून घेण्याची इच्छा असेल तर मी तुम्हाला ते सांगतो. कवी मॅक्झीम लुझानीनं याच्या कविता जो रशियन ज्यू वाचतो त्याला रशिया तातडीने सोडला पाहिजे असे वाटते, ज्यू व इस्त्रायलची सतत बदनामी करणारा पत्रकार व्ही. मिखोलोव्ह याचे सतत येणारे लेख वाचून ज्यू वैतागतो, त्याचप्रमाणे ज्यू द्वेष पसरविणारे असंख्य लोक रशियन ज्यूंनी इस्त्रायलला स्थलांतर करावे, असा प्रचार प्रत्यक्ष अप्रत्यक्षरीत्या करतात.

—लेव्ह पेट्रोव्हीच

—वरील पत्रव्यवहार बोलका आहे के. जी. बी. चे मिन्स्क या शहरातील एक अधिकारी पाव्हेल पर्सटेव्ह व रशियन लष्करातील मोठा मान मिळविलेले हवाईदलातील माजी अधिकारी लेव्ह पेट्रोव्हीच यांच्यात झालेल्या पत्रव्यवहारातील दोन पत्रे. पेट्रोव्हीच हे रशियन ज्यू. त्यांनी इस्त्रायलला स्थलांतर करण्याची परवानगी मागितली; परंतु ती मान्य करण्यात आली नाही. ५४ वर्षांचे पेट्रोव्हीच हवाईदलातून पंधरा वर्षांपूर्वी निवृत्त झाले. देश सोडण्यासाठी त्यांनी अर्ज केला. परंतु तो नाकारण्यात आला. कारण त्यांना रशियाची अनेक लष्करी गुपिते माहिती आहेत असे देण्यात आले.

पेट्रोव्हीच यांच्यावर ठेवण्यात आलेले आरोप मिन्स्क येथील वृत्तपत्रात प्रसिद्ध करण्यात आले. परंतु पेट्रोव्हीच यांचे उत्तर प्रसिद्ध करण्यात आले नाही.

रशिया सोडून जाण्याची परवानगी मागितलेला परंतु ती नाकारण्यात आलेला एक गट रशियात आहे. पेट्रोव्हीच यांच्यावरील ही जाहीर टीका बदललेल्या धोरणाचे लक्षण आहे. रशिया व अमेरिकेच्या सुधारलेल्या संबंधांमुळे धोरणात थोडा बदल झाला होता. परंतु लोक व विचारांची मोठ्या प्रमाणावर मुक्तपणे देवाणघेवाण करण्याचे तत्त्व हेलेसिंकी येथील परिषदेत मान्य करण्यात आलेले असले तरी ७५ च्या उत्तरार्धात स्थलांतरिताची परवानगी मागणाऱ्यांविरुद्ध मोहिम सुरू करण्यात आली आहे. अनेकांना विनाचौकशी तुरुंगात घालण्यात आले आहे. त्यांना कायद्याचे संरक्षण नाही. १ जानेवारी ७६ च्या नवीन कायद्यानुसार परदेशी पाहुण्यांनी दिलेल्या भेटी व आर्थिक मदत स्वीकारण्यास रशियन ज्यू लोकांना मनाई करण्यात आली आहे. स्थलांतरासाठी अर्ज केल्यानंतर नोकरी जाते. बाहेरून मिळणाऱ्या थोड्या मदतीवरच हे लोक आपला चरितार्थ चालवित. पण आता तेही अशक्य झाले आहे.

स्थलांतर करणाऱ्यांवर येणाऱ्या दडपणामुळे परवानगी मागणारांची संख्या कमी झाली आहे. रशियातून इस्त्रायलला १९७३ साली ३० हजार लोक गेले तर ७५ साली हा आकडा १० हजारावर आला. रशियाबाहेर गेलेल्यांचा अपेक्षाभंग झाल्यामुळे बाहेर जाणाऱ्यांच्या संख्येत घट झाली आहे, असे के. जी. बी. च्या अधिकाऱ्यांचे म्हणणे.

'तुमच्यासारखे भडकविणारे लोक नसते तर लोकांनी स्थलांतरासाठी अर्ज केले नसते.' असे पर्सस्टेव्ह याने पेट्रोव्हीचला पत्रात कळविले आहे.

पेट्रोव्हीच उत्तरात म्हणतात, 'तुमची जर तशी खात्री आहे तर माझी दारं तुम्ही बंद का करता ? मला रशियाबाहेर जाऊ द्या. म्हणजे तरी स्थलांतर करणाऱ्यांचे अर्ज कमी होतील.' □

## □ पुस्तकांचा काळाबाजार

रशियासारख्या एकतंत्री राज्यातही कसा काळाबाजार चालतो. त्याच्या काही हकीकती अधूनमधून बाहेर येत असतात. अमेरिकेशी संबंध सुधारल्यानंतर रशिया व बाह्य जगातील पोलादी पडदा आता काहीसा विरला असला तरी तो फारसा पारदर्शक झालेला नाही.

वाङमयाबाबत रशियातील सरकारी यंत्रणा फारच जागरूक. शब्दाचं सामर्थ्य ते जाणतात. त्यामुळे रशियात प्रसिद्ध होणारा प्रत्येक शब्द सेन्सॉरच्या तीक्ष्ण डोळ्याखालून जातो. रशियातून बाहेर जाणारे प्रत्येक पुस्तक, हस्तलिखित व पत्र हे सेन्सॉरच्या डोळ्याखालून जाते. बाहेरून रशियात येणाऱ्या पुस्तकांवर तर विशेष लक्ष असतं. ती काळजीपूर्वक पाहिली जातात. बाहेरून रशियात येणाऱ्या पुस्तकाबाबत तीन गोष्टी घडण्याची शक्यता असते. एक म्हणजे ती पुस्तकं सेन्सॉरच्या हातून सुटून ज्या माणसाला पाठविली आहेत त्याला मिळू शकतात, काही पुस्तकं नष्ट करण्यात येतात, तर काही पुस्तकांचे काय झाले याचा पत्ता लागू शकत नाही. म्हणजेच ही पत्ता न लागलेली पुस्तकं रशियातील पुस्तकांच्या काळ्याबाजारात जाऊन पडतात.

बेपत्ता पुस्तकांबद्दल ती ज्याला पाठविली त्याला न मिळाल्यास चौकशी केली असता 'पुस्तकांबाबत कायद्याप्रमाणे निर्णय घेण्यात येईल.' येवढेच कळविण्यात येते. ते पुस्तक नष्ट केले आहे की हरविले आहे की त्याचे वाचन चालू आहे या प्रश्नाला सरकारी अधिकारी उत्तर देत नाहीत.

काही पुस्तके कोणताही माग न लागता बेपत्ता होतात कशी हा खरा प्रश्न. रशियन सेन्सॉरशिप यंत्रणेतील एका बड्या अधिकाऱ्यामार्फत गेली १५ वर्षे काही पुस्तके काळ्या बाजारात मोठ्या किंमतींना विकण्यात आली आहेत. काही महिन्यापूर्वीच या अधिकाऱ्याला सात वर्षे सक्तमजुरीची शिक्षा झाली. परंतु या प्रकरणी माहिती दाबण्यात आली. फक्त या अधिकाऱ्याला शिक्षा झाल्याची बातमी रशियातील वृत्तपत्रांनी दिली, कारण मात्र दिले नाही.

पुस्तकांचा काळाबाजार निर्माण करणाऱ्या या सेन्सॉरच्या अधिकाऱ्याच्या प्रकरणात एक मूलभूत प्रश्न उपस्थित होतो. एकतंत्री राज्यात जी दक्षतेची यंत्रणा असते या यंत्रणेवर लक्ष ठेवायचे कुणी ? या ठिकाणी सेन्सॉरशिप बोर्ड हे जबाबदार आहे.

रशियात कोणतीही गोष्ट छापावयाची किंवा बाहेरून विकत आणायची असल्यास परवानगी काढावी लागते. रशियन लोकांनी काय वाचावे व काय वाचू नये हे ठरविणारी संस्था म्हणजे सेन्सॉरशीप बोर्ड. हिब्रू भाषेचे प्राथमिक पुस्तक ते प्लेबॉय मासिकापर्यंत बंदी घालण्यात आलेली आहे.

पुस्तकाच्या काळ्याबाजाराचा शोध नुकताच लागला. एका स्वीडिश फर्मने १९७४ मध्ये एक पार्सल मॉस्कोला एकाकडे पाठविले. त्यात स्त्रीयांचे पोशाख होते. परंतु हे पार्सल रशियन अधिकाऱ्याच्या नावावर आहे म्हणजेच ती एक भेट आहे असे ठरवून सेन्सॉरशीप बोर्डाने ते पार्सल जप्त केले.

परंतु स्वीडीश कंपनीने, पाठविलेले हे पार्सल ज्याला पाठविले त्याला न मिळाल्याची तक्रार केली वरच्या पातळीवरून चौकशीची सूत्रे हालली त्यात अशा प्रकारची अनेक पार्सले जप्त करण्यात आल्याचे आढळून आले.

अधिक खोलवर चौकशी केल्यानंतर सेन्सॉरशीप बोर्डाचे डेप्युटी डायरेक्टर अँड्री सोकोलोव्ह याला अटक करण्यात आली. त्याच्याकडे परदेशी पुस्तकांच्या छाननीचे काम सोपविण्यात आलेले होते. त्याच्या ऑफिसवर व घरावर छापे घालण्यात आले. त्यात 'नष्ट केलेली' अशी नोंद केलेली १७० कपाटे भरून पुस्तके आढळून आली. अशी पुस्तके नष्ट न करता ती बाहेर काढून विक्री करणाऱ्या सोकोलोव्हने गेल्या १५ वर्षांच्या कारकिर्दीत रशियन पुस्तकांचा काळाबाजारच उभारला आहे.

काळाबाजारातील पैशावर सोकोलोव्ह चैनीत राहात होता. दोन फ्लॅटस्, दोन बायका व वर्षातून दोन सुट्ट्या. त्याच्याकडे सापडलेल्या पुस्तकांबाबत काहीच माहिती नसल्याचे सेन्सॉरकडून सांगण्यात आले. सोकोलोव्ह एकटाच होता की पुस्तकांच्या काळ्याबाजारात इतर कुणाचे हात होते कळू शकलेले नाही. परंतु सोकोलोव्हच्या 'बॉस' ला ताबडतोब मुदतीपूर्वीच सेवानिवृत्त करण्यात आलेले आहे.

□ □

राज्यपुरस्कार मिळालेले या वर्षीचे राजहंस प्रकाशन

॥ शतपावली ॥

रवींद्र पिंगे

# ‘छोटी सी बात’च्या निमित्ताने....

शिरीष सहस्रबुद्धे

‘छोटी सी बात’ हा पूर्णपणे हिंदी चित्रपटाच्या चाकोरीबाहेरचा चित्रपट आहे, असा दावा करायचं धाडस मीही करणार नाही. कोणीच करू नये, कारण तो मान्य होण्यासारखा नाहीच. चित्रपटाचा विषय, एका शब्दात सांगायचा तर प्रेम हा आहे आणि तो तर हिंदी चित्रपटांच्या चाकोरीचा अविभाज्य घटक. पण तरीसुद्धा या दोघात फार मोठं अंतर आहे आणि ते अंतर पडतं ते प्रेम या प्रकाराकडे ज्या विविध ‘अँगल्स्’मधून पाहिलं जातं त्यामुळे. सर्वसामान्यतः अगदी प्रेमविषयक हिंदी चित्रपटातसुद्धा त्या प्रेमाचा एक ठराविक ‘रोल’ असतो, त्याला त्याची जागा नेमून दिलेली असते. कारण त्या वापडद्या निर्मात्या-दिग्दर्शकांना निखळ प्रेमाखेरीज सेक्स, व्हायोलन्स, फालतू कॉमेडी वगैरे वरीच पथ्यं आणि तंत्रं संभाळायची असतात. बासू चतर्जी वेगळा पडतो आणि वैशिष्ट्यानं उठून दिसतो तो इथं. ‘रजनीगंधा’ या त्याच्या गाजलेल्या चित्रपटात काय किंवा आता आलेल्या ‘छोटी सी बात’ मध्ये काय, बासू चटर्जी एक अखंड प्रेमकहाणी सुबद्ध वारकाव्यांसकट आपल्यासमोर उलगडून ठेवतो, प्रेम ही वस्तू तो ‘मसाला’ म्हणून राववीत नाही, हे त्याच्या यशाचं एक गमक आहे असं मला वाटतं. तो एक अखंडित आणि स्वयंपूर्ण अनुभव आहे, असं त्याच्या या दोन्ही चित्रपटांत जाणवल्याशिवाय रहात नाही.

अर्थात ‘रजनीगंधा’ आणि ‘छोटी सी बात’ यांची तुलना मी इथं करणार नाही, ते अप्रस्तुत ठरेल कारण त्या दोन्हीची विश्वं वेगळीच आहेत आणि मुख्य म्हणजे दिग्दर्शकाचे प्रेम या एकाच अनुभवाकडे बघण्याचे दोन अगदी स्वतंत्र दृष्टिकोन त्यात उमटलेले आहेत. तसं पाहिलं तर या दोहोंची तुलना करायचा मोह व्हावा इतकं बाह्यतः साम्य त्यांच्यात आहे. दोन्हीतले प्रमुख कलाकार, संगीतकार वगैरे तेच आहेत हे तर झालंच, पण त्याशिवाय महत्त्वाचं म्हणजे प्रेम ही एक संपूर्ण चित्रपट व्यापून टाकणारी समस्या म्हणूनच दोन्हीकडे सादर केलेली आहे. या समस्येचं साधारण स्वरूप, प्रेम जमणं (की बसणं, की आणखी काही?) त्यातले चढउतार आणि खऱ्या प्रेमाचा शोध लागल्यानंतर त्याची मिलनातील पूर्तता असं आहे, असं स्थूल पृथक्करणानं सांगता येईल. साहजिकच ही समस्या टोकापर्यंत नेण्यासाठी अपरिहार्य ठरणारा तो परंपरागत प्रेम-त्रिकोण दोन्ही चित्रपटांत येतोच आणि तरीही त्यांची तुलना करणं अयोग्य आणि अनावश्यक ठरतं, याचं कारण एकच आणि ते म्हणजे दिग्दर्शकाचा बदलता दृष्टिकोन. रजनीगंधातल्या प्रेमसमस्येकडे पहायचा खुद्द बासूंचा दृष्टिकोन मूलतः गंभीर, काहीसा भावुक आणि त्या आपद्ग्रस्तांबद्दल सहानुभूतिपूर्ण असाच होता आणि साहजिकच प्रत्येक प्रेक्षकाच्या आत कुठंतरी दडलेल्या सामान्य माणसाच्या काळजाला हा चित्रपट भिडू शकला. छोटी सी बातला हे यश लाभेलच असं नाही, कारण त्यातला ‘प्रेमळ’ प्रश्न बासूंनं महामिष्किल चष्म्यातून स्वतःच पाहिलाय. ज्या सीरियस टोनमध्ये त्यांनं रजनीगंधातला त्रिकोण सादर केला त्याचा मागमूससुद्धा छोटी सी बातमध्ये नाही. उलट त्याची जागा काही ठिकाणी तर हाय फार्सिकल टच्नं घेतलेली आहे. रजनीगंधातल्या त्रिकोणाची तीनही—निदान अमोल पालेकर आणि दिनेश ठाकूर ही दोन तरी टोकं आपापल्या परीनं स्थिरपद असतात आणि त्या दोन्हीमध्ये सापडलेल्या नायिकेच्या जिवाची कोण उलघाल. उलट छोटी सी बातमध्ये पहावं तर त्रिकोण उभा करतानाच त्यातल्या दोन टोकांची—अमोल आणि असरानी—मनमानी मोडतोड अर्थात फार्सिकल मोडतोड, करायलासुद्धा बासूनं मागंपुढं पाहिलेलं नाही. तेव्हा छोटी सी बातवर शिक्का मारायचाच झाला तर रोमँटिक कॉमेडी असा मी मारू शकेन; पण रजनीगंधाचा शिक्का योग्यसा मला अजून सापडलेला नाही. कदाचित त्यामुळेच तो अधिक संस्मरणीय ठरत असावा, कारण छोटी सी बात पहायला प्रेक्षागृहात जाणारे आणि पाहून बाहेर पडणारेही प्रेक्षक रजनीगंधाच्या आठवणीही उत्कटतेनं मनात घोळवताना जाणवतात.

तेव्हा ही छोटी सी बात अशी एक रोमँटिक कॉमेडी आहे. त्यातही पुन्हा तुलना करायचीच झाली तर रोमँटिक वृत्तीपेक्षा खेळकर विनोदच वरचढ ठरल्यासारखा वाटतो. रोमान्स हा इथं विनोदी किंवा विडंबनात्मक दृष्टिकोनातून पाहिला गेलेला आहे, हे त्याचं कारण आहे. ही एक फार्सिकल शर्यत आहे. दोन प्रेमिकांची आणि निशाना अर्थातच विद्या सिन्हा, म्हणजे कथेतली प्रभा नारायण. बुझदिल, डरपोक अशा अरुण प्रदीपनं (अमोल पालेकर) तिला जिंकण्यासाठी चालवलेले हास्यास्पद प्रयत्न आणि तिच्याच ऑफिसातला एक सहकारी नागेश (असरानी) यानं प्रतिस्पर्धी बनून अरुणच्या भाबड्या धडपडीला वेळोवेळी दिलेले छेद या सूत्राभोवतीच मध्यन्तरापर्यंतची कथा फिरते आणि हटकून हसवणाऱ्या छोट्या-मोठ्या घटनांनी फुलत जाते. वास्तवाचं भान निखळ विनोदातही न सोडणारी कथा-वस्तू मध्यंतरानंतर मात्र तावडतोब फॅन्टसीच्या दिशेनं वाटचाल करायला लागते. प्रेमात यशस्वी होण्यासाठी अरुण खंडाळ्याला जाऊन चक्क एक ट्रेनिंग कोर्स करतो, रि. कर्नल ज्युलियस नगेन्द्रनाथ विल्फ्रेड सिंग (अशोककुमार) यांच्या तज्ज्ञ मार्गदर्शनाखाली. आणि त्या अनुभवाच्या बळावर ही शर्यत जिंकतो. चित्रपटाची कथा यापेक्षा विस्तारानं सांगण्यात अर्थ नाही, त्याचं इथं काही प्रयोजनही नाही. मला महत्त्वाची वाटते ती कथा नव्हे, तर इथं केलेली तिची हाताळणी. रजनीगंधामध्ये प्रेमाची थट्टा कुठेही केलेली नव्हती. अगदी त्या दृश्यातसुद्धा—दिनेश ठाकूरबरोबरचं पहिलं प्रेम

संपल्यानंतर विद्या सिन्हा आत्महत्येचा जो हास्यास्पद प्रयत्न करते, तिथेसुद्धा—बासूला दाखवायची होती ती त्या अपरिपक्व प्रेमामधलीसुद्धा उत्कटता, त्यातला भावनांचा गुंता. तो काही विनोदनिर्मितीचा प्रयत्न नव्हता. पहिलं कोवळं प्रेमबंधन खरं की आताचं अमोलवरचं 'मॅच्युअर्ड' प्रेम खरं हा सवाल विद्यापुढं होता, तो जीवनमरणाच्याच पातळीवर उकलायचा होता, तसा तो उकलला गेलाही. इथे छोटी सी बातमध्ये पाह्यलं तर सगळं कसं वेगळंच वाटतं. किती एक गोष्टींचा प्रच्छन्न, प्रसंगी अगदी चक्क टिंगलटवाळीसुद्धा बासू चतर्जीनं इथे इमानेइतबारे केली आहे. मनापासून गंभीरपणे काही पाह्यची आणि प्रेक्षकांनाही पाह्यला लावायची त्याची इच्छाच दिसत नाही. त्याची पात्रं इथं प्रेमात पडतात म्हणजे अगदी सपशेल आपटतातच. मध्यंतरापर्यंत अरूण (अमोल), प्रभा (विद्या)चा जो अखंड पाठलाग करीत असतो, तो याचा उत्तम पुरावा आहे. कमलेश्वरजींची खमंग कॉमेंटरीसुद्धा या लज्जतीत भरच टाकते आणि 'लव्ह अॅट फर्स्ट साइट' किंवा 'खमंग प्रेम' या सारख्या तुमच्याआमच्या उदात्त प्रेमकल्पना शतशः विदीर्ण व्हायची पाळी येते. बासू चतर्जीच्या या उपहास—परिहासाच्या धारेतून कुणीच सुटत नाही. रिटायर्ट कर्नल सिंगच्या घरच्या कोंबडचांनासुद्धा असणारा त्याचा दरारा, त्या अनुभवी बुजुर्गाकडे सल्ला मागण्यासाठी होणारी रंकरावांची झुंबड, त्यातच एकदा खुद्द अमिताभ बच्चननं येऊन इन्कमटॅक्ससंबंधी खाजगी सल्ला मागणं, कर्नलनं केलेलं अरूण (अमोल)च्या रोगाचं अर्धमानसशास्त्रीय निदान, प्रतिस्पर्ध्यावर मात करून प्रेयसी पटकावण्याच्या सिंगनं त्याला शिकवलेल्या प्रॅक्टिकल युक्त्या—प्रयुक्त्या आणि तंत्रमंत्र—या साऱ्यांची मिष्किल टिंगल करायची एकही संधी यात दवडलेली नाही. कथा, पटकथा, संवाद आणि दिग्दर्शन ही चारही महत्त्वाचं क्षेत्रं एकत्र हाताळायला मिळाल्याचा पुरेपूर फायदा बासूनं यात उठवला आहे. शेवटी नागेश (असरानी) हा अरूणचा प्रतिस्पर्धीसुद्धा (तो आधी कर्नलकडून पोस्टल टचूशननं हे प्रेमशास्त्र शिकत असतोच), महिनाभर रजा टाकून विद्यार्थी म्हणून कर्नलसाहेबांकडे खडाळ्याला येतो, हा मामला म्हणजे तर सर्वस्पर्शी आणि सर्वव्यापी 'पॅरडी'चा. या एकूणच परिहासप्रकाराचा (सटायर) कळस म्हणायला हवा.

अर्थात हे सर्व खरं असूनही, 'छोटी सी बात' हा नुसताच वरवरचा विनोदी चित्रपट आहे, असा जर निष्कर्ष कुणी काढला तर मलासुद्धा ते बासूइतकंच आवडणार नाही. मुळात विशुद्ध विनोदी चित्रपट आपल्या प्रेक्षकवर्गाला कितपत रुचतात हा एक वादाचाच मुद्दा होईल. पण तो विचार बाजूला ठेवला तरी एक नक्की की बासू चतर्जी आणि छोटी सी बात यांचं यश हे निव्वळ विनोदात किंवा विडंबनात नाही. ते मुख्यतः आहे ते त्यानं दाखवलेल्या मानवी मनोव्यापारांच्या प्रातिनिधिक आणि प्रभावी, सूक्ष्म, सखोल अशा चित्रणामध्ये. रजनीगंधातल्या प्रेमसमस्येची मनःपूर्वक केलेली हाताळणी काय किंवा छोटीसी बात मधल्या त्याच प्रॉब्लेमला दिलेली पॅरडी— सटायरची गहरी डूब काय, या दोन्हीचा पाया एक ठाम आहे, तसा दुर्मिळही आहे, तो आहे पात्रांच्या सूक्ष्म मनोविश्लेषणाचा. सरळ साध्या, मध्यम वर्गीय माणसांच्या मनाचे— या संदर्भात प्रेमिकांच्या मनाचे म्हणा हवं तर, पण—पापुद्रे तो इतक्या सफाईनं उलगडत जातो की त्याची कुठलीही व्यक्तिरेखा अतिशय पटणारी (कन्व्हिन्सिंग), कुठंतरी आतपर्यंत भिडणारी आणि बऱ्याचदा पुनःप्रत्ययाचा आनंद देणारी ठरते. तुमच्याआमच्यातलेच नमुने उचलून त्यांची मनं तळापर्यंत स्वच्छ उघडून ती तो आपल्यासमोर मांडतो, त्यांचं जीवन त्यातले नानाविध संगप्रसंग तो इतक्या इमानदारीनं मांडतो, की रजनीगंधातल्या समस्येशी समरस होताना काय किंवा छोटी सी बातमधल्या टिंगलखोरीची दाद देताना काय, माणूस थोडाफार तरी अंतर्मुख झाल्याशिवाय राहत नाही, इथंच बासूनं आपला डाव जिंकल्याची साक्ष पटते.

बासू चतर्जीच्या प्रतिभेला आणि बहुविध कौशल्याला मानसशास्त्रीय ज्ञानाच्या भक्कम पायाची जशी साथ मिळालीय्, तशीच आणि तितक्याच तोलामोलाची साथ त्याला दोन्ही चित्रपटांत मिळालेय्, ती त्याच्या कलाकारांकडून आणि अन्य सहकाऱ्यांकडून. या कलावंतांचा म्हणजे प्रामुख्यानं अमोल पालेकर, विद्या सिन्हा, असरानी, दिनेश ठाकूर आणि अशोककुमार यांचा उल्लेख आधी केलेलाच आहे, आणि त्यांच्या अभिनयसामर्थ्याबद्दल काय किंवा या दोन चित्रपटांतल्या त्यांच्या कामगिरीबद्दल काय, मी नव्यानं प्रशंसा करण्यासारखं काय आहे? आपल्या अपेक्षापूर्तीचं निर्दोष समाधान देणारा हा कलावंतांचा संच बासूला लाभलेला आहे. रजनीगंधामध्ये गाडी सुटताना, दिनेशला निरोप देणाऱ्या विद्या सिन्हानं दिलेली ती एक्स्प्रेशन्स किंवा छोटी सी बातमध्ये विद्या अमोलच्या ऑफिसमध्ये प्रथमच येते त्या संपूर्ण प्रसंगातली त्याची अदाकारी अशा काही गोष्टी सहजी विसरू म्हणून विसरता येण्याजोग्या नाहीत. रजनीगंधाच्या यशानंतर विद्या सिन्हा तर चित्रसृष्टीत चांगलीच 'सेट' झाली आहे. आता चाहत्यांचे डोळे लागले आहेत ते अमोलकडे. आधुनिक रंगभूमीचा हा एक आधारस्तंभ— चित्रसृष्टी गाजवील अशा अपेक्षा या दोन चित्रांद्वारे निर्माण करणारा—कसा प्रवास करतोय, हे पाह्यची उत्सुकता आहे. चित्रपटांचे गीत-संगीतकार योगेश आणि सलील चौधरी ही जोडीही जमल्यासारखी वाटतेय. गीतकार योगेश तर ताज्या दमाचे आहेतच, पण सलिलच्या संगीतातला गोडवा, त्यातली जादू स्पीड आणि ऱ्हिदमवरचा त्याचा ताबा हे सगळे अबाधित आहेतच. मात्र गीतांच्या चालीमध्ये डोकवायला लागलेला तोचतोचपणा, काहीसा साचेबंदपणा काळजी करायला लावणारा आहे. तरीही विशेषतः या छोटी सी बातमध्ये सलिलच्या पार्श्वसंगीताची चमक प्रकर्षानं जाणवली. खासकरून लाइट रोमॅंटिक मूड त्याला अचूक पकडता आलाय् असं लक्षात येतं. तीनही गाण्याचं सिच्युएशन्स, टेकिंग आणि छायाचित्रणादी इतर तांत्रिक अंगाबाबत तक्रारीला कुठंच वाव नाही, कारण बी. आर. चोप्रासारख्या जायंट प्रोडचूसरचं पाठबळ बासूला लाभलेलं आहे.

एकच महत्त्वाचा मुद्दा राहिला, तो कथेच्या स्वतंत्रतेचा— ओरिजिनॅलिटीचा. डॅनी के अभिनीत 'द सिक्रेट लाईफ ऑफ बॉल्टर मिटी' आणि दुसरा एक चित्रपट 'दे आर ऑल स्काउंड्रल्स' या दोन्हींची छाप 'छोटी सी बात'वर वरीच असल्याचं सांगितलं जातं. हे योग्य की अयोग्य, हा आणि इतर उपप्रश्न असे जाता जाता सांगण्यासारखे नाहीत, पण एवढं खरं की मी स्वतः आणि असेच शेकडो सामान्य रसिक या सगळ्यांना ही छोटी सी बात आपलीच वाटली, परक्या रक्ताची न भासता आपल्या मातीशी नातं सांगणारी जाणवली, वास्तवाचा किनारा न सोडताही फॅंटसीच्या राज्यात घुसून शोधबोध आणि रंजन यांचा एक कलात्मक अदृश्यगोफ विणणारी वाटली, यातच खूप काही आलं. या साऱ्यासाठी एखादुसरा गुन्हा त्यांना माफ आहे! □ □

# साप्ताहिक भविष्य

## कृष्ण माईणकर

### ६।३।७६ ते १२।३।७६

### मुख्यमंत्री शंकरराव चव्हाण कसोटीला उतरतील

महाराष्ट्राच्या राशीसमोर,मिथून राशीत मंगळ आहे. हा मंगळ मुख्यमंत्री शंकरराव चव्हाण यांच्याकडून काही अनपेक्षित धाडसी निर्णय घेववील व ते अमलात आणण्याच्या बाबतीत मुख्यमंत्री यशस्वी देखील होतील. या सप्ताहाच्या मध्यास म्हणजे दि. ८ पासून महाराष्ट्र विधी मंडळाचे अंदाजपत्रिकी अधिवेशन सुरू होणार आहे. सर्वसामान्य लोकांना दिलासा व काही बायांना 'तडाखा' बसणारे अंदाजपत्रक असू शकेल. काँग्रेस पक्षाला लोकांत जाऊन बाजू पटवून देण्याची मोठी जबाबदारी पार पाडावी लागणार आहे. मकर, धनु, मेष व सिंह राशीच्या राजकारणी व्यक्ती जनतेच्या चर्चेचा विषय बनतील. मध्यवर्ती मंत्रिमंडळात तात्पुरत्या बदलाची शक्यता नाकारून चालणार नाही. परराष्ट्र संबंधात आमचे सामर्थ्य जगाच्या रंगमंचावर खूप वाढेल. चीनला भारताच्या मैत्रीची इच्छा होऊ लागेल. अंतर्गत राजकारणात थोडी खळबळ.

**मेष : आत्मशक्ती वाढेल**

गुरू राशीत आल्यापासूनच तुमचे आत्मतेज बळावले आहे. त्रास, कटकट मनाची आंदोलीत स्थिती, निराशा असे सारे काही आता इतिहासजमा झाले आहे. आता पाऊल पुढे पडेल. जिथे हात घालाल तिथे यशाचे मोती घेऊन बाहेर पडाल. नोकरी असो की उद्योग असो आता यशाची निश्चिती मनात धरूनच तुम्ही कामाला लागा. अनेक दिवस ज्या एका संधीची तुम्ही वाट पहात होतात ती संधी या आठवड्यात तुमच्याकडे सहज चालत येईल. अनेकांचे अडथळे दूर होतील. ज्यांचे विवाह ठरत नव्हते किंवा अडचणी येत होत्या त्यांचे विवाह आश्चर्य वाटावे इतके झटपट जमतील. नोकरीत आता त्रास नाही. वरिष्ठांबरोबर चांगले संबंध प्रस्थापित होतील. मालक खूष राहील. आर्थिक परिस्थिती हळूहळू सुधारत असल्याची जाणीव होईल. महिलांना नोकरी मिळू शकेल. स्वतःचा धंदा सुरू करता येईल. पैसा कमी पडणार नाही. विद्यार्थ्यांना कलाक्षेत्रात मोठी संधी मिळेल.

**वृषभ : धीर सोडू नका**

जीवनात कधी फार चांगले दिवस तर कधी अडचणीचे दिवस येतात त्यामुळे खचून न जाता येणाऱ्या आव्हानास धैर्याने तोंड देणे हा खरा पुरुषार्थ असतो. सांप्रत आपले सारे हित फक्त शनीच्या हाती आहे. केतू व गुरु बारावे झाले आहेत. त्यामुळे आर्थिक आघाडी अडचणीसाठी सतत धगधगती राहाणार आहे. फक्त गरजा भागतील. पैशासाठी प्रतिष्ठेचा बळी मात्र अजीबात जाणार नाही. शुक्रवारचा उपास करा. तो फलदायी होईल. सोमवार ते गुरुवार लेखी करार वगैरे करू नका. अपेक्षित व्यक्ती भेटणार नाही. नोकरीत तसे वाईट काहीच नाही. उद्योगात नव्या कल्पना प्रत्यक्षात येतील व पसारा वाढेल. तब्येत मात्र आळसावलेली राहील. महिलांना नोकरीत सहानुभूति मिळणे कठीण आहे. काम खूप पडेल. विद्यार्थ्यांना कसली ना कसली चिंता राहील.

**मिथुन : ताठ उभे राहाल**

दुसरा शनि असला तरी तो तुम्हाला वाईट नाही. मंगळ पहिला झाला आहे तो तुम्हाला सारे धैर्य देणार आहे. दुःख आणि निराशा यामुळे खचून गेलेले तुमचे मन आता ताठ उभे राहू लागेल. अडचणी संपल्या असे नव्हे; पण त्यातून मार्ग निघेल. अनेकांचे सहकार्य मिळेल. कर्जाचा प्रश्न मार्गी लागेल. वसुलीसाठी तुम्हाला त्रास देणारे अधिकारी बदलून जातील. नोकरीत निःश्चित असावे. आयत्यावेळी वरिष्ठ तुमच्यामागे उभे राहातील. घरातील आजारपण हळूहळू कमी होण्याची चिन्हे यावेळी दिसू लागतील. बदलीचा प्रश्न लांबणीवर पडेल. रविवार ते बुधवार शारीरिक स्वास्थ्य मिळेल. दगदग कमी होईल. महिलांच्या कर्तृत्वाला संधी मिळेल. उद्योगात मन रमेल. विद्यार्थ्यांना पैशाची मदत मिळू शकेल.

**कर्क : आर्थिक पेच**

बाराव्या मंगळाने तुमचे मदतीचे मार्ग थोपवून धरले आहेत. त्यामुळे तुम्ही त्रासून गेलात तर नवल नाही. तरी पण परिश्रमाने का होईना या परिस्थितीतून तुम्हाला बाहेर पडण्याचा मार्ग या आठवड्यात सापडू शकेल. बचत होणे नाही. पण रोजच्या गरजा भागतील. स्थावराचा अगर शेती बागायतीचा व्यवहार त्रासाचा होणार आहे. उगाच भांडणे निर्माण होऊ शकतील. गैरसमज वाढतील. नोकरीत रजा मिळणे कठीण होईल. वरिष्ठांबरोबर हुज्जत घालावी लागेल. चालू कामात वाढ होईल. अडचणीची बदली तहकूब होणे कठीण आहे. बेकारांना उद्योगासाठी कर्ज मिळाले तरी ते प्रत्यक्ष हाती येताना त्रास उद्भवेल. महिलांना उद्योगात त्रास आहे. घरगुती खरेदीत फसवणूक होईल. विद्यार्थ्यांना मानसिक त्रास. कष्टही पडतील.

**सिंह : काही चांगले घडेल**

गुरु भाग्यस्थानी आलेला आहे हीच मुळी तुमच्याबाबतीत फार मोठी जमेची बाजू आहे. त्यामुळे गेले अनेक दिवस तुमच्याबाबतीत जे टीकेचे वा उपेक्षेचे वातावरण आहे त्यात बदल होईल. या आठवड्यात तुमचे मित्र कोण व हितशत्रू कोण याची तुम्हाला ओळख पटेल. त्यामुळे आगामी वाटचाल स्पष्ट होईल. आर्थिक बाजू पैसा मिळवून खर्च करील. म्हणजे शिल्लक काही नाही. राहाणीमानात थोडा फार चांगला फरक पडेल. नोकरीधंद्याची स्थिती फारशी समाधानकारक नसली तरी अगदीच प्रतिकूल नाही. कामाचे चीज होईल. रविवार, बुधवार व गुरुवार हे अनुकूल दिवस आहेत. लॉटरीचे तिकीट घ्या. महिलांना नोकरीत कामाचा ताण पडला तरी चीज होईल. विद्यार्थ्यांना समाधान देणारा सप्ताह आहे.

**कन्या : संसारिक अडचणी**

हा आठवडा सांसरिकदृष्टया थोडाफार त्रासाचा आहे. मग तेवढयाने हताश होऊ नये. उष्णतेच्या विकारामुळे शारीरिक त्रास होईल तेवढाच. बाकी तसा हा आठवडा प्रगतीकारक घटना घडवून आणणार आहे. नोकरीत कामाचा ताण कमी होणार नाही. पण सहकाऱ्याची मदत मिळेल. तसेच तुमचे काम वरिष्ठांच्यादेखील नजरेस पडेल. दुय्यम धंदा वाढण्याच्या दृष्टीने काहीतरी योजना

आखू शकाल. त्यासाठी योग्य तो मार्ग सापडेल. सार्वजनिक कार्यात प्रतिष्ठा व मोठेपणा मिळेल. वरिष्ठांबरोबर चांगले संबंध प्रस्थापित होतील. महत्त्वाचा पत्रव्यवहार होईल. शनिवार व रविवार महत्त्वाच्या व्यक्ती भेटतील. महिलांना शारीरिक स्वास्थ उत्तम मिळेल. तब्येत सुधारेल. विद्यार्थ्यांना अकारण मानसिक त्रास.

**तूळ : नोकरीत वर्चस्व**

सातवा गुरू ही सांसरिक जीवनास एक प्रकारची प्रीतीची फुलवेल बहरणारीच घटना होय. ज्यांचे विवाह अजून ठरले नव्हते त्यांनी आता प्रयत्न सुद्धा करावयास नको. झटपट जमून जाईल. प्रेम, स्नेह, वात्सल्य यामुळे कुटुंबस्वास्थ उत्तम मिळेल. नोकरीच्या बाबतीतच आता तुम्ही काय बोलावे? साहेब, प्रमोशन सहज मिळून जाईल. तुमच्याबरोबर जे वरिष्ठ उद्धट वागत होते तेच तुमची शिफारस करणार आहेत. कोणतेही पदवीधर बेकार असो त्याच्यासाठी नोकरीचे ताट आता वाढून ठेवले आहे असे त्याने मानायला हरकत नाही. उद्योगात प्रगती व नवा उत्साह निर्माण होईल. शुक्रवार उपास करा. महिलांना मानसिक स्वास्थ व आनंद मिळणार आहे. विद्यार्थ्यांना 'गोड' सहवास मिळेल.

**वृश्चिक : चिंता कमी होईल.**

काही वेळा जे ग्रह प्रतिकूल म्हणून असतात तेच काहीतरी अकल्पितपणे चांगले घडवतात. आठवा मंगळ तसा सांसरिकदृष्ट्या प्रतिकूलच आहे. तरीपण तो तुमचा राशिस्वामी असल्यामुळे आर्थिक परिस्थिती सुधारेल यात शंका नाही. लॉटरीव्यवहारात लाभ. जमिनीची खरेदीविक्री यात नफा असे काहीतरी जमून येईल. कर्जाचा थोडाफार निरास होईल. तात्पुरत्या गरजा भागतील. मनःस्थिती व शारीरिक कमकुवतपणा सुधारेल. काहीतरी करावे असे वाटू लागेल. नोकरीत रजा घेऊन स्वस्थ बसण्याची मान्यता कमी होईल. उद्योगात मन रमवावे असे वाटू लागेल. वरिष्ठांबरोबरचे संबंध सुधारतील. महिलांना आर्थिक मदत मिळेल. बेकारांची स्थिती फार प्रतिकूल रहाणार नाही. विद्यार्थ्यांना चैनीवर नियंत्रण ठेवावे लागेल. त्यांनी वाहन हळू हाकावे.

**धनु : स्थैर्याची सुरुवात**

गुरू पाचवा हेच तुमच्या बाबतीत सर्वात महत्त्वाचे बल आहे. राशिस्वामी पाचवा म्हणजे यश, तपस्यापूर्ती, महत्त्वाकांक्षेला प्रोत्साहन होय. नोकरीत आता काळजी करू नका. तुमच्याविरुद्ध कारस्थानें व कट करणाऱ्या लोकाविरुद्ध आक्रमक पवित्रा घेऊन उभे राहा. तूर्त तरी तुमच्या कामाच्या बाबतीत बदल होणार नाही. बेकारांना आता निराश होण्याचे मुळीच कारण नाही. स्वतः एखादा स्वतंत्र उद्योग सुरू करावयाचा असल्यास त्याला योग्य असे पाठबळ मिळू शकेल. आर्थिक ताण कमी कमी होत जाणार असून त्याची चाहूल याच आठवड्यात लागेल. आत्मिक बल वाढेल. तब्येत सुधारणार आहे. उत्साह ओसंडून येईल. महिलांना नोकरीत प्रवेश मिळेल. चालू नोकरीत प्रमोशन मिळेल. विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षा द्यायला अनुकूलता आहे.

**मकर : मंगळाचा त्रास आहे**

मंगळ हा मकर राशीचा मित्र आहे. पण तो सध्या शनीच्या जवळ असून तुम्हाला तेवढासा अनुकूल नाही. उष्णतेचे विकार होणे, भावनावशता वाढणे, धाडसाने विवेकशीलता सोडणे असे काहीतरी तुमच्या बाबतीत होऊ शकेल. सत्तेवर व राजकारणात असणाऱ्यांनी याबाबतीत जास्त काळजी घेणे आवश्यक आहे. नोकरी सुखाची राहील पण कामाचा ताण विलक्षण वाढेल. तसेच अधिकारदेखील वाढणार आहेत. तुमच्यापैकी जे कुणी सार्वजनिक क्षेत्रात निवडणुकीत उभे राहतील ते मोठे यश मिळवून यशस्वी होतील. तब्येतीची थोडीफार कटकट चालू राहील. पैशाची कमतरता भासणार नाही. शेती, दुकानदारी, स्टेशनरीव्यवसाय तेजीत चालेल. पत्रव्यवहार मात्र सावधगिरीने करा. मंगळवारी उपास करा. महिलांना उष्णतेच्या विकारापासून थोडा फार त्रास जाणवेल. विद्यार्थ्यांनी संयमाने वागणे आवश्यक आहे.

**कुंभ : मानसन्मान मिळेल.**

रवी पहिला तर गुरू तिसरा आहे हे दोन्ही ग्रह तुमच्याकडून काहीतरी विशेष घडवणार आहेत. तुमच्या कर्तृत्वाला नवे क्षेत्र मिळवून देणार आहेत. राजकारणात तुमची लोकप्रियता उंचावणार आहे. ज्यांनी विरोध केला तेच सहकार्याचा हात पुढे करतील. नोकरीच्या दृष्टीने अत्यंत प्रगतीचा व मोठेपणात भर घालणारा हा काळ आहे. एखाद्या महत्त्वाच्या कामासाठी तुमची योजना होणार असून तुमचे कर्तृत्व तेथे कसोटीला उतरणार आहे. चालू नोकरीत वरिष्ठांबरोबर आपुलकीचे संबंध जुळून येतील. मालक खूष राहतील. पगारवाढ अगर विशेष सवलती मागायला हरकत नाही. तब्येत चांगली राहील. हाती घेतलेले काम उरकण्याची जिद्द निर्माण होईल. शनिवार व बुधवार महत्त्वाच्या व्यक्ती भेटतील. महिलांना आर्थिक प्राप्ती चांगली होईल. नोकरी कायम होईल. विद्यार्थ्यांना परीक्षेत मोठे यश मिळेल.

**मीन : अडचणीवर यश**

मित्र हो, गुरू तुमच्या राशीचा स्वामी आहे. पण तो दुसरा झाला त्यामुळेच तुमचा आता थोडाफार फायदा होईल. तुमच्यापैकी ज्यांचे विवाह व्हायचे असतील त्यांना हा गुरू तेवढासा अनुकूल नसला तरी इतर बाबतीत तुमची अडचणीतून सुटका करणारा असा हा काळ आहे. पैसे सहज मिळणार नाहीत पण कमी पडणार नाहीत. पैशामुळे कोणतीच कामे अडून राहणार नाहीत. चालू नोकरीत थोडेफार खटकले तरी नुकसान नाही. वरिष्ठांना लहर येईल व ती तुम्हाला त्रासदायक ठरेल. पण तरीदेखील प्रत्यक्षात नुकसान नाही. परदेशी जाण्याची संधी चालून येईल. महत्त्वाचा पत्रव्यवहार करा. गाठीभेटी घेण्यास बरीच अनुकूलता आहे. महिलांना वाङ्मयाची गोडी लागेल. नोकरी मिळेल. पैसा खेळता राहील. विद्यार्थ्यांनी अभ्यासात श्रम करावेत. □ □

# या चित्रपट व्यवसायातली माणसं बेदरकार आहेत, धाडसी आहेत, बेहिशोबी आहेत, पण कृतघ्न नाहीत ....

### श्रेष्ठ साहित्यिक आणि प्रसिद्ध दिग्दर्शक विश्राम बेडेकर यांची ही मनमोकळी मुलाखत

**सुशिक्षित असूनही चित्रपटव्यवसायात आपण कसे शिरला? अजूनही आपल्याला चित्रपटव्यवसायात पूर्वीइतकाच रस आहे ह्याचे रहस्य काय?**

माझा बाळपणाचा काळ वऱ्हाडमध्ये गेला. वऱ्हाड हे मराठी रंगभूमीचे एक उदार आश्रयस्थान. मी नाटकाकडे आकर्षित झालो होतो; पण त्या काळच्या घरंदाज कुटुंबातील लोकांनी नाटकांत जाणं हे सामाजिक प्रतिष्ठेत बसत नव्हतं. कॉलेजशिक्षणासाठी मी नागपूरला गेलो. बी. ए. ला अर्थशास्त्र होते. वर्गात मूलभूत शंका विचारणे ह्या माझ्या आवडीच्या गोष्टी. तुमच्या अर्थशास्त्राची टिंगल करायचा हेतू नाही; पण ऐन परीक्षेच्या वेळी थोडंफार वाचून मुख्यतः बरीच मॅथॅमेटिकल सूत्रे आणि भरपूर आकृत्या काढून मी बरेच मार्क मिळवू शकलो. पुढे M. A. झालो. LL. B. झालो. सनद घेतली नाही. दरम्यान इंग्लंडला जाण्याची संधी आली. तिथे 'हस्ताक्षरतज्ज्ञ' झालो. भारतात परत आल्यावर कायदेशीर बाबतीत कोर्टामध्ये फोर्जरी इ. प्रकरणात मी सरकारी तज्ज्ञ म्हणून सल्ला देऊ लागलो. मुळात आवड स्वतंत्र विचाराची, साहित्याची आणि डॅशिंग जीवनाची. नोकरीतील खोटेपणाची, लाचारीची व लाचार वातावरणाची मनस्वी चीड आली. वकिलांबद्दलही उबग आला. कोल्हापूर–सांगली भागात आलो आणि तिथपासूनच चित्रपटाचे संवाद, पटकथा इत्यादींत लक्ष घालू लागलो. माझा पहिलाच चित्रपट 'टायटल' आठवत नाही, त्यात मी एका प्रामाणिक माणसाचा हे व्यवहारी जग चोहोबाजूंनी किती कोंडमारा करते ह्या मध्यवर्ती कल्पनेवर आधारलेली आणि विनोदाचं मध्यम असलेली कथा सादर केली. त्यानंतर बरीच कामे मिळू लागली. फ्री लान्स कोणाचीही ताबेदारी न करता पटकथा लिहिणे, कायदेशीर सल्ला देणे, हस्ताक्षरतज्ज्ञ म्हणून स्वतंत्रपणे काम करणे अशा गोष्टींनी चरितार्थ सुरू झाला. सांगलीच्या कोर्टातही एका केसमध्ये तिथल्या साहेबांशी माझा खटका उडाला होता. मुख्य म्हणजे स्वतंत्र वृत्ती आणि चाकोरीतल्या अळणी जीवनाचा तिटकारा. शिकलेल्या व चित्रपटाबद्दल काही दृष्टी असलेल्या माझ्यासारख्या तरुणाला सिनेमावाल्यांमध्ये आदर मिळाला, इज्जत मिळाली. ह्यात नवल ते काय! शांतारामबापूंबरोबर साहाय्यक म्हणजे त्यांचा मित्र-सल्लागार ह्या नात्याने मी काम करू लागलो. 'रामशास्त्री' हे माझं चित्र गाजलं. आपणा सर्वांना माहीत आहे की माझे अनेक चित्रपट–पटकथा व दिग्दर्शनामुळे–गाजले, यशस्वी झाले. 'वासुदेव बळवंत' काढला. दरम्यान अशीच एकदा साहित्यावरून ईर्षा घेतली, पैज लावली. 'रणांगण' नावाची कादंबरी लिहून पुरी केली. ती कादंबरी मराठी साहित्यात युगप्रवर्तक आहे, फारच वेगळी आहे, इत्यादी इत्यादी मोठे साहित्यिक लोक म्हणतात. अलीकडे माझा मराठी चित्रपटव्यवसाय तसेच साहित्य इत्यादींशी संबंध जवळजवळ नाहीच. व्यवसायाकरिता मुंबईला आलो. मुंबईत हिंदी चित्रपटनिर्मात्याकडून चांगली वागणूक, चांगले पैसे मिळायचे. आश्चर्य वाटेल आपल्याला पण मी माझे हे घर सोडून कुणाकडे आयुष्यात चित्रपटातले काम मागायला किंवा अप्रत्यक्षपणे कॅनव्हास करायला न जाताही मला कायम घरबसल्या काम मिळतंय. गेली ३०–४० वर्षे चित्रपटव्यवसायात पटकथा आणि सल्लामसलत ही कामे करून मुंबईतल्या चित्रनगरीतील चांगल्या फ्लॅटमध्ये उच्च राहणीमान ठेवून इतकी वर्षे हा व्यवसाय करतोय. ह्या व्यवसायाने मला माझ्या आवडीनुसार स्वातंत्र्य दिले, मिजास दिली, इज्जत दिली, पैसा दिला, कीर्ती दिली, ऐश्वर्य दिले, कलानिर्मितीचा आनंद दिला, म्हणूनच अजूनही मला चित्रपटव्यवसायाबद्दल फार प्रेम वाटतं–त्याबद्दल कृतज्ञता वाटते, निष्ठा वाटते.

**चित्रपटव्यवसायातील उत्पन्न दरमहा नियमितपणे मिळत नाही. त्याचप्रमाणे व्यवसायात पडलेली माणसे नीतिमत्ता, सभ्यता, संस्कृती ह्यांना पारखी झालेली असतात असा प्रवाद आहे; त्याबद्दल आपले मत काय?**

चित्रपटव्यवसायात नोकरीप्रमाणे दरमहा अखंडितपणे पगार मिळत नाही ही गोष्ट खरी आहे; पण मग जे स्वतंत्र व्यावसायिक असतात, उदा. डॉक्टर, वकील, चार्टर्ड अकाउंटंट, टॅक्स सल्लागार, मॅनेजमेंट कन्सल्टंट यांना तरी कुठे नियमित खात्रीचा पगार मिळतो? ज्याप्रमाणे २–३ कन्सल्टिंगच्या केसेस मिळाल्या, वर्षात एखादी मोठी वसाहत करण्याचा प्लॅन एखाद्या आर्किटेक्टला मिळाला की त्याचे वर्षभराचे उत्पन्न हे सरासरी २००० रु. महिन्याच्यावर जाऊ शकते आणि सबंध वर्ष त्यांनी काहीच केले नाही तरी त्यांना जो नवनवीन वाचायला वेळ मिळतो, विचार करायला वेळ मिळतो तो माझ्या मते बुद्धिमंत व्यावसायिकाला जरुरीचा आहे. कधीकधी असंही झालंय की मी ४-६ वर्षांत एकही काम केलेलं नसतं; पण त्यापूर्वी केलेली कमाई बरीच असते. परत एखादे मोठे कॉन्ट्रॅक्ट मिळते. अगदी आपणहून चालत येते. पुन्हा एकदा मोठी बेगमी होते. सर्वसामान्य मराठी माणसाला ही कल्पनाच कशीशी वाटेलही. ८-१० वर्षे कधी कधी काहीच काम मिळत नाही. दरम्यान एखादा मनुष्य चित्रपटधंदा सोडून एखादे औषधाच्या गोळ्यांचं दुकान काढून बसेल; पण एकदा का तुम्ही ते करू लागला की ह्या धंद्यातल्या परिघाबाहेर तुम्ही जाता. तुम्हाला आता चित्रपटात स्वास्थ्य नाही असे संबंधितांना वाटतं आणि मग एकदा टाकलेले पाऊल तुम्हाला चित्रपटधंद्यातून बाहेरच घेऊन जातं. अगदी अलीकडची गोष्ट सांगतो. मला बराच काळ काम नव्हतं; पण एके दिवशी एक फार मोठे निर्माते आले. त्यांना सम्राट चंद्रगुप्त व आर्य चाणक्य ह्यांच्यावर चित्रपट तयार करायचा आहे. ऐतिहासिक चित्रपट म्हटला की साहजिकच माझं नाव लोकांच्या लक्षात येते. हे चित्र फार अवाढव्य बजेटचे आहे. निर्मात्याला काही कोटी रुपये खर्चून अमेरिकन क्लासिक्सप्रमाणे ते चित्र अगदी त्या काळातल्याप्रमाणे हुबेहूब उभे करायचे आहे. उदाहरणार्थ टन कमांडमेंटस्, बेनहर, क्लियोपात्रा ह्या धर्तीचे. ह्यात नट

नावाजलेले, संगीत सर्वश्रेष्ठ संगीतकाराचे, सर्व काही टॉप क्वालिटीचे त्यांना करावयाचे आहे. त्यातले ऐतिहासिक बारीकसारीक तपशील समजून पटकथा लिहायची. ह्या कामाचे जे पैसे मला आता मिळणार आहेत त्यामुळे ह्यापुढे कुठलेही काम आले नाही तरी चालेल. अशा संधी चित्रपटात येतात पण त्याकरता एक प्रकारची मनाची तयारी व पेशन्स लागतो.

दुसरं मी स्पष्ट सांगतो–' चित्रपटातल्या धंद्यात तुमच्या इतर कोणत्याही प्रतिष्ठित धंद्यापेक्षा जास्त प्रामाणिकपणा आहे. सर्वात Honest Profession माझ्या मते हाच आहे. त्याचप्रमाणे माणुसकी, दिलदारी इथेच अनुभवायला मिळते. चित्रपटातल्या माणसांच्या नीतिमत्ता, सभ्यता इत्यादींबद्दल उच्चभ्रू व प्रतिष्ठित, तसेच कंगाल आणि मध्यमवर्गातल्या लोकांनी आकसाने, मत्सराने, अज्ञानाने मुद्दाम अशा वावड्या उठवल्या आहेत. अतिश्रीमंत माणसं, अतिप्रतिष्ठित माणसं खाजगी जीवनात कसं वागतात ह्याच्या खोलात आपण सहसा जात नाही; पण नटाला ग्लॅमर असते. नटीबद्दल एक प्रकारचे शारीरिक आकर्षण असते. त्यामुळे त्यांच्या खाजगी जीवनाबद्दल लोकांना फार कुतूहल असते. मी शेकडो माणसं सिनेमात ओळखतो. प्रोड्यूसर, फिनान्सरपासून तो एक्स्ट्रॉपर्यंत; पण ही माणसं तुमच्याआमच्यासारखीच आहेत. त्यांच्यात कित्येक निर्व्यसनी आहेत, सच्छील आहेत, नम्र आहेत, सभ्य आहेत हे सांगून खरे वाटले नाही, तरी काही हरकत नाही; पण ही वस्तुस्थिती आहे. एखादा चित्रपट आपटला तर त्याचे ठरलेले पैसे चुकते होत नाहीत हे खरे आहे; पण त्याच निर्मात्याचे दुसरे एखादे पिक्चर त्याला नशीब देऊन गेले तर तो आठवणीने तुमच्याकडे येऊन बाकी राहिलेल्या रकमेच्या किती तरी पट तुमच्या हातावर ठेवून जाईल. म्हणजे ह्या व्यवसायातील माणसं बेदरकार आहेत, धाडसी आहेत, बेहिशोबी आहेत; पण कृतघ्न आहेत असे म्हणता येणार नाही.' अर्थात ह्या नियमाला अपवाद असतील, नाही असं नाही. सारांश चित्रपटातील सारी माणसं नादान, मद्यपी, जुगारी, बाहेरख्याली, लंपट व लाचार असतात अशी समजूत बदलली पाहिजे.

साधारणपणे हा व्यवसाय कसा चालतो ? त्यातली उलाढाल कशी होते ? खर्च कसा होतो ? त्याची तरतूद कशी होते ?

ह्या व्यवसायातला सूत्रधार म्हणजे चित्रपटनिर्माता. त्याचे काम सर्व गोष्टींची जुळवाजुळव करणे. ह्याने चांगलासा दिग्दर्शक मिळवला, कथा मिळवली, उत्तम ग्लॅमर असलेला नट मिळवला, पडद्यावर सुरेख दिसणारी नटी मिळवली, इतर कास्ट ठरवली व आघाडीचा संगीतदिग्दर्शक ठरवला की वरेचसे सुरुवातीचे काम होते. ही योजना तो फिनान्सरपुढे ठेवतो. फिनान्सरला चित्रपटाचा अंदाज पक्का असतो. समजा, राजेश खन्ना, धर्मेन्द्र, हेमामालिनी, अमिताभ बच्चन अशी कास्ट ठरली तर ते चित्र फारसे आपटणार नाही. लक्ष्मीकांत प्यारेलाल, राहुलदेव बर्मन अशासारखे विनीचे संगीतकार घेतले की आणखी सुरक्षितता वाढली. मग तो भांडवल देऊ लागतो. ' भांडवलाची पद्धत १०० रुपये मुद्दलापैकी ६५ रु. हातावर ठेवणे. जसजसे पैसे मिळतात तसतसे निर्माता, नट–नटी, कॅमेरामन, दिग्दर्शक, संगीतकार, कवी, लेखक ह्यांना पैसे देत जातो. पैसे मिळाले की नट किंवा नटी शूटिंगला हजर होतात. पुढच्या शूटिंगला पैसे आले नाहीत तर त्यांचा सेक्रेटरी ती डेटच घेत नाही. त्यामुळे नटनट्यांचे पैसे वसूल होतातच. संगीताचे महत्त्व आपल्या हिंदुस्तानी चित्रपटात फार आहे. त्यामुळे संगीतकाराचे पैसे हा खर्चाचा मोठा Item. मग टेक्निशिअन्स, पटकथालेखक, गीतकार ह्यांना ठरवलेल्यापैकी हप्त्याहप्त्याने पैसे दिले जात असतात. एकदा ही फिल्म आकार घेऊ लागली की भारतभर काही वितरक आहेत त्यांना ह्याचा सुगावा लागतो. ही मंडळी त्या चित्रपटाचे विभागीय वितरण-हक्क घेण्यास सरसावतात. ' High Budget Film असेल तर रोख पैसे देऊन हे अधिकार विकत घेण्यास राजी होतात.' त्यांचेकडून जसजसे पैसे येऊ लागतात...ॲडव्हान्स...चित्रपट पुरा व्हायच्या आधी तसतसा निर्माता आपले फिनान्सरचे कर्ज भागवू लागतो. उदाहरणार्थ ' शोले ' पिक्चर घ्या. साधारणपणे २०–३० टक्के रक्कम त्याच्या उलाढालीपेक्षा जास्त मिळाली तरी तो खूश होतो. त्याला फायदा मिळून जातो. समजा, वितरकांनी चांगला प्रतिसाद दिला नाही तर जास्तीत जास्त तोटा निर्मात्याचाच होतो. ' त्यामुळे ह्या व्यवसायात हा सर्वांत केविलवाणा प्राणी (Scapegot) हा निर्माताच असतो.' काही वेळा काही निर्मात्यांचे विकलेले चित्रपट वितरकांना कोटयवधी रुपये मिळवून देतात; पण स्वतः निर्माता हा मात्र तसाच कोरा राहतो.' यशाच्या वेळी वाटा नाही मात्र अपयशाचा बोजा संपूर्ण असं वाल्या कोळ्यासारखं ह्याचं दुःख आहे.' काही निर्मात्यांच्या स्वतःच्या वितरणसंस्था आहेत त्यांना बऱ्यापैकी प्राप्ती होती. आपले शांतारामबापू त्याबाबतीत फार व्यवहारी. अलीकडचे दादा कोंडके हेही ह्या तंत्रात निष्णात झाले आहेत. पण ह्या निर्मात्याबद्दल एक गोष्ट सांगायला हवी. ती म्हणजे कुठलेही पिक्चर त्याने काढायचे ठरवले की फिनान्सरकडून आणलेली काही रक्कम उदा. १०–१५ हजार रुपये प्रथम तो आपल्या पत्नीच्या स्वाधीन करतो. तिच्या माहेरी सुरक्षित पाठवून देतो आणि मग पुढे सर्व व्यवहार सुरू करतो. यदाकदाचित सगळा धंदा बिघडला तरी तो रडत रहातो. त्याच्याबद्दल सर्वांना अनुकंपा वाटते. त्याने सर्वांना चांगले पैसे दिलेले असतात म्हणून; पण त्याने आपल्या योगक्षेमाची सोय व्यवस्थितही करून ठेवलेली असते.

काही वेळा दिग्दर्शक हे संघटकांचे काम स्वतः करतो. तो निर्माता मिळवतो–मग सर्व साखळी सुरू.

' हिंदी चित्रपटाला एकूण हल्लीच्या काळात किमान १०–१५ लाख रुपये खर्च येतो. मराठी चित्रपटाला ४–५ लाख, ह्याचे कारण चित्रपटाची फिल्म, इतर साधनसामग्री ही महाग झाली आहे व अभिनेत्यांपासून तंत्रज्ञापर्यंत सर्वांची पेमेंटस् वाढली आहेत. चित्रपटाच्या खर्चातील उतरंड अशी. सर्वात जास्त पैसे प्रमुख अभिनेत्याला (Hero) द्यावे लागतात. त्यानंतर अभिनेत्री. मग संगीतदिग्दर्शक. मग दिग्दर्शक. त्यानंतर छायाचित्रकार व इतर सहअभिनेते व तंत्रज्ञ. आपला असा गैरसमज असतो की, अभिनेत्रीला सर्वात जास्त पैसे मिळत असतील; पण सुंदर स्त्रियांचा पुरवठा देखण्या व अभिनयसंपन्न तरुणांपेक्षा जास्त असतो म्हणून हिरोला जास्त पैसे मिळतात. देव आनंद, दिलीप कुमार हे अजूनही हिरोच. ह्यांचे पिक्चर पडले तरी निर्मात्याला एका रनमध्ये भरपूर पैसे देऊन

जातात. संगीत हा चित्रपटातला एक फार महत्त्वाचा भाग. चांगले संगीत हे चित्रपटाला यश मिळवून देते. म्हणून कोणत्याही चित्रपटाच्या चित्रीकरणाच्या आधी गाणी तयार होतात. त्यांच्यावरून त्याच्या यशापयशाचा अंदाज बांधता येतो; पण कुठलाही चित्रपट घेतला तर त्याच्या मटेरिअलपेक्षा मॅनपॉवर ( कास्ट ) खर्चाचे प्रमाणच जास्त असते. 'मराठी चित्रपटात हिरो, हिरॉइन ह्यांचे ग्लॅमर कमी असल्यामुळे ह्यांची कास्टव्हॅल्यू कमी त्यामुळे 'लो बजेट फिल्म' काढणे प्रादेशिक भाषांत जमू शकते. यशस्वी चित्राला आवश्यक असणारा मसाला म्हणजे Top Cast एकापेक्षा एक नावाजलेले नटनट्या असणे, संगीत, बाह्यचित्रण, निसर्गसौंदर्य, ऐश्वर्य, महाल, रंग, प्रेम, भरपूर गती असलेली व मादक नृत्ये, तुफान माराशाऱ्यांचे देखावे, दौड, कौटुंबिक प्रेम, करुणा, रडारड, ताटातूट, दुःख-यातना अशा प्रसंगांची रेलचेल असणे जरुरीचे असते. 'ज्या चित्रपटावर अधिक खर्च केला जातो तेच चित्रपट बहुधा धंद्याला यशस्वी होतात. लो बजेटफिलमस यशस्वी होणं कठीण. कारण त्यांना वितरक मिळत नाहीत. थिएटर्स मिळत नाहीत. त्यांची जाहिरात होत नाही. प्रेक्षकांच्या अपेक्षा वाढत नाहीत.

कोणते चित्रपट आर्थिकदृष्ट्या यशस्वी होतात असा आपला अनुभव आहे ?

त्या बाबतीत आमचे काही आडाखे आहेत. प्रथमतः धार्मिक व पौराणिक हे चित्रपट लोकांना आवडतात. चित्रपट पाहणारी जनता म्हणजे मध्यमवर्ग, कामगार व अगदी गरीबवर्ग, त्यात स्त्रिया व मुले आलीच. पौराणिक चित्रपट हा भारतातल्या सर्व भागात हिंदी असला तरी दाखवता येतो. उदा० महाभारत, लंकादहन...अगदी ह्या विषयावरच हिंदी चित्रपट तामीळनाडू, केरळापासून तो काश्मीर-आसाम-राजस्थानपर्यंत चालतो. भारतातल्या सर्व लोकांना एकत्र आणणारा, सर्वांना माहीत असणारा असा हा विषय आहे.

धार्मिक चित्रपट हे देखील चालतात. ह्याचं कारण नव्या आधुनिक जगात दुःखं, संकटं, अपघात, योगायोग, अपार यातना वाढल्या आहेत. गरिबांना व स्त्रियांना त्यांची झळ जास्त भासते.' म्हणून त्यातून दिलासा मिळण्याकरता व्रतवैकल्यांचं महत्त्व सांगणारी, चित्ताला शांती देणारी, धार्मिक परंपरा सांगणारी चित्रे फार लोकप्रिय होतात. जय संतोषी माँ हे त्याचे सर्वांत उत्तम उदाहरण. १६ शुक्रवाराचे व्रत–देवी-उपासना–कुटुंबांना संकटातून पार पाडण्याचा रस्ता...असा विषय ह्या चित्राची गंमत सांगतो. ह्याचा दिग्दर्शक, कथालेखक श्री. शर्मा माझा साहाय्यक. कुठलंही Logic ह्याला माहीत नाही. भाकडकथा, चमत्कार इ. गोष्टींवर जाणूनबुजून श्रद्धा. ह्या तरुण माणसाने अगदी नगण्यअभिनेते घेऊन–साधे तंत्रज्ञ घेऊन हे Low Budget film केले. त्याला जाहिरात केली नाही. काही खर्च नाही. 'बरेच दिवस हे चित्र डब्यात पडून राहिले. वितरक उचलायला तयार नाहीत.' शेवटी कसेबसे एकदाचे लावले. पहिल्या आठवड्यात बेतासबात गर्दी; पण पुढे चमत्कार व्हावा तसे झाले–ते पिक्चर हा हा म्हणता उभे राहिले. ना पोस्टर, ना जाहिरात–ना ब्लॉक. कुठे तरी वर्तमानपत्रात बारक्या चौकटीत त्याची जाहिरात असते. अगदी साधी. २०–२० आठवडे सहजगत्या आणि तोबा गर्दीत चालतो आहे. 'ह्या चित्रपटाने उत्पन्नाचे विक्रम केले आहेत. कोटयवधी रुपये मिळवले व अगदी थोड्या लाखांची जुळवाजुळव करून. हे चित्राचे भाग्य !' लोक वेडे झाले आहेत. बायका ह्या चित्रपटात हळदकुंकू घेऊन जातात. निरांजन-उदबत्त्या ओवाळतात, भजने म्हणतात, १६ शुक्रवार करतात. त्याची सांगता चित्रपटात सर्वांना प्रसाद देऊन केली जाते. बॉबी इ. पिक्चरपेक्षा जास्त ग्रेट पिक्चर हेच झाले ! आता तर काय धार्मिक चित्रांची पुन्हा एकदा लाट आली आहे. सत्यनारायणपूजा इत्यादी.

तिसरा फॉर्म्युला म्हणजे ऐतिहासिक चित्रपटांचा. आपला इतिहास भारताच्या बऱ्याच भागात माहीत आहे. अकबर, सलीम असो की शिवाजी, राणा प्रताप असो ह्यांची चित्रे जोरात चालतात.

त्यानंतर लैंगिक उत्तानपणा असलेली व खच्चून मारामारी, गुन्हेगारी असलेली हिंदी रहस्य, सस्पेन्स. मारामारीला भाषेची अडचण नाही. Sex Appeal चेही तेच आहे. Sex आणि Violence ह्या गोष्टी यंत्रयुगात जरा सामान्य स्तरावरील माणसात जास्त महत्त्वाच्या असतात. ह्या पार्श्वभूमीवरचे चित्रपट म्हणून बरे चालतात.

'पण ह्याहीपेक्षा जास्त Safe फॉर्म्युला म्हणजे कौटुंबिक चित्रे–भाऊ–भाऊ–जावा–जावा–बहीण–भाऊ–सासू–सुना' इत्यादी नात्यातील लोकांतील संघर्ष व दिलजमाई इ. कुटुंबच्या कुटुंब अशा सिनेमांना नटूनथटून सणावाराच्या उत्साहाने जात असते. एक १४–१५ हजार फूट रिळाचा प्लॅन केला जातो. इतके रीळ प्रेम, इतकं रीळ जुदाई, इतकं रीळ गाणी, नाच, मारामारी असा रिळांच्या लांबीचा हिशोब नव्या चित्रपटतंत्रात आहे.

आपण संतोषी माँ बद्दल बोललात. 'पांडू हवालदार'च्या यशाचे विश्लेषण काय ?

आपल्या मराठी भाषेत ग्रामीण भागाला व कामगार गरीबवर्गाला Appeal होईल अशी Theme हवी. त्या दृष्टीने दादा कोंडक्यांना प्रेक्षकांचं मन समजलं आहे. 'विच्छा माझी पुरी करा'च्या अनुभवाने त्यांना महाराष्ट्रात काय काय हवंय याचा अंदाज आला आहे. ते अनुरंजक, विनोदी, नाचगाणी–तमाशे इ. नी सर्वसामान्य माणसाच्या जीवनाला स्पर्श करणारे विषय घेतात. 'पांडू हवालदार' हे टायटलच किती आकर्षक आहे. आपल्या मराठी माणसाच्या मनात 'पोलीस' ह्या असामीबद्दल एक तिटकारा आहे, प्रेम आहे, तुच्छता आहे. गरीबांच्या जीवनात पोलिसांकडून गांजणूक किंवा संरक्षण दोन्हीही होऊ शकते. तोच मोठा घटक, असा विषय घेतला, प्रेक्षकवर्ग आता त्यांचा स्वतःचा तयार झालाय. 'पांडू हवालदार' चित्रपटाला 'संतोषी माँ' पेक्षा खर्च कमी झाला आहे. मात्र प्राप्ती Terrific आहे. 'मराठी चित्रपट धंद्याला मार खातो असं आपण अनेक वर्षे म्हणत होतो, ह्या कल्पनेला चांगलाच पण अभिमानास्पद धक्का ह्या चित्रपटाने दिला आहे.'

किती चित्रपट यशस्वी होतात ? किती पडतात ? ह्याचे काही प्रमाण सांगता येईल का ?

साधारणपणे ५–६ चित्रपट काढले तर एखादा यशस्वी होतो, २–३ साधारण जातात, २–३ सपशेल पडतात. हाही Unpredictable धंदा आहे. तरी ह्या धंद्यातील मुरब्बी लोक हा धंदा करीत आहेत. कारण त्यांची सरासरी पक्की बसली आहे. भारतातल्या कोटयवधी गरीब लोकांना सिनेमा हा एकमेव आधार आहे. दिलासा आहे. त्यांची सिनेमा पाहणे ही मूलभूत गरजांइतकीच महत्त्वाची गरज आहे. जगात जास्तीत जास्त चित्रपट काढण्यात आज आपला देश सर्वांत पुढे आहे. कोटयवधी रुपयांची उलाढाल ह्या धंद्यात होत आहे. ह्याचे कारण ह्या व्यवसायात आर्थिक यश कधी कमी, कधी जास्त प्रमाणावर मिळत असलेच पाहिजे किंवा ते यश मिळण्याची संभाव्यता खूपच असली पाहिजे. 'रेस खेळणारा माणूस आणि महाराष्ट्र राज्य लॉटरीचे तिकीट काढणारा माणूस, तसेच देवाला नवस करणारा माणूस ह्यात तसा फरक नाही. 'चित्रपटधंद्यात पडलेले जे लोक आशेने, विश्वासाने व चिकाटीने त्यात कायम राहतात त्यांना यश मिळवून देणारा एक ना एक दिवस येतो. काही दुर्दैवी लोकांच्या बाबतीत तो दिवस फिरून कधी येत नाही; पण त्याची खंत नसते. कारण की त्यांना ह्या बिनधास्त, नशिल्या व गतिमान आयुष्याची सवय होऊन जाते. □ □

[ अर्थ / ऋतु विशेषांकावरून पुनर्मुद्रित ]

# फ्रीडम ॲट मिडनाईट । एक आव्हान !

'फ्रीडम ॲट मिडनाईट' या ग्रंथाचा एक लेखक डॉमिनिक लेपियर याने दिल्लीला पत्रकार परिषद घेतली. त्याचे वृत्त १५-२-७६ च्या 'टाईम्स ऑफ इंडिया'च्या दिल्ली आवृत्तीत आले आहे. आणखीही काही वृत्तपत्रात ते प्रतिवृत्त आले आहे.

लेखकद्वयाने स्वतःच्या मनाने काही निष्कर्ष काढून स्वातंत्र्यवीर सावरकर आणि नथुराम गोडसे यांचे चारित्र्यहनन करण्याचा उपद्व्याप मूळ पुस्तकात केला आहे. एका पत्रकाराने त्याविषयी संताप व्यक्त केला आणि प्रश्न विचारला. त्यावर दिल्लीच्या वार्ता-परिषदेत लेपियर याने सांगितले की, गोपाळ गोडसे यांच्या स्वीकारोक्तीमधून नथुराम आणि सावरकर यांच्यात विकृत वैषयिक संबंध होता ही गोष्ट लेखकांना कळली.

□

श्री. गोपाळ गोडसे यांचेकडे यासंबंधी विचारणा केली असता त्यांनी लेपियर यांचा हा आरोप केवळ 'घृणास्पद'च नाही तर पूर्णतया 'असत्य'ही आहे असा स्पष्ट खुलासा 'माणूस' प्रतिनिधीजवळ केला. माणूस प्रतिनिधीने यावर श्री. गोपाळ गोडसे यांना या विषयावर माणूसमध्ये सविस्तर लिखाण करण्याची विनंती केली. ही विनंती श्री. गोपाळ गोडसे यांनी मान्य केली असून 'फ्रीडम ॲट मिडनाईट-एक आव्हान' ही त्यांची लेखमाला माणूसमधून लवकरच सुरू होत आहे.

फ्रीडम ॲट मिडनाईट । एक आव्हान !